# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला, भाईंदर
दि.   /  /२००३.

**मा. महासभा दि. १६/१/२००३ सकाळी ११.०० वाजता.**

आज दि.१६/१/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा महापालिकेच्या सभागृहात मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती |
| ३) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४) | श्री. बोर्जीस हेरल जॉर्ज | सदस्य |
| ५) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ९) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १०) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ११) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १३) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १४) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १५) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १६) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १७) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| १८) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १९) | श्री. पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| २०) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २१) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २२) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २३) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २४) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २५) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| २६) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २७) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २८) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २९) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३०) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३१) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३२) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३३) | श्री. पटेल आसिफ गुलाब | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३४) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३५) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ३६) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३७) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३८) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ३९) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४०) | श्री. मेंडोसा स्टीवन जॉन | सदस्य |
| ४१) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४२) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४३) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ४५) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ४६) | श्री. घोन्सालविस जोजफ जॉन | सदस्य |
| ४७) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४८) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४९) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५०) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ५१) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५२) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५३) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५४) | श्री. पाटील रतन कृष्णा | सदस्य |
| ५५) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५६) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५७) | श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण | सदस्या |
| ५८) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ५९) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६०) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६१) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६२) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६३) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६४) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६५) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ६६) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ६७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ६८) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ६९) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ७०) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ७१) | श्री. पाटील परशुराम दामोदर | सदस्य |
| ७२) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ७३) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ७४) | श्री. पांडे हंसू कमलकुमार | सदस्य |
| ७५) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. पांगे संजय | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | श्री. सुवर्णा रोहीत मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | श्री. परेरा टेरी पॉल | नामनिर्देशित सदस्य |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| २) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ३) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | सदस्य |

**रजेच अर्ज आलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हुसेन सय्यद मुझफ्फर | उपमहापौर |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |

वरील प्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा.महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा.महापौर :-**

मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.सभापती, मा.प्र.सचिव व तसेच सन्मा. सर्व सदस्य व महानगरपालिका अधिकारी व पत्रकार बंधु आपल्या सर्वाचे स्वागत.

**प्र.सचिव :-**

पाणी पुरवठा प्रश्नासंदर्भात एम.जे.पी.कडून दोन अधिकारी आलेले आहेत. मा.पिंजरकर साो. आणि मा.नडगिरे साो. आलेले आहेत तसेच जे काही प्रतिनियुक्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेत अधिकारी आलेले आहेत त्यांनी त्यांची ओळख या सभागृहाला करुन दयायची आहे.

**दशोरे एस.के.**

मी एस.के.दशोरे, उपअभियंता पाणी पुरवठा विभागात दि.६ जानेवारी २००३ रोजी रुजू झालेले आहे आणि पुरवठा विभाग देखभाल व दुरुस्तीचे काम माझ्याकडे आहे.

**संजय कांबळे :-**

मी संजय कांबळे पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवर आलेलो आहे.

**राजेंद्र गुजरे :-**

मी राजेंद्र गुजरे उपअभियंता बांधकाम या विभागात रुजू झालेलो आहे.

**लिओ कोलासो :-**

आदरणीय महापौर साो.बाहेर जे फटाके वाजले ते नवीन अधिकारी आले म्हणून नाहीत पण सुप्रीम कोर्टाने ही महानगरपालिका कायम ठेवली त्याबद्दल आहेत असा माझा तर्क आहे.

**मिलन पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, आपली महानगरपालिका सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार महानगरपालिका ही अस्तित्वात आल्याबद्दल श्री.आसिफ शेख यांनी पाटीतर्फे म्हणजेच राष्ट्रवादी पाटीतर्फे हस्तक्षेप करुन त्यामध्ये त्यांनी याचिका दाखल केली होती आणि सुप्रीम कोर्टाने ती मान्य करुन आज महानगरपालिका ही अस्तित्वात ठेवलेली आहे. त्याबद्दल मी श्री.आसिफ शेखचे सर्वानुमते अभिनंदन करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय की बाहेर फटाके वाजले त्याचा उल्लेख झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मानीय नगरसेवक सर्व अधिका-यांची पहिल्यांदा आपण हे घेत होतो त्यांची आपण विचारपूस करत होतो तो अधिकारी बोलतो ही प्रथा नाही. अधिका-यांची जाणीव होणे हा सर्वात महत्वाचा विषय आहे अजून अधिकारी आपली जाणीव देतात की, मी कुठल्या पदावर आहे त्या आधी हा ठराव झाला असता त्यास आम्ही नाही म्हणत नाही पण एक शिस्त आहे अधिकारी आपली ओळख करुन देत आहेत आणि आपण असा ठराव मांडणे ही शिस्त नाही या सभागृहाची.

**मिलन पाटील :-**

सन्मा.सदस्य श्री.ओमप्रकाश अग्रवाल आपणा सर्वांना सभागृहात ओळख करुन दिलेली आहे अजून काही आपल्याला ते नवीन सांगतील का ?

**मिलन म्हात्रे :-**

अजून कोण राहिले आहेत का अधिकारी तीन झालेत तिघाव्यतिरिक्त अजून चौथा कोण आहे का ?

**मा.महापौर :-**

चर्चा थांबवा व प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा.महापौर सो. मी आपणाकडे परवानगी मागितली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा.महापौर सो. एम.जे.पी.तर्फे अधिकारी इकडे पाठविले जातात. पाहिजे तेव्हा बोलाविले जातात. आपल्याकडे असे अधिकारी आहेत जरा राहिले आणि पुन्हा एम.जे.पी.ने बोलावून घेतले व परत पुन्हा इकडे पाठविले त्यांचा चार्ज नाही हा नगरपालिकेच्या पैशाचा अपव्यय चालू आहे असे अनेक प्रकार इकडे आहेत म्हणजेच एम.जे.पी.ने पत्र पाठवून त्यांना बोलावयाचे व परत पाठवून दयायचे म्हणजेच ही प्रथा महानगरपालिकेला बरोबर नाही. म्हणजेच नगरपालिकेचा पैशाचा अपव्ययाचा प्रश्न आहे. मा.महापौर सो. माझ्या माहितीप्रमाणे श्री.मटकर यांनी एम.जे.पी. परत बोलावून घेतले होते. परत इकडे त्यांना ठेवलेले आहे. त्यांच्याकडे कुठचा चार्ज आहे म्हणजेच इकडे माझ्या माहितीप्रमाणे ते त्यांना सुध्दा माहित नाही व मला सुध्दा माहित नाही अशाप्रकारे महानगरपालिकेच्या पैशाचा अपव्यय आम्ही होऊ देणार नाहीत. अधिका-यांना ज्यांना पाठविले जाते एम.जे.पी.कडून त्यांना काम आहे किंवा नाही याची या सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मा.महापौर सो. आता जे फटाके वाजले आणि त्यांचा उल्लेख या सभागृहामध्ये झाला परंतु आज जो विजय दिवस मानला जातो आहे त्याच्यापाठीमागे नुसते एकटे आसिफ शेख नव्हते. ज्यावेळेला नविन सभागृह आले या सभागृहात बसलेले माझे सर्व सन्मा. सदस्य/सदस्या यांचे भवितव्य अंधारामध्ये होते. कारण हा जो निर्णय आहे या केसमध्ये ज्यावेळी कोर्टामध्ये सुनावणी झाली त्यावेळी प्रत्यक्ष आम्ही स्वतः उपस्थित होतो. सर्वात प्रथम जेव्हा नगरपालिकेच्या निवडणूका झाल्या सर्व सन्मा.नगरसेवक निवडणूक आलेले घोषित केले गेले. त्यानंतर सर्वप्रथम जनतादलाचे तीन नगरसेवक मी स्वतः मिलन म्हात्रे, सुरेंद्रप्रसाद तिवारी आणि नयना गजानन म्हात्रे या तीन नगरसेवकांनी वस्तुस्थिती शहराची इलेक्शन झाली. महापौर निवडून गेले, उपमहापौरांची निवड झाली, समित्या झाल्या हे सर्व आम्ही आमच्या इंटरवेल/ॲप्लीकेशनमध्ये कोर्टापुढे आणले पहिल्याच हिअरिंगला आम्ही दिले त्यानंतर तारखा पडल्या त्यांना आम्ही उपस्थित राहिलो. आमचे वकील उपस्थित राहिले. मी आज या सभागृहामध्ये आयुक्तांना सांगू इच्छितो आणि स्वतः आपल्याला सुध्दा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भवितव्याचा प्रश्न उपस्थित झाला असताना वीस दिवस अगोदर मा.आयुक्तांना मी स्वतः लेखी पत्र दिले होते की, ही हिअरिंग आता जवळ आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका,धुळे, आणि जळगांव हया तिन्ही केसेस एकत्र केल्या गेल्या क्लब आणि आपला विषय थोडा निराळा आहे. परंतू बाकीच्या नगरपालिकांचा विषय भरपूर निराळा आहे. परंतू सुप्रिम कोर्टामध्ये हया तिन्ही एकत्र केल्यामुळे यासर्व सदस्यांचे भवितव्य अंधःकारमय होते मी वारंवार आयुक्त आणि उपआयुक्तांच्या पाठीमागे लागलो कि साहेब आपले कोणतरी पाठवा अत्यंत खेदाची बाब आहे.करोडोच्या गोष्टी आपण करतो महानगरपालिकेच्या बजेटच्या गोष्टी आपण करतो परंतू मिरा भाईदर महानगरपालिकेचा एकही लॉयर एकही कॉन्सीलर या केसला सुप्रीम कोर्टामध्ये कालच्या दिवशी उपस्थित नव्हता ही खेदाची बाब आहे. आम्ही याचा निषेध करतो हे सभागृहामध्ये नोंदवून घ्या दुसरी गोष्ट जी शासनाची बाजू आहे. आयुक्तांनी आम्हाला फार चांगल्या पध्दतीने समजावुन सांगितले तुम्ही निश्चिंत रहा शासनातर्फे सर्व व्यवस्थित आहे आमचे वकील जाणार आहेत मला साहेब माहिती आहे.आपल्या सुप्रीम कोर्टाच्या इकडे स्टेट गव्हर्नमेंटच्या वकीलाच्या कार्यालयात काय कामकाज चालते हयाचा चांगला अनुभवी आहे मी कालसुध्दा तेच झाले महाराष्ट्र शासनाची खरी बाजू असून सुध्दा महाराष्ट्र शासनाच्या वतीने एकही वकील नव्हता की, निवडणूका बरोबर झाल्या की चुकीच्या झाल्या. केवळ फक्त इंटरवेंट आमची ॲप्लीकेशन फाईल केल्यामुळे आमच्या वकीलाने आमची बाजू मांडली आणि त्या केसमध्ये आमचे ॲप्लीकेशन हाते ते अलाऊड झालेले आहे बाकीच्या दोन केसेस अजून पेंडींग आहेत ते ॲप्लीकेशन अलाऊड झाल्यामुळे आज आमच्या सर्व सन्मा.सदस्यांना जीवनदान मिळाले आहे

त्यांची पद आता शाबीत झालेली आहेत हे लक्षात घ्या हा सर्व जो विषय आहे एखादा सभागृहातील सदस्य सभागृह जिवंत रहावे म्हणून आम्ही पोटतिडकीने पत्रव्यवहारकरतो. परंतु अधिका-यांकडून टोलवाटोलवी केली जाते. आयुक्तांना काल मुंबईला पाठविले उपआयुक्तांना आयुक्तांनी, उपआयुक्त गेले त्या एका केळकर साहेबाची बदली झाली दुसरा एक कोणतरी आलेला आहे. जॉकीश्रॉफ म्हणून कोणतरी त्याच्याकडे ते दिले गेले त्यांनी सांगितले आम्ही पाठविलेले आहे. ॲडजॉनमेंट मिळणार आहे. फायनल हिअरिंग होती ही नगरपालिका बरखास्त झाली असती तर आमचे कोणी नसत तर आणि सकाळी साडेदहाचे पहिले मॅटर होते. पण कुठलीही गांभीर्याने बाब घेतली नाही. परिणामी आज सभागृहामध्ये मिटींग भरली नसती हयाची तुम्ही फार गांभीर्याने नोंद घ्या. परत परत हेसगळ झाले नाही पाहिजे. मी निषेधाचा ठराव माडतोय. शासनाचा. शासनाने वकील नाही दिलेला ती हयाच्यामागे चार महिन्याची मेहनत आहे हे सर्व तुम्ही नोट करा आणि पुढे योग्य ती कारवाई करा.

**श्री.आसिफ शेख :-**

सन्मानीय महापौर सो. या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. कि निषेध वैगरे व्यक्त केला पाहिजे. कोणी ॲडव्होकेट, व नगरसेवक उपस्थित नव्हता. सन्मा.सदस्यांना या ठिकाणी सांगू इच्छितो की, सवोच्च न्यायालयात जी याचिका दाखल करण्यात आली होती ती याचिका माजी नगरसेविका छाया किणी यांनी स्पेशल लिव्ह पिटीशन ५३९३/२००२ या अन्वये दाखल केली होती आणि काल परवा १४ तारखेला मा.सर्वोच्च न्यायालयात आर.सी.लाहोटी न्यायमुर्ती व न्यायमुर्ती ब्रीजेशकुमार यांच्या खंडपीठापुढे ही याचिका सुनावणीसाठी आली होती. आणि त्यामध्ये शासनातर्फे उदयललीत आणि छाया किणी यांच्यातर्फे ॲड.व्ही.डी.खन्ना यांनी बाजू मांडली आणि या सदर याचिकेत सर्वप्रथम इंटरव्हेशन ॲप्लीकेशन म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मी स्वतः त्यामध्ये इंटरव्हेशन ॲप्लीकेशन नंबर ०४/२००२ या अन्वये हस्तक्षेप याचिका दाखल केली होती. या संपूर्ण याचिकेचे १४ तारखेला अंतीम सुनावणी झाल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला कि ही याचिका जी आहे ५३९३ती डिसमेज ॲज इनफ्लच्युअेशन करण्यात येत आहे आणि महापालिका अस्तित्वात आली आहे सर्व नगरसेवक निवडून आलेले आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय हया याचिकेमध्ये कोणताही हस्तक्षेप करु इच्छित नाही. त्यामुळे ती याचिका डिसमिस केली. त्यामुळे हयासंदर्भात एक याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल आहे. त्यासंदर्भात उच्च न्यायालय निर्णय होईल. याप्रमाणे निर्णय झालेला आहे हे सभागृहाला माहित असायला पाहिजे होते. त्यासाठी ही संपूर्ण माहिती याठिकाणी सांगत आहे. सर्व प्रथम अभिनंदनाला पात्र ही संपूर्ण जनता आहे कारण करोडो रुपयाचे नुकसान होण्यापासून वाचवले आहे. कारण निर्णय झाला असला तर पुन्हा नव्याने निवडणूका झाल्या असत्या तर करोडो रुपये शासनाचे आणि जनतेचे खर्च झाले असते. अभिनंदनास पात्र सर्व प्रथम मला वाटत जनता आहे. शासन आहे आणि महापालिका आहे आणि सर्व सन्मानीय सदस्य या अभिनंदनास पात्र आहेत. हा कोणाचा एकटयाच विजय नाही हा सर्व जनतेचा विजय आहे. सर्वांचाच विजय आहे. यामध्ये सर्वांचा सहभाग आहे आणि निषेधाचा याठिकाणी उल्लेख करण्यात आला तर मला वाटत सन्मा.सदस्यांना याची कल्पना असली पाहिजे की, एकदा आपण ॲडव्होकेट अपॉइंट केल्यानंतर प्रत्येक वेळी प्रतीवादी जायलाच पाहिजे असा कुठे नियम नाही. ॲड.शिवाजी जाधव हे माझ्यावतीने त्याठिकाणी उपस्थित होते. सुप्रीम कोर्टामध्ये तर त्यांनी आमच्यावतीने तेथे बाजू मांडलेली आहे आणि सर्वोच्च न्यायालयाचा आलेला निर्णय आपल्यासमोरच आहे आणि दुसरी बाब मला या ठिकाणी सांगाविशी वाटते कि, संपूर्ण शासनाची अशी भूमीका होती कि, मिरा भाईंदर परिसराची लोकसंख्या ही ५,२०,३०१ इतकी झालेली आहे आणि नगरपालिकेचे बजेट हे शंभर कोटीच्या घरात गेलेले आहे आणि त्यामुळे शासनाने ३ नोव्हेंबर २००१ रोजी शासनाने १६ ऑक्टोबर २००१ रोजी महापालिका घोषीत करण्यासाठी अधिसूचना काढली होती आणि लोकांकडून हरकती व सूचना मागितल्या होत्या आणि त्यानंतर त्याचवेळी राज्य निवडणूक आयोग यांनी ९ ऑक्टोबर २००१ रोजी या नगरपालिकेच्या निवडणूका जानेवारी २००२ मध्ये घेण्याचे निश्चित केले होते म्हणजे दोन्ही जानेवारी २००२ मध्ये घेण्याचे निश्चित केले होते म्हणजे दोन्ही जी पत्र आहेत. राज्य शासनाचे आणि राज्य निवडणूक आयोगाचे पत्र हे एकाचवेळी निघाल्यामुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता की, पहिल्या नगरपालिकेच्या निवडणूका हेणार नंतर महानगरपालिका घोषित होणार आणि पुन्हा नक्की काय होणार असा लोकामध्ये संभ्रम निर्माण झाला होता. तो संभ्रम दूर व्हायला पाहिजे. हयासाठी सर्वप्रथम मुंबई उच्च न्यायालयात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मी पब्लीक इंटरेस्ट जनहित याचिका नं.१०६/२००१ दाखल केली होती. त्यावेळी मुंबई उच्चन्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती बी.पी.सिंग आणि डॉक्टर धनंजय चंद्रचुड साहेबांनी निर्णय दिला

आहे. शासनाला सांगितले की, तुम्ही महापालिका घोषित करा आणि त्यानंतर दि.२८ फेब्रुवारी रोजी आपली महापालिका अस्तित्वात आली आणि नंतर निवडणूका झालेल्या आहेत. तर महापालिका झाली असतांना या ठिकाणी जो निर्णय झालेला आहे त्या निर्णयामध्ये अभिनंदन करायचे असेल तर खरोखरच मी सांगितल्याप्रमाणे जनतेचे केले पाहिजे. सन्मा.सदस्याचे तसेच शासनाचे व अधिकारी व पदाधिका-याचे करायला पाहिजे. धन्यवाद.

**मा.सचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. १२.०५ झालेले असून अर्धातास प्रश्नोत्तराची वेळ असेल मागच्या सभेतील एक प्रश्न झालेला होता. दुस-या नंबराच्या प्रश्नोत्तरास सुरुवात होत असून तो सन्मा सदस्य श्री.हॅरल बोर्जीस यांच्या आहे. त्यापासून सुरुवात होत आहे. सन्मा सदस्य श्री.हॅरल बोर्जीस यांना उत्तरे दिलेली आहेत.

**हॅरेल बोर्जीस :-**

सन्मानीय महापौराच्या परवानगीने बोलतोय की, सन्मा. आयुक्तसाहेब मागच्या सभागृहातले बरेचसे जुने सदस्य हया सभागृहात रिपेटिशनमध्ये आहेत. मागे जेव्हा अंतर्गत वितरण व्यवस्थेचा विषय सभागृहासमोर आला सुरुवातीला ३५ कि.मी. क्षेत्र हे नक्की केले गेले आणि सभागृहामध्ये ज्या वेळेला हा विषय उपस्थित झाला बहूसंख्य सदस्यांनी याला विरोध केला कारण ब-याचशा सदस्यांच्या प्रभागातील अंतर्गत वितरणाची कामे ही घेतली गेलेली नव्हती आणि सर्वाच्या संमतीनुसार हा विषय पुन्हा सभागृहासमोर यावा असे त्यावेळी सर्व सदस्याच्या संमतीने झाले. पुन्हा एकदा ६०कि.मी.क्षेत्र हे नक्की झाले आणि माझे जे दोन तीन प्रश्न होते त्यामध्ये भाईदर पूर्वेचा जर विचार केला तर भाईदर पूर्वेला ५२ कि.मी.चे क्षेत्र हे आरक्षित केलेले होते आणि पश्चिमेला ८.५५ कि.मी.एवढे होते. पश्चिमेचे जवळजवळ पूर्ण झालेले आहे. पुर्वेचे १८ कि.मी क्षेत्र हे बाकी आहे. आता जी ५० एम.एल.डी.ची नविन योजना कार्यान्वीत केली गेली या योजनेमध्ये मुर्धा, डोंगरी, उत्तन, चौक परिसर हा कुठेही समाविष्ट नव्हता परंतू अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये हा परिसर समाविष्ट व्हावा अशी त्यावेळी सदस्यांमधून मी सूध्दा मागणी केलेली होती. तत्कालीन नगराध्यक्ष सन्मा.सदस्य श्री.प्रफुल्ल पाटील यांनी सुध्दा त्याला मान्यता दिली होती आणि अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये आमचा भाग हा विलिन केला गेलेला होता. परंतू अजुनही आमच्या भागातील अतर्गत वितरण व्यवस्थेची कामे हाती घेण्यात आलेली नाहीत तिसरा प्रश्न प्रस्तावित केलेल्या नियोजित वितरण व्यवस्थेमध्ये आमचा भाग समाविष्ट जुन्या ए.सी.लाईनवर बदली करणार क? तर याच्यात नाही असे उत्तर दिलेले आहे साधारण:त मा.आयुक्त साहेब आमच्या भागातील १८०० ते २००० स्वतंत्र नळ कनेक्शन साठी फाईल आपल्या खाती आलेल्या आहेत आणि अंतर्गत वितरण व्यवस्थेमुळे आमची एकही फाईल निकली काढू शकत नाही. तर माझी डोंगरी चौक, उत्तन या सर्व सदस्यांच्या वतीने आपणांस विनंती आहे की., आपण संबंधित खात्याला बचत आपल्याजवळ शिल्लक आहे त्या बचती मध्ये आमच्या अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये आपण घ्यावे आणि आमच्या ज्या फाईल निकाली काढण्याचे पेंडिग पडलेले आहेत तरी अंतर्गत वितरण व्यवस्थेबाबत संबंधित खात्याला निर्देश देऊन त्वरीत सुरु करावे अशी मी आपणांस विनंती करतो.

**मा.उपआयुक्त :-**

मा.महापौर साहेब उत्तन पाणी पुरवठा योजना उत्तन, डोंगरी आणि राई मुर्धा या भागामध्ये ६० कि.मी. च्या पाणी वितरण व्यवस्थेमध्ये धरलेले नव्हते. सध्या जी वाढीव पाणी पुरवठा तीन कोटीची घेतलेली आहे. आणि त्यांचे टेंडर ही झालेले आहे. त्यामध्ये जवळ जवळ साडे सात कि.मी. ऐरिया वितरण व्यवस्थेमध्ये धरलेले आहे. त्याच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. या वाढीव पाणी पुरवठया मध्ये साडे सात कि.मी वितरण व्यवस्था आणि सम्प आणि ई.एस.आर हे तिन्ही ईएसआर साठी जागा ही फिक्स केलेली आहे.त्या स्कीम बरोबर घ्या वितरण व्यवस्थेची कारवाई पूर्ण होणार असल्यामुळे यामध्ये ६० किमी मध्ये जर शिल्लक राहिले तरी सुध्दा ती शिल्लक पाईप लाईन वळविण्यात येईल. शिल्लक जरी नाही राहिले तरी देखील आपल्याला जवळजवळ साडेआठ किमी ची लाईन त्या विभागासाठी वाढीव पाणीपुरवठयामध्ये धरलेली आहे. आणि लवकरच ती योजना योजनेच्या कामाला सुरुवात होणार आहे.

**लिओ कोलासो :-**

पाणी पुरवठा आणि ग्रामविकास मंत्री मा.आर.आर.पाटील यांनी अगदी महानगरपालिकेची निवडणूक होण्याच्या पूर्वे संध्येला जवळजवळ अतिरिक्त रकमेला व प्रकल्पाला मंजूरी दिली आणि त्याच्यानंतरबराचसा काळ निघून गेलेला आहे. म्हणून शहरातले त्या परिसरातले लोक विचारतात की, आमच्या टाक्यांचे भूमीपूजन

कधी होणार आहे. तर हा एक प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, या शहरासाठी दहा द.ल.लि. चे अतिरिक्त पाणी आले त्याच्यानंतर दुसरे जे अतिरिक्त पाणी आले उपआयुक्तांनी माहिती देतांना प्रत्येक सभेमध्ये असे सांगितलेले आहे की, आजच्या घडीस या शहरामध्ये ५८ एम.एल.डी. पाणी येत आहे. आणि जुन्या पाणी पुरवठयाचे प्रमाण आणि आताचे पाणी पुरवठयाचे प्रमाण यामध्ये फारमोठे अंतर पडलेले आहे. शहरवासियांना चांगला पाणी पुरवठा होत आहे हे प्रशासनाचेआणि शासनाचे कौतुक करण्यासारखी गोष्ट असली तरी पण उत्तन परिसर राई,मुर्धा, मोर्वा, या भागामध्ये या अतिरिक्त असलेल्या पाण्यामधून आहे. त्याच व्यवस्थेमधून पाणी पुरवठयाचा कोटा वाढवून दिला पाहिजे आणि तेथे फॅक्शनिंग हावर्स जे १८ तास आहेत आणि त्याच्यातले जे बॅलन्स सहा तास रहातात तर सहा तासाचा हा जो गॅप आहे तो भरुन काढून किमान दिड द.ल.लि. पाणी या दिवसामध्ये वाढवून दिले पाहिजे अशी माझी परिसरातर्फे सभागृहाला विनंती आहे.

**मा.उपआयुक्त :-**

मा.महापौर पूर्वी ज्या एम.एल.डी जी पाणी पुरवठा करत होतो उत्तन राई मुर्धा, त्यापेक्षाही जास्त पाणी पुरवठा आता चालू आहे. मात्र स्किम झाल्यानंतर त्यापेक्षाही जादा पाणी देण्याची व्यवस्था होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा.आयुक्त सो. आपल्या ९० फुट डी.पी.रोडला साधारण किती इंचाची पाईप लाईन असली पाहिजे ९० फुट डि.पी.रोड आहे. आपल्या भाईंदर वेस्टवरुन फ्लायओव्हर उतरतोय आणि सरळ नवघर रोडला जातोय. गोल्डन नेस्ट वरुन. त्या रोडवर फक्त सहा इंचाची लाईन टाकलेली आहे. आणि तो ९० फुट डि.पी.रोड आहे.

**मा.उपआयुक्त :-**

याप्रश्नाशी हा प्रश्न निगडीत नाही. सविस्तर प्रश्न विचारल्यानंतर उत्तर मिळेल. ६० फुटीरोडवर किती इंची पाईप लाईन टाकायला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मी यासाठी विचारत आहे की, तिकडे आपण सहा सहा इंचाच्या दोन पाईप लाईन टाकलेल्या आहेत.

**अनंत पाटील :-**

जो विषय आहे पाणी पुरवठयाच्या संदर्भामध्ये दुस-या क्रमांकाचा प्रश्न माझा आहे. आताच लिओ कोलासो साहेब आणि हॅरल बोर्जीस यांनी संबंधित माहिती पुरविली नाईक साहेबांनी त्याच्या विषयी जो खुलासा केलेला आहे. त्या अनुषंगानेच मी तुम्हाला विनंती वजा सूचना करु इच्छितो कि, गेल्या जवळजवळ ८४-८५ सालापासून राई,मोर्वा, मुर्धा आणि शिवनेरी नगर येथे जलवितरण व्यवस्था सी.सी.पाईप लाईन चार इंचाची होती आता नव्याने नळ कनेक्शन दयायची जी व्यवस्था कराल तेव्हा बरेचसे लोक नळ कनेक्शन घ्यायला इच्छूक आहेत. हया पाईप लाईनवर त्याचे बर्डन येऊन नाहक त्याच्यामध्ये लोकांना त्रास होण्याची शक्यता आहे आता सुध्दा चार इंची पाईप लाईनवर पाणी व्यवस्थित चढत नाही. परंतु पाण्याची नवीन कनेक्शन दिल्यानंतर पाणी पुरवठयात वाढ होणे किंवा अंतर्गत जलवाहिनी त्यापेक्षा मोठी करणे ही नगरपालिकेपूर्वीच्या लाईन्स आहेत ती जर अंतर्गत व्यवस्था तुम्ही चालू केलीत तर तेथे जनतेला पाणी पुरवठा सुरळीत हाईल अशी माझी इच्छा आहे. त्यानंतर माझा दुसरा प्रश्न आहे गटार योजने विषयी म्हणजे काही आपण अंतर्गत शहरांना घाण पाणी कचरा वितरण करण्याची गटाराची लाईन्स टाकलेल्या आहेत. ती गटारांची पाईप लाईन आहेत त्याच्यावर मर्यादित साफसफाई केली जाते. ज्यावेळी मोठया खाडयांचा केरकचरा आहे तो तसाच्या तसा आपण ठेवला गेला आहे. आपण येत्या पावसाळयापूर्वी पाणी पुरवठा सुरळीत करु किंवा गटार योजना साफसफाई करु असे मला उत्तर दिलेले आहे. मात्र पावसाळयापूर्वी मोठेमोठे नाले आहेत ते साफ होतील का ? त्या संदर्भामध्ये आम्हाला खुलासा करावा.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्या म्हणण्याचा उद्देश आहे की, त्याच रोडवर आपण एका बिल्डरला सहा इंचाची लाईन सॅक्शन करुन दिलेली आहे.आणि त्याने ती पाईप लाईन टाकलेली आहे.मग आपण परत लाईन का टाकली हे मला विचारायचे आहे?

**कैलासबेन जानी :-**

मा.सदस्य आता बोलतात पण प्रश्न उत्तर चालले आहे तुमचा प्रश्न आहे का हयाच्यामध्ये विचारण्यासाठी..

**नरेंद्र मेहता :-**

उपप्रश्न नंतर विचारु शकतो साहेब.

**कैलासबेन जानी :-**

उपप्रश्न नंतर विचारा हे प्रश्न उत्तर चाललले आहे. मध्येच कोणीतरी उठून बोलेल तर तुम्ही बसायला सांगता.

**अनंत पाटील :-**

पत्राच्या संदर्भामध्ये तुम्ही पावसाळया पूर्वी साफसफाई करणार आहात का याचे उत्तर मला दयावे.

**मा.उपआयुक्त :-**

मा.महापौर साहेब दर पावसाळयापूर्वी आपण नाले साफसाफाई चांगल्या प्रकारे झाल्यामुळे कोणाच्याही रस्त्यावर किंवा घरामध्ये पाणी शिरलेले नाही. चालूवर्षी सुद्धा पावसाळयापूर्वी आपण नाले साफसफाई करणार आहोत.

**मोहन पाटील :-**

मा.महापौर मॅडम सन्मा.सदस्य हॅरल बोर्जीस यांनी पाण्याच्या संदर्भात जो प्रश्न विचाराला आहे मला त्या विषयामध्ये बोलायचे आहे कि आपण हया ठिकाणी भाईंदर पुर्व आणि भाईंदर पश्चिम साठी जी लाईन टाकायचा जो विषय होता त्याच्यामध्ये ६० किलोमीटर आणि ५४ किलोमीटर अश्या दोन्हा लाईनमध्ये वितरण व्यवस्था टाकलेली आहे तर मला सभागृहामध्ये एवढच उत्तर पाहीजे कि ५४ आणि ६० किलोमीटर ची पाईपलाईन  भाईंदर पुर्व आणि पश्चिम मध्ये टाकलेली ५० दशलदक्ष एम.एल.डी.च्या योजनेमध्ये टाकलेले आहे. त्याचे विवरण मला पाहिजे होते कि ६० किलोमीटर आणि ५४ किलोमीटर आणि उर्वरित जी लाईन आहे तो टाकायचा प्रश्न  नंतरचा आहे तर जी टाकलेली लाईन आहे. त्याचे विवरण मला पाहिजे कि ६० किलोमीटर लाईन कोणकोणत्या कॉम्लेक्सला कोणकोणत्या रस्त्यावर टाकलेली आहे आणि ५४ किलोमीटर लाईन याचे विवरण कृपया आपण सभागृहापुढे दयावे असे मी सभागृहाला विनंती करतो.

**रिटा शहा :-**

साहेब पहिला प्रश्न संपला आहे आणि परत रिवर्स गेअरमध्ये गाडी कशी चाललेली आहे.

**मा.महापौर :-**

तुम्ही सर्व माहिती ऑफिसमधून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा.महापौर मॅडम माझी महत्वाची सूचना आहे मला परवानगी दिली तर बरे होईल मला नाल्यांच्या संदर्भात थोडे बोलायचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

माझा दोन नंबरचा जो प्रश्न होता तीन टाक्यांचा डोंगरी, भाटेबंदर आणि चौक अशा तीन टाक्यांच्या आपण निविदा काढल्या होत्या आणि ठेकेदारांना काम सुरु करण्याचे निर्देश सुध्दा दिलेले होते. आम्हाला आपल्याकडून एवढेच हवे आहे. कि आपण आम्हाला एक निश्चित तारीख सांगितली कि जेणेकरुन आम्हाला नागरीकांना त्यावेळी आम्ही सांगु शकू.

**मा.उपआयुक्त :-**

मा.महापौर साहेब मा.सचिव पाणी पुरवठा विभाग खटवा साहेबांनी  या संदर्भात मिटींग बोलावली होती.  त्यावेळी मा.महापौर, उपमहापौर आणि स्थायी समितीचे चेअरमेन यासगळयांनी मिळून मा. आर.आर.पाटील मा.ना. पाणी पुरवठा मंत्री हयांना विनंती पत्र दिलेल आहे. त्यानी तारीख दिल्यानंतरच हया कामाला सुरुवात होणार आहे त्यासाठी पत्र महापालीकेने दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा.महापौर साहेब मला परवानगी पाहिजे होती, नाल्यांचा प्रश्न क्रमांक २ मा. अनंत पाटील साहेब यांनी विचारला होता भाईंदर (प.) मधील प्रभाग क्र.५ प्रभाग क्र.४ प्रभाग क्र.३ आणि प्रभाग क्र.२० या प्रभागातील जे निच-याचे पाणी आहे हे मुख्यत्वे करुन प्रभाग क्र.४ मधून जाते माझ्या वार्डामधुन जाते आणि फार मोठे नाले आहेत गेल्या दीड ते पावणेदोन वर्षापासून मी मागे लागलोय कि हे नाले बनवून दया. पक्के

साफसफाई करा परंतू जी साफसफाई झाली कि उत्तर आलेले आहे. पावसाळयापुर्वी साफ केले जाईल असेच मागण्यावेळी पावसाळयापुर्वी सांगितले गेले परंतु हे नाले अजूनही साफ केले नाहीत. मी तक्रार केल्यानंतर वरवर साफ झालेले आहे. मी नाकारात नाही अजूनही व्हिडीओशुटिंग तुम्ही काढून हया इकडे आणा साहेब तुम्ही माझ्याबरोबर स्वत: या. आमची कळकळीची मागणी आहे आणि आम्ही विनंत्या करतोय चार चार पाच पाच वार्डाचा निचरा होतोय त्या पाण्यामधून आणि याच्या वरती महानगरपालिका यापुढे काय करणार आहे. कारण पावसाळा फार कमी वेळ राहिलेला आहे.

**मा.उपआयुक्त :-**

मा.महापौर साो. प्रत्येक वेळेला आपण नाले साफ करतोय आणि तक्रारी येतात हे गृहित धरुन सुरुवातीपासूनच साफ सफाई करण्यापूर्वी फोटो काढणे आणि साफसफाई होण्यापूर्वी व्हिडिओ कॅसेट काढणे आणि साफसफाई झाल्यानंतर व्हिडिओकॅसेट काढणे संपूर्ण नाल्यांचे करुन ठेवलेले आहे. कुणालाही बघायचे असेल त्यावेळी व्हिडिओशुटींग बघुन आपण साफ केले व काही राहिले होते ते सुध्दा त्यांच्या इच्छेप्रमाणे करुन दिलेले आहेत. जर झालेलेच नव्हते असे जर म्हणत असतील तर आपण व्हिडिओकॅसेट केव्हाही दाखवायला तयार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही एकत्ररित्या बसून बघायला तयार आहोत.

**शुभांगी नाईक :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलते आताच आपणाला नाईक साहेबांनी सांगितले की गेल्यावर्षी नाले साफ केले हे मान्य आहे आम्हाला. मान्य आहे की, तुम्ही नाले साफ करता परंतु जे नाले साफ केले आणि काही ठिकाणी पाणी पावसाळयामध्ये हनुमाननगर याठिकाणी भरले गेले मग त्याचे उत्तर तुम्ही काय देणार ? नाले साफ मुख्यत होतच नाहीत हे खोटे आहे. अजूनपर्यंत कुठल्याही म्हणजे गोडदेव नाका हा मोठा नाला आहे. त्याठिकाणी अजिबात साफसफाई होत नाही गेल्यावर्षी जी घाण टाकलेली आहे ती अजून पर्यंत त्याच ठिकाणी ती आहे. साफ केलेली नाही.

**अनंत पाटील :-**

मा.अध्यक्षांच्या परवानगीने बोलतोय की जे नाले आहेत नाईक साहेबांनी बोलल्याप्रमाणे परंतु ज्या मिठाचा पाणी पुरवठा करणारा जो नाला आहे तो जवळजवळ पंचवीस ते तीस फुटाचा रुंदीचा होता तो आता एक ते दोन फुटाचा राहिलेला आहे. मग त्या खाडया साफ होत होत्या कि काय फक्त अंतर्गत गटारेच साफ होत होती. बाहेरील जो मलमुत्र जात होता त्याच्यामुळे जो साठा होता तो साठा कायमस्वरुपी आहे आणि त्यामुळे मिठागराना सुध्दा पाणी पुरवठा जाणारा खोची जो म्हणून आम्ही म्हणतो म्हणजेच आगरी समाजाचे लोक ज्यावेळेला मिठागरे पिकवतात तर खोची म्हणून जो आहे तर त्या खोचीमध्ये २५ ते ४० फुटाची होती तर जवळ जवळ दोन फुटावर आलेली आहे. याचा अर्थ नाले सफाई काम मिठागराना पाणीपुरवठा करणारा जो नाला होता तो संपूर्ण बंद झालेला आहे. कृपया त्याच्याकडे जर लक्ष नाही दिले तर आमची विनंती आहे की, आम्ही बेरोजगार होणार मिठ उत्पादन करणारे मिठागरे पिकवावी लागणार नाहीत म्हणून ते मोठे नाले तुम्ही जे.सी.बी.ने करु शकतात त्यात ब-याचशा खुंटे आहेत टिवरची झाडे त्या ठिकाणी वाढलेली आहेत. तर आपला जो गटारातून जाणारा कचरा आहे तो त्यात अडकतो. आणि पाणी जाणे बंद होते. तरी ती साफसफाई करणे आवश्यक आहे.

**मा.उपआयुक्त :-**

मा.महापौर साो. नालेसफाईच्या बाबतीत आपण मागच्या वर्षी पावसाळयापूर्वी नाले साफसफाई केली. त्यानंतर पावसाळा होऊन गेला पावसाळा होऊनही तीनचार महिने गेलेले आहेत. त्यामुळे त्यावेळेला साफ केलेले नव्हते हे आता प्रश्न उपस्थित करणे बरोबर होणार नाही कारण या कालावधीला जवळजवळ सहा सात महिने झालेले आहेत. पावसाळयामध्ये ही काही घाण वाहून अडकू शकते. यापूर्वी आता या चालू वर्षी साफसफाई करणार आहोत ते प्रत्येक सभासदाला समोर ठेऊन त्यांचे समाधान होईपर्यंत सही घेऊनच आपण साफसफाई पूर्ण करुन देणार आहोत.

**शरद पाटील :-**

मा.महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतोय माझी एक सूचना आहे त्याच्यावर मोठी जेसीबी असून नाले साफ करायला जिथे पोक्लंन लागते तिथे पोक्लॅनचा बंदोबस्त झाला तर मुख्य नाले साफ करण्यासाठी

चांगली व्यवस्था होईल आणि पोक्लॅनचा बंदोबस्त झाला पाहिजे जिथे जेसीबी जात नाही तिथे पोकलन गेले पाहिजे आणि मग ती नाले सफाई होईल अशी माझी सूचना आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर साहेब जे खोचीमध्ये आता अनंत पाटील यांनी सांगितले जे भराव चालू आहेत त्यामुळे मिठागराला पाणी मिळत नाही आपल्या राईमुर्धाची जी बाजू आहे संपूर्ण खाडीमध्ये डंपींग ग्राऊंडचा कचरा टाकलेला आहे. माझा स्वतःचा मिठागर आहे मी तीन पत्र देखील दिलेली आहेत. तुम्ही अशापध्दतीने टाकल्यानंतर मिठागराला पाणी मिळणार नाही तरी त्याच्यावर दुर्लक्ष केले जाते आणि आमचे मिठागर पिकले नाही याचा अर्थ असा नाही तिकडचे लोक बेरोजगार होणार आहेत. तिकडे घाण टाकण्याचे काम सुरु आहे. त्याबद्दल तीन पत्र दिलेली आहेत. तरी तिकडे भराव चालू आहे.

**मोहन पाटील :-**

मा.महापौर मॅडम नाल्यांचा साफसफाईचा विषय निघलेला आहे विषयांतर करत नाही परंतु आवश्यक बाब असल्या कारणाने हया शहरामध्ये प्रशासन चांगल्या पध्दतीने काम करते असा गोषवारा आपण करतो आहोत. प्रशासनाची एकेकाळी आपण पाठ थोपटतोय चांगले कामे झाली म्हणून परंतु ज्या जोमामध्ये या शहरामध्ये आणि महाराष्ट्राभरामध्ये संत गाडगेबाबा अभियान आपण सुरु केलेले आहे. थोडे विषयांतर वाटेल आमच्या सन्मानीय सदस्यांना कृपया आपल्याला विनंती करतो की, मला विषयावर थोडे जास्त नाही पण तीन ते चार मिनिटे बोलू दया. विषय साफसफाईचा निघालेला आहे आणि संत गाडगेबाबा अभियान ज्या पध्दतीने आपण शहरामध्ये सुरु केले जसे काही शहरामध्ये दिवाळी आली. दिवाळी आल्यानंतर आपण साफसफाई करतो आणि त्या दिवाळीचे स्वागत असे करतो की, वर्षभरामध्ये जी जळमटे असतील आमच्या मनातील जी जाळून काढून त्या दिपा पुढे आणि नवीन वातावरण निर्माण करतो. त्यापध्दतीने महाराष्ट्र शासनाने आपल्या या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये संत गाडगेबाबा अभियान सुरु केले. या अभियानाकरिता ना.मा.गायकवाड साहेब सुध्दा आले होते. महापौर होते, सन्मा पदाधिकारी होते, सन्मा अधिकारी होते, परंतु हे जे अभियान आपण जोमाने सुरु केले आहे ते अभियान या शहरामध्ये सुरु आहे कि नाही असे प्रश्न चिन्ह या मिरा भाईंदर शहरामध्ये झालेले आहे सन्मा सदस्य याठिकाणी आहेत त्यामध्ये मी ही सदस्य आहे कारण आपल्या शहराला प्रथम क्रमांक मिळेल अशापध्दतीने आपण जोमाने कामाला लागलो अधिका-याकडे त्या त्या विभागाच्या जबाबदा-या आहेत पाणीपुरवठा असू दे, नियोजन असू दे, आरोग्य असू दे सर्वसाधारण बघताना आपण बघतो की आरोग्य म्हणजे स्वच्छता अभियान अशा पध्दतीचे एकचित्र डोळयासमोर उभे रहाते. परंतु पाणी पुरवठयाच्या बाबतीत पाणी दुषित आले नाही पाहिजे. पाईप लाईन लिकेज झाल्या नाही पाहिजे. अशा पध्दतीचे या अभियानामध्ये ज्या पध्दतीचा जो डाटा आहे. संपूर्ण माहिती आहे हि संपूर्ण सन्मा.सदस्यांना ,सन्मा अधिका-यां पर्यंत पोचलेली आहृे आणि अशा पध्दतीचे अभियान या शहरामध्ये सुरु आहे कि नाही अशा पध्दतीचे वातावरण या शहरामध्ये सुरु झालेले आहे. तरी कोणत्या क्रमांकावर ही मिरा भाईंदर महानगरपालिका बक्षीस घेईल असा प्रश्न आमच्या सन्मा.सदस्यासमोर उभा राहिलेला आहे. परंतु कोणतीही प्रशासनाकडून स्वच्छता अभियाना मार्फत कार्यवाही केली जात नाही. आम्ही मागच्या स्थायी समितीपुढे अशा अधिका-यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत की आपण केलेले जे काम आहे आपण केलेले कार्य आहे. आपल्या विभागामार्फत स्वच्छता अभियानामार्फत कोणती कामे केली कोणती कामे करायला पाहिजेत ती का झाली नाहीत आणि कोणती कामे केली आहेत याचा गोषवारा पुढील स्थायी समितीपुढे ठेवावा असे मी सांगितले आहे. परंतु या शहरामध्ये अशा पध्दतीचे वातावरण आहे नाले साफसफाई नाहीत. तो त्याच्यातला एक अंतर्गत भाग आहे की, आपण ठेका पध्दतीने नाले साफसफाई करायला दिलेली आहे त्याच्यामध्ये कचरा आला आणि कचरा दिसतोय ही वस्तुस्थिती आहेत. परंतु आपण याठिकाणी आपण तो कचरा साफ केला पाहिजे. हे संत गाडगेबाबा अभियानामध्ये आज आहे आणि तसे असताना सुध्दा नालेसाफसफाई होत नाहीत. गटार साफसफाई होत नाही., रस्ते साफसफाई होत नाही पाणी दुषित येते अशा पध्दतीचे वातावरण या शहरामध्ये झालेले आहे. मी एवढंच सांगेन प्रशासनाला कि या ठिकाणी या अभियानामध्ये जातीने सहभाग घेऊन आपली जबाबदारी आपण पार पाडावी असे मी सांगू इच्छितो.

**रतन पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय मा.स्थायी समिती अध्यक्ष मोहनजी पाटील हयांनी जी वस्तुस्थिती मांडली ती खरी आहे आणि या नगराची साफसफाई करण्यासाठी आज ज्या प्रभागामध्ये आमचा प्रभाग क्र.२२ रेल्वे समांतर जे गटार आहे ते अत्यंत तुंबलेले आहे. तिकडचा कचरा काढला जातो वर काढला जातो तो परत

गटारात पडला जातो व गटार तुंबले जाते अशात-हेने बीपीरोडवरील सर्व गटारे तुंबली जातात. म्हणून त्या गटारातील कचरा काढून त्याची त्वरित विल्हेवाट लावण्यात यावी असे नियोजन ठेवावे.

**रोहिदास पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय, साधारणत: या सभागृहामध्ये चाललेली चर्चा सन्मानीय स्थायी समितीचे सभापती मोहनजी पाटील यांनी तळमळीने मांडलेला विषय मी थोडासा वेगळया पध्दतीने विषय मांडण्याचा प्रयत्न करीन की, एका बाजूने महापौरांचा शंभर दिवसांचा कार्यकाळ म्हणून पेपरला अत्यंत प्रगतीशील हे सर्व सभागृहाचे कामकाज, पक्षाचा युतीचा कारभार नीट नेटका चाललाय असा डंका पिटवत असतांनाच मोहनजीना मी धन्यवाद देतोय की, आमच्यावर जबाबदारी आहे असे आम्ही मानतो पहिल्या दिवसापासून की या सभागृहात चालणारे कामकाज या शहरामध्ये चालणारे कामकाज ज्याठिकाणी कुठे कमी पडेल सत्ताधारी पक्ष त्या ठिकाणी आम्ही बोट ठेवू असे वाटते आता स्थायी समितीच्या सभापतींनी त्याच्यावर बोट ठेवले की कामकाजच चालत नाही त्यांचा निधी कुठे संपतो तेही त्यांना समजत नाही.

**मोहन पाटील :-**

हे आपण चुकीचे बोललात. निधी कुठे संपतोय हा विषय नाही. विकासाचा विषय नाही. स्वच्छता अभियान हा महाराष्ट्र शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेत आहेत त्या करावयाच्या आहेत त्याचा गोषवारा मी येथे केलेला आहे. आमच्या विकास कामामध्ये आम्ही कुठे कसर केली नाही कुठे आमचा फंड वाया गेला आहे अशी कुठलीही पध्दत आमची नाही. तरी असे व्यक्तव्य आपण करु नये. कृपया सभागृहाची दिशाभूल करु नका.

**रोहिदास पाटील :-**

हा गांभीर्याचा विषय आहे त्यांनी तसा मांडला आम्ही असा मांडला पण निश्चित दिसून येते की, एवढे मोठे अभियान घेऊन या अभियानाचे बक्षीस मिळाव अशी सर्वांची तळमळ होती भावना होती. सगळया नगरसेवकांची त्याच्यावर खरोखर मनापासून निवेदन केले होते. कि आपल्या महानगरपालिकेला हयाचे बक्षीस मिळाव पण तसे न होता चित्र उलटच व्हायला लागले आणि ते उलटे चित्र किती दिवस चालवायचे कि संबंधितांना आपण दोषी ठरवायचे कि त्याला प्रगती करण्याचे दृष्टिने आज जे संबंधितांना चित्र दिसते त्यांनी त्यांच्या पध्दतीने मांडले आम्ही आमच्या पध्दतीने मांडले पण एक वस्तुस्थिती दिसते जे साफसफाई करतात. त्यांच्याकडे खरोखर साधनसामुग्री आहे का साधनसामुग्री नाही. ठेकेदाराचे मजूर हजर नसतात. त्याच्याकडे कोणतेही साहित्य नसते आणि दिवसेंदिवस त्यांच्याकडून महानगरपालिकेकडून कोणतीही कारवाई होत नाही. असे सभाग.हाचे मत पडत चालल्याकारणाने त्यामुळे इतकी शिथीलता आली आहे. जे झालेले अभियान जे बॅनर घेऊन फिरले की गाडगेबाबा महाराज अभियान सुरु झालेले आहे. त्यामुळे हया विषयावर फक्त सभागृहात चर्चा होते अणि जाते असे न होता त्याचा तितका निटनेटका तितका उहापोह होऊन पाठपुरावा होणे जरुरीचे आहे अशी सभागृहाची भावना आहे आणि पुन्हा एकदा मोहनजीना सांगतोय की असेच बोलायचा तुम्ही प्रयत्न करा आम्ही तुम्हाला धन्यवाद देऊ.

**शशिकांत शहा :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, हया सभेचे मोल आम्ही समजत नाही. परंतु प्रश्नाचे उत्तर मिळाल्यानंतरही दुस-या प्रश्नावर जातात हे बरोबर नाही हे मी नेहमी सांगितलेले आहे की, अर्धा तास हा प्रश्नोत्तराचा आहे. मी मा.महापौर साहेबांना विनंती करतो की, ज्या प्रश्नाचे उत्तर मिळेल त्यानंतर आपण दुस-यास परवानगी देऊ नये. नाहीतर हया प्रश्नाोत्तराच्या काळामध्येच आपला वेळ निघून जाईल. परंतु शहरातले जर काम करायचे असेल आम्ही स्व:त येऊन अधिका-यांना भेटून कामे ही होत रहातात याबाबत आमची काहीही तक्रार नाही. परंतु कामाच्या बाबतीत हे म्हणतात होत नाही आणि ते म्हणतात होते. या प्रकारचे वातावरण निर्माण करणे यात कुठलाही फायदा नाही . तरी आपण जातीने लक्ष देऊन या शहराच्या विकासासाठी प्रयत्न करायला पाहिजे आणि सर्वांनी एकत्र येऊन काम करायला पाहिजे. अशी माझी विनंती आहे. धन्यवाद.

**प्र.सचिव :-**

प्रश्न क्र.३ मदन उदितनारायण यांचा आहे त्यांना उत्तर दिलेले आहे.

**उपआयुक्त :-**

मा.महापौर सो. संत गाडगेबाबा महाराज अभियान संबंधी यापूर्वी वेळोवेळी चर्चा केलेली आहे. आणि हा विषय निव्वळ प्रशासनाचा नसून लोकप्रतिनिधीचा सुध्दा यात सहभाग आहे. यामध्ये एक चार पाच

दिवसापूर्वी स्थायी समितीची सभा झालेली होती त्या सभेमध्ये बायर इंडिया कंपनीवाल्यांना आपण समक्ष बोलविले होते. त्यामध्ये डासांची अळी नाश करणे आणि डास निर्मुलन करणे ही त्या कंपनीच्या अधिपत्याखाली माझा महानगरपालिकेचा कर्मचारी वर्ग दययाचा आणि त्यांनी तीन महिने पुन्हा औषध मारण्याची जरुरी नाही असे सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांचे प्रॅक्टीकल सुध्दा मा.स्थायी समिती सदस्यांनी पाहिलेले आहे ते दोन चार दिवसात त्यांची योजना घेऊन येणार आहेत. त्याप्रमाणे मा.स्थायी समितीसमोर मांडून ती कारवाई पूर्ण करणार आहोत या आठ दिवसापूर्वी २० तारखेपासून आपण प्रत्येक वॉर्डामध्ये ज्या महिला मंडळे, किंवा क्रिडा मंडळे, गणेशोत्सव मंडळे, शैक्षणिक संस्था आणि त्या वार्डामधील नगरसेवक आणि कर्मचारी वर्ग यांचे सामुहिक बैठकीचे प्रोग्रॅम करायला लावलेले आहेत त्याप्रमाणे आमचे नियोजन सुध्दा तयार करुन ठेवलेले आहे. प्रत्येक वार्डामध्ये त्या त्या शाळेमध्ये आपण शिक्षकांना सुध्दा कळविलेले आहे कि, मुलांच्या मार्फत स्वत:चे कुटुंब, शेजारीपाजारीची स्वच्छता ओपन फ्लॅटमध्ये कचरा टाकू नये. गटारीत कचरा टाकू नये यामार्फत आपण प्रत्येक बाबतीत आपण शाळेमध्ये मिटींग घेऊन शाळेच्या मुलांमार्फत घरापर्यंत पोचवण्याची ही योजना तयार केलेली आहे आणि त्या विभागातील सर्व सन्मानीय नगरसेवक, त्या विभागातील मंडळे आणि महिला मंडळे यांना समक्ष बोलावून प्रत्येक दिवशी एक मिटींग बोलावून समजावून सांगण्यात येणार आहे आणि त्यांच्यामार्फत ही कारवाई करणार आहे. दररोजची स्वच्छतेची जी कारवाई आहे ती चालूच असते यदाकदाचित तक्रार आल्यानंतर सकाळी जर तक्रार आली तर दुपारी ती तक्रार आपण दूर करतो. अशापध्दतीने सभासदांनी ज्या ज्या वेळी तक्रारी केलेल्या आहेत. मगत्या गटराविषयी असेल किंवा स्वच्छतेविषयी असेल मग कोणत्याही अतिक्रमणाविषयी असेल ज्या ज्या वेळी तक्रारी येतात त्या त्या वेळी लगेच आपण त्या दिवशी काम करुन घेतो मात्र ही प्रशासनाने व लोकप्रतिनिधीनी जर मनावर घेतले तरच हे संत गाडगेबाबा महाराज स्वच्छता अभियान यशस्वी होणार आहे. कृपया आपणसुध्दा यामध्ये सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करावे आणि प्रत्येक वार्डामध्ये आपण मिटींग घेऊन मंडळांना प्रोत्साहित करणे गरजेचे आहे आणि त्या वार्डातील शाळांना सुध्दा आणि शिक्षकांनासुध्दा यामध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यक्रम नियोजन करुन त्या त्या सभासदाच्या तारखा घेऊन आपण पुढील कारवाई करणार आहोत आणि ही योजना यशस्वी होण्यासाठी आपण सुध्दा सहकार्य करावे. अशी नम्रतेची विनंती करतो. आणी नागरीकांना सुध्दा यामध्ये सहभागी करुन घ्यावे आणि नागरिक, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन हे सर्वांनी मिळून ही योजना राबविल्यास महापालकेला बक्षीस मिळायला वेळ लागणार नाही कृपया यामध्ये सहकार्य करण्यास नम्र विनंती आहे.

**प्र.सचिव :-**

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**रतन पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, प्रश्नोत्तराचा तास हा संपलेला आहे. मी अभिष्टचिंतन ठराव एक मांडत आहे. हिंदूहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या ७६ व्या दि.२३.१.२००३ रोजी वाढदिवसानिमित्त मी हार्दीक अभिष्टचिंतन ठराव मी येथे ठराव मांडीत आहे.

**जयंत पाटील :-**

ही अभिष्टचिंतन ठराव मांडण्याची वेळ नाही. सभा संपताना तो ठराव आपल्याला मांडता येईल तसा नियम आहे असे मला वाटते. सचिव साहेब ठराव अभिनंदनाचा व दु:खाचा ठराव आपण कधी मांडतो.

**प्र.सचिव :-**

दु:खाचा ठराव आपण हा शेवटी मांडत असतो अभिष्टचिंतन ठराव हा अगोदर मांडला जातो.

**लिओ कोलासो :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, स्थायी समितीमध्ये यापूर्वी आपले सन्मानिय नविन आयुक्त साहेब आले आणि अशाच वेळी श्री.शिवमुर्ती नाईक साहेब हे गेले किंवा त्यांची बदली झाली अशी काही चर्चा उपस्थित झाली आणि स्थायी समितीने त्यावेळी अत्यंत प्रभावी पणे असा एक विचार मांडला की, शिवमुर्ती साहेब या नगरपरिषदेवर पहिल्यांदा मुख्याधिकारी म्हणून नंतर प्रभारी आयुक्त म्हणून राहिले आणि त्याचे कारकिर्द चांगल्याप्रकारे त्यांनी कार्य केले याच्याबद्दल त्यांच्या कामाचा एक भाग म्हणून या शहरवासियांच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीनेसुध्दा त्यांना शासनाच्या दरबारी त्यांची निश्चित अशी शिफारस करण्यात यावी आणि शिफारशीच्या सोबतच नियमामध्ये त्यांना दोन वेतनवाढी प्रस्तावित

करणेबाबतचा ठराव आम्ही मांडलेला होता त्याला मला वाटते या सभागृहाच्या मंजूरीची आवश्यकता असेल तर मी प्रतिपादन करत आहे.

**प्रकरण क्र. ३७**

इतिवृत्तांताच्या प्रती सर्वांना दिलेल्या आहेत इतिवृत्तांताबाबत काही सूचना असतील तर त्या पेजवाईत सांगितल्या तर बरे होईल

**रिटा शहा :-**

सुधारीत इतीवृत्तांत आपण आम्हाला दिलेले आहे त्यामध्ये मी जे पत्र दिलेले आहे त्याची इतिवृत्तांतात काही दुरुस्ती झालेली नाही.

**प्र.सचिव :-**

त्याच्यात दुरुस्ती केलेली आहे.

**रिटा शहा :-**

कशामध्ये दुरुस्ती केलेली आहे.

**प्र.सचिव :-**

सुधारणा केलेली आहे. गोषवारा दिलेला आहे कुठे कुठे सुधारणा केली त्याचा गोषवारा दिलेला आहे.

**रिटा शहा :-**

मी जे पत्र दिलेले आहे त्याबाबत काही सुधारणा केलेली नाही.

**प्र.सचिव :-**

कॉपीत आलेली आहे त्याची प्रत तुम्हाला दिलेली आहे.

**रिटा शहा :-**

कुठल्या. कॉपीमध्ये

**प्र.सचिव :-**

ज्या इतिवृत्तांतात घ्यायचे होते ते घेता आले नव्हते त्या ठिकाणी ते घेतलेले आहे.

**रिटा शहा :-**

मी संपूर्ण प्रोसिडिंग वाचले आहे त्याच्यामध्ये कुठे काहीच नाही. शेवटपर्यंत प्रोसिडिंग मी वाचली आहे. सुधारीत नक्की कुठल्या पेजवर आहे.

**प्र.सचिव :-**

हयाचा नाही. सुधारित आपण मुख्य रजिस्टरला लिहितो.

**रिटा शहा :-**

परत पाठवण्यामध्ये इंटेशन काय आहे. सुधारित म्हणून पाठविले आहे की, असेच पाठविले आहे.

**प्र.सचिव :-**

रजिस्टर मध्ये नोंद केलेली आहे. माझ्या कार्यालयात तुम्हाला पहायला मिळेल.

**रिटा शहा :-**

रजिस्टरला केले असेल पण हे परत पाठवायचे इंटेशन त्यामध्ये लिहिले आहे २०/११/२००२ च्या महासभेचे इतिवृत्तांत वरीलप्रमाणे सदस्यांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यामध्ये माझे नांवच नाही. माझ्या प्रश्नाचा त्यात उल्लेखच नाही. धनराज अग्रवाल यांनी सुचविलेली दुरुस्ती केली आहे. पण मी दुरुस्ती लेखी दिलेली आहे. तुम्ही दुरुस्ती करा ते यामध्ये नाही आहे. मागच्या मिटींगमध्ये मी जे काय बोलली त्याप्रमाणे ते आले नाही म्हणून मी उठून सांगितले होते तसे पत्र सुध्दा मी दिलेले आहे. एवढे मोठे चार पानाचे पत्र मी दिलेले आहे. मला सचिवाने ते पत्र देखील दोनतीन दिवस अगोदर दाखविले होते.

**प्र.सचिव :-**

पान क्र.२९ वर बारकुंड यांनी म्हटले १५ दिवसापूर्वी कनेक्शन लागले तसे त्यांनी खालीलप्रमाणे उत्तर दिलेले होते.

**रीटा शहा :-**

पण त्याच्यामध्ये तुम्ही नक्की वाचा फक्त नऊ लोकांना नाही नऊ लोक रहातात तशा बिल्डींगला नऊ कनेक्शन दिलेली आहेत असा उल्लेख करा म्हणून त्याचा परिणाम वेगळाच होता ना नऊ लोकांना दिले

म्हणजे किती कनेक्शन दिली तुम्ही काय लिहिले नाही त्याच्यामध्ये पाहिजे तर पुन्हा एकदा मी पत्र देते नजर चुक झाली असेल.

**प्र.सचिव :-**

तुमचे पत्र वाचून दाखवतो पान क्र.३० वर आहे ते

**रीटा शहा :-**

साहेब मी ते वाचले आहे माझे पत्र.तुम्ही निवांतपणे त्याला टॅली करा आणि मला त्याबाबत लेखी उत्तर दया.

**प्र.सचिव :-**

तसे लेखी उत्तर दिले जाईल.

**रिटा शहा :-**

पण साहेब नेहमी नेहमी नजर चूक चालणार नाही. कारण नेहमी नेहमी आम्हाला उठवायचे नेहमी नेहमी बोलवायचे हे पण बर नाही दिसत.

**प्र.सचिव :-**

आपल्याला तसे लेखी उत्तर दिले जाईल.

**रीटा शहा :-**

आणि दुसरा एक प्रश्न मी गेल्या मिटींगला प्रोसिडिंग बाबत विचारला होता कि ते कट झाल्यानंतर सांगेल तेव्हा आपले स्थायी समितीचे अध्यक्ष यांनी सांगितले होते की, ते बोलणारे आहेत ते हजर नाहीत आपल्या मिटींगमध्ये आणि माझे नशीब चांगले आहे की, शिवमुर्ती नाईक साहेब आपल्याकडे परत हजर झालेले आहेत. आपल्या कामासाठी आता ते हजर आहेत. ते कट झाल्यानंतर कसे कट केला आणि कोणत्या हिशोबानी कट केला त्याचे उत्तर मला मिळणार का ?

**मा.उपआयुक्त :-**

कसल्या हिशोबाने कट केले त्याचा प्रश्न इथे उद्‌भवत नाही. सभागृहामध्ये ज्यावेळेला निर्णय झाला कि ही कनेक्शन चुकीची झालेली आहेत आणि माझ्याही निर्देशनास आले चुकीचे झालेले आहे ते दुस-या दिवशी दहाच्या आत कनेक्शन कट केलेली होती

**रिटा शाह :-**

साहेब आपण दुस-या दिवशी दहा वाजता कट केल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देत आहे. कारण प्रशासन केव्हा चुका करतो आणि चुका मान्य करतो म्हणजे ती गौरवाची गोष्ट असते. पण आता मला असे वाटते की, मी असे ऐकले आहे की, ती कनेक्शन परत लावली आहेत आणि कोर्टाचा आदेश झालेला आहे आणि कनेक्शन परत लावली असे काय आहे काय ? काकडे साहेब काय जबाब आपल्याला दयायचा आहे. तो माईक मध्ये बोलून दया कारण की हे संपूर्ण सभागृहासाठी आहे. माझ्या एकटीचा प्रश्न नाही आहे हा.

**काकडे :-**

ते कनेक्शन दुस-या दिवशी कट केले होते सध्याची स्थिती सांगता येणार नाही खात्री करुन सांगेन

**रिटा शहा :-**

नाही पण एवढी कॉम्प्लीकेटेंट मॅटर आहे आणि तुम्ही अजून खात्री करायचा विचार करता आहात आणि खरोखरच मी आयुक्त साहेबांना माजी आयुक्ता साहेब होते त्यांना धन्यवाद देणार त्यांनी आपली चुका समजून प्रशासनाची चुक समजून ते कट केलेले आहेत. गेल्या वेळी विचारले होते ते न्यायालयाला प्रविष्ठ आहे असे मला उत्तर दिले होते तर मी गप्प झाली होती. न्यायालय आपले काम करणार आहे पण मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये बसणारे ऑफिसर्स , नगररचना विभागामध्ये आणि टॅक्स विभागाने जे चुकीचे रिपोर्ट हयांना सादर केले त्याबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिका पिठासिन अधिकारी आयुक्त वगैरे काय निर्णय घेणार आणि काय कारवाई करणार आपण आपली कारवाई करणार आहात की नाही. फक्त न्यायालयात न्याय प्रविष्ठ झाली म्हणजे गोष्ट संपली असे काय आहे का ?

**मा.उपआयुक्त :-**

त्यावेळेला नोटीस काढून खुलासा विचारले होते. खुलासा काय आला बघतो मध्ये मी पंधरावीस दिवस नव्हतो ती माहिती घेतो.

**रिटा शहा :-**

तुम्ही पंधरावीस दिवस नव्हते हे मला मान्य आहे. रिपोर्टपण सादर झालेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, चुका तर नक्कीच झालेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, चुकातर नक्कीच झालेली आहे आपण मान्य ही केलेले आहे प्रोसिडींगवर पण आलेले आहे. त्या ऑफिसर विरुध्द आपण काय कारवाई करणार ते सभागृहाला सांगा नियमानुसार काय कारवाई असेल तर ती करणार की नाही करणार

**मा.आयुक्त :-**

या विषयामध्ये ही बाब न्यायप्रविष्ठ झालेली आहे. इथपर्यंत जे सांगण्यात आलेले आहे तर न्यायालयाचा निर्णय जो काय लागला असेल तो तपासून जर आमचे कर्मचारी त्याच्यामध्ये दोषी असतील तर त्याच्यासाठी आपल्याला कारवाईचे वचन देण्याचा प्रश्नच नाही. तसे जर असेल तर निश्चितपणे त्याच्यावर कारवाई केली जाईल.

**रिटा शहा :-**

साहेब न्यायप्रविष्ठ आहे हे मला मान्य आहे. कुठलीही गोष्ट कुठलाही माणूस न्यायालयात जातो. प्रशासनाच्या विरुध्द तेव्हा आपणही आपली बाजू तेथे मांडतात. ती वेगळी गोष्ट झाली.

**मा.आयुक्त :-**

न्यायालयामध्ये बाजू मांडायचीच असते.

**रिटा शहा :-**

बाजू मांडताना तुम्ही मान्य करणार आहात की आमच्या कार्यालयातून चुका झालेल्या आहेत असे तसा रिपोर्ट सादर करणार आहात का तुम्ही न्यायालयात.

**मा.आयुक्त :-**

आम्ही मेरीट तपासून आणि आम्ही चर्चा करु त्या कोर्टामध्ये आम्हाला ज्या वेळेला आम्हाला फाईल ॲफिडेव्हीड करावी लागेल. सेफ फाईल करावी लागेल त्यावेळी कायदेशीर बाबी तपासून त्यासंदर्भात स्टॅन्ड घेतला जाईल.

**रिटा शहा :-**

कायदेशीर बाबी तुम्ही करा कायदया विरोधात मलाही जायचे नाही मी काय सांगते प्रोसिडिंगमध्ये उल्लेख झालेला आहे की प्रशासनाच्या चुका झालेल्या आहेत तसे तुम्ही रिपोर्टमध्ये देणार आहात का? सभागृहामध्ये उघडउघड गोष्ट झालेली आहे त्याच्यात काय तपासायचे राहिले आता.

**मा.आयुक्त :-**

हे बघा जरी सभागृहामध्ये चर्चेमध्ये तो विषय तशापध्दतीने मांडला गेला असेल तरी सुध्दा कागदपत्र डिटेलमध्ये तपासावी लागतील. निश्चितपणाने हे निर्णय कुणी घेतलेले आहेत हे तपासल्यानंतर त्यामध्ये स्टॅण्ड घ्यावा लागेल कारण कोर्टात जात असताना आपल्याला कायदेशीर जबाबदारी त्या त्या व्यक्तीची फिक्स करावी लागेल.

**रीटा शहा :-**

म्हणजे नगरपालिकेचे जे कायदे कानून आहेत त्याची मलाही थोडीफार जाणकारी आहे कि त्या बिल्डरने जेव्हा आपल्याकडे कनेक्शनची मागणी केली तेव्हा ती बिल्डींग अपूर्ण अनधिकृत होती कोर्टात मॅटर होती त्यानंतर ओ.सी नव्हती ओ.सी साठी त्याने पत्र टाकले. महानगरपालिकेच्या कायदयानुसार आठ दिवसाच्या आत येणार आहे.

**मा.आयुक्त :-**

मी आपल्याला तेच सांगतोय ही सगळी कागदपत्र माझ्यासमोर ज्यावेळेला येतील त्यावेळी तपासून आम्ही त्याच्यामध्ये निर्णय घेऊ.

**लिओ कोलासो :-**

मा.आयुक्त साहेब मी आपल्याला महापौरांच्या माध्यमातून आपल्याला या सभागृहाच्या कामकाजाबद्दल आपले लक्ष वेधू इच्छितो की आता आपल्यामध्ये हा जो सवाल जबाब चाललेला आहे त्यामुळे असे वाटायला लागले आहे की आम्ही कुठे तरी कोर्टात बसलेलो आहोत.

**रीटा शहा :-**

साहेब कोर्टामध्ये नाही प्रोसिडिंगमध्ये आलेले आहे. कोर्टाची गोष्ट मी काढलेली नाही हे चुकीचे बोलता.

**लिओ कोलासो :-**

कामकाजाची काहीतरी पध्दत आपल्याला असली पाहिजे रीटा मॅडम आपण एकवीस वेळा बोललात. चोवीस वेळा बोललात अशा पध्दतीचे कामकाज होणार नाही. आपले संपूर्ण विचार एकदाच मांडा आणि साहेब आपण पण प्रशासनाच्यावतीने जे काही संपूर्ण दयायचे असेल ते एकदाच उत्तर दिले पाहिजे अशी कामकाजाची पध्दत आपण ठेवली पाहिजे.

**रीटा साहेब :-**

मी बसलीच कुठे.

**मा.आयुक्त :-**

इतिवृत्तामध्ये जो काही बदल तुम्हाला अपेक्षित आहेत त्याच्याबद्दलच फक्त हा विषय असू शकतो कोर्टामध्ये प्रशासनाने काय स्टॅन्ड घ्यायचा हा लिगलच स्टॅण्ड असणार आहे आणि तो आम्ही अभ्यासपूर्वक देवू.

**रीटा शहा :-**

प्रोसिडिंगमध्ये तो विषय चर्चेला होता आणि तेव्हाच्या आयुक्तांनी हयाच्यामध्ये जबाब दिलेला आहे की कट झाल्यानंतर जबाब देणार आहे असा उल्लेख त्यामध्ये आहे बघा तुम्ही

**मा.आयुक्त :-**

हयाचा अर्थ हया आयुक्तांनी काहीच बघायचे नाही असा होत नाही.

**हेलन गोविंद :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय आयुक्त साहेब रीटा मॅडम परत परत तोच प्रश्न विचारतात. गेल्यावेळी सुध्दा हयाच्यावर बरीचशी चर्चा झालेली आहे. पुढच्या प्रश्नाला सुरुवात करा. सन्मा.सदस्या रीटा मॅडम सभागृहाचा वेळ वाया जातो. तुम्हाला विचारायचे असेल तर प्रत्यक्ष जाऊन तेथे विचारा.

**मिलन पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो की , ही सभा चालू आहे सभा महिन्यातून एकच वेळा होत असते. सभासदांनी हया तीस दिवसामध्ये आयुक्तांच्याकडे जाऊन महापौरांच्याकडे जाऊन त्याच्याप्रश्नांची जी काही उत्तरे असतील ती त्यांनी लेखी मागावी आणि सभागृहाचा वेळ घेऊ नये ही कृपया विनंती आहे. आणि कोणत्या नगरसेवकांना किती बोलण्याचा वेळ दयावा हे महापौरांनी ठरवायचे असते. प्रत्येक वेळी एकच सभासद एकएक तास अर्धा अर्धा तास बोलत असून ऑरग्यूमेंट करत असेल तर आम्ही सभागृहाचा वेळ वाया जाऊ देणार नाही. महापौर पाच मिनीटे किंवा दोन मिनिटे एका सभासदाला बोलण्याची परवानगी दयावी अन्यथा महापौरांनी आदेश दयावा आणि त्या सभासदाने खाली बसण्यास सांगावे.

**हेलन गोविंद :-**

दुस-याही सदस्यांना इथे बोलायचे आहे. एका सदस्याला बोलायला एवढा वेळ देऊ नका तुम्ही याची नोंद घ्या.

**लिओ कोलासो :-**

मा.महापौरजी आयुक्त साहेब सभासदांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी जे स्वातंत्र्य दिले पाहिजे आणि त्यांचा जो लोकशाहीतील हक्क आहे तो त्यांना दिला पाहिजे. त्याच्याशी कोणीपण कॉम्प्रमाईज करण्याचा कोणावरती अन्याय करण्याचा कोणाची गळचेपी करण्याचा प्रश्न येत नाही. कामकाजाची पध्दत ठेवली पाहिजे. कामकाजाची पध्दत अशी ठेवली पाहिजे जे काही मॅडमला व मला किंवा इतर कोणालाही विचारायचे असेल तर एका सिरीजमध्ये सगळेच व्यक्त झाले पाहिजे. एक जबाब त्यांनी दयायचा दुसरा त्याच्यावर पुन्हा ही काय कामकाजाची पध्दत हे नविन सभागृह आहे. हे ऐतिहासिक सभागृह आहे. हया सभागृहाचे जे कामकाज होणार आहे त्याचे कोणीतरी दहा पंधरा वर्षांनी मुल्यांकन करणार आहे हया सगळया गोष्टी विचारात घेऊन कामकाजाची पध्दत ठेवावी अशी आमची विनंती आहे.

**रीटा शहा :-**

साहेब मी कुठलीही भाषणबाजी केलेली नाही. राजकीय आहे नि ऐतिहासिक आहे. मी जो प्रश्न देतो त्याचे उत्तर तुम्ही देता ते मला पटल नाही तर मी परत विचारते. आणि विचारण्याचा अधिकार प्रत्येक सदस्याला आहे.

**हेलन गोविंद :-**

सन्मा सदस्या रिटा मॅडम तुम्हाला सांगितले आहे की, त्याच्या कार्यालयात जाऊन उत्तर विचारा कशाला सभागृहाचा वेळा वाया घालवता. दुस-या सभासदांना पण सभागृहात बोलायचे आहे. सभा चालू ठेवा आणि पुढच्या विषयाला सुरुवात करा.

**रीटा शहा :-**

एकही सदस्यांना बोलायचे नाही असे मी बोललेली नाही. सर्व सदस्यांना बोलायचे स्वातंत्र्य आहे मी कोणालाही सांगितले नाही की बोलू नका ते कशाला गप्प बसतात. हया प्रश्नाचे उत्तर तुमच्याकडे नसेल तर ठिक आहे.

**मा.आयुक्त :-**

मॅडम आपण एक गोष्ट कृपा करुन लक्षात घ्या कि आपण कशाप्रकारचे प्रश्न विचारत आहात सभागृहामध्ये.

**रीटा शहा :-**

मी प्रोसिडींगला जे आहेत त्याबद्दल विचारते.

**मा.आयुक्त :-**

प्रोसिडिंगचा त्याचा काही संबंध नाही ही मॅटर न्यायप्रविष्ठ असेल तर त्याठिकाणी प्रशासनाने काय स्टॅण्ड घ्यावा अशाप्रकारचे प्रश्न तुम्ही या सभागृहामध्ये कशासाठी विचारता जो काही कायदयाचा स्टॅण्ड असेल आणि मी त्याला उत्तर असे दिलेले आहे की, जी काही कागदपत्र असतील ती कागदपत्र तपासून त्याबाबतीत निर्णय घेतला जाईल. खर म्हणजे तुम्हाला स्विकारायला काय अडचण असायचे कारण नाही. त्याच्यात पूर्वी चर्चा झाली होती म्हणून तुम्ही तसाच स्टॅण्ड घेतला पाहिजे. असे आपण कसे काय म्हणू शकता म्हणजे मी कागदपत्र न बघता फक्त इतिवृत्तांतावरुन स्टॅण्ड घ्यावा का ?

**रीटा शहा :-**

न्यायालयाचा प्रश्न मी काढलेलाच नाही साहेब. मी फक्त यामध्ये नमूद केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही फक्त इतिवृत्तांतामध्ये काय चेंजेस अपेक्षीत आहेत ते जर इनकॉरपोरेट झाले नसतील ते करण्यापुरता आग्रह तुम्ही धरा, तो भाग संपला. न्यायालयात जे काही मांडायचे ते आम्ही निश्चित मांडू आणि न्यायालय हे इतिवृत्तांतावर चालत नसते. न्यायालयामध्ये इतरही बाबी असतात, डॉक्युमेंट्स असतात.

**रीटा शहा :-**

मी न्यायालयाचे विचारात नाही साहेब. तुम्ही माझा प्रश्न ऐकून घ्या. ह्याच्यामध्ये दिले आहे की, नगररचना विभागाने जो रिपोर्ट दिलेला आहे तो चुकीचा होता.

**मा. आयुक्त :-**

याची चर्चा जी आहे या सभागृहामध्ये करुन सर्वांचा वेळ वाया घालवण्यापेक्षा मला डॉक्युमेंटस् जे आहेत ते बघितल्यानंतर न्यायालयामध्ये मला माझा स्टॅंड घेता येईल.

**रीटा शहा :-**

डॉक्युमेंटस् माझ्याकडे नाहीत ते आपल्या कार्यालयात आहेत.

**मा. आयुक्त :-**

मग तो प्रश्न इथे उपस्थित करण्याचे कारणच नाही.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडम तुम्ही रुलींग द्या.

**रीटा शहा :-**

मग आता ह्या मॅडमला समजले कि, महापौर मॅडम रुलींग देतात.

**मा. महापौर :-**

पुढच्या विषयाला सुरुवात करा.

**रोहित सुवर्णा :-**

करेक्शन आहे. पान क्र. २१ मध्ये.

**मोहन पाटील :-**

पान क्र. २१ झाल्यानंतर २१ च्या पुढे कोणाला सांगायचे असेल त्यांनी अगोदर सांगावे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. २१, २४ आणि २९ खालून लाईन क्र. ६.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय. आपण जेव्हा सभेमध्ये इतिवृत्तांत वाचता तेव्हा पान क्र. १ पासून सुरु करावे आणि नंतर कोणाचा प्रश्न पान क्र. २१ वर असेल, कोणचा पान क्र. २५ वर असेल आणि पुन्हा तो पान क्र. २ वर येता कामा नये. तो सुरळीत चालेल. आपल्याला म्हणून पान क्र. १ मध्ये कोणाच्या सुचना असतील तर त्या पद्धतीने सन्मा. सदस्यांनी इतिवृत्तांत मंजूर करावा.

**प्रभात पाटील :-**

पान क्र. १ विषयी मी बोलते. मा. महापौर मॅडम परवानगी असावी. तिथे बी.एस.ई.एस. च्या ठरावाबाबत काही बदल केलेला आहे. जी ४८ प्रकरणे होती ती वाढवून ७२ केलेली आहेत. प्रगती आहे, समाधानही वाटले. परंतु कागदोपत्री तुमची प्रगती आहे. कोणतेही प्रकरण आतापर्यंत बी.एस.ई.एस. पर्यंत गेलेले नाही आहे. याच्या उलट मिरा भाईंदर शहरामध्ये ठिकठिकाणी बी.एस.ई.एस. चे पोल बंद आहेत ते चालू होणार की नाही ह्याचे मला उत्तर पाहिजे. कित्येक ठिकाणी लाईटचे पोल बंद आहेत. वेळोवेळी तक्रार करतो पण त्याच्यावर काहीही कारवाई होत नाही. बिल मात्र आपण भरत असतो आणि जनता मात्र काळोखातून प्रवास करीत असते, ये-जा करीत असते. पहिल्यांदा हे पोल कधी चालू होणार त्याचे उत्तर द्या.

**श्री. चव्हाण :-**

कुठल्या ठिकाणची नेमकी पोल बंद आहेत.

**प्रभात पाटील :-**

कुठल्या ठिकाणची बंद आहेत ते तुम्ही तुमच अधिकाऱ्यांना विचारा, खांबित असतील येथे. वारंवार आम्ही हेल्परगिरी करुन पोल नंबर आणून दिलेले आहेत तुमच्या अधिकाऱ्यांना.

**श्री. चव्हाण :-**

याकरिता चार माणेस ही नेमलेली आहेत.

**प्रभात पाटील :-**

काय करतात ती चार माणसे? तुम्ही जाब विचारु शकता त्यांना. मी सांगते बी.एस.ई.एस. च्या ठरावामध्ये सुद्धा तसे नमुद केलेले आहे की वारंवार विजेचे प्रॉब्लेम आहेत या शहरामध्ये. चार माणसे जी तुम्ही नेमली आहेत ती फक्त फेरी मारत असतात शहराममध्ये. ते कशासाठी फेरी मारतात ते मला माहित नाही.

**श्री. चव्हाण :-**

रोज अापिण बी.एस.ई.एस. ला पत्र देत असतो की, ही लाईट बंद आहेत व ही चालू आहेत.

**प्रभात पाटील :-**

मी आपणांस सांगते की, या सभागृहामधील किती नगरसेवकांच्या विभागामध्ये पोल बंद आहेत. जर त्यांना उभे केले तर मला असे वाटते की, साठ टक्के लोक उभे राहतील.

**श्री. चव्हाण :-**

जे पोल बंद आहेत त्याबद्दल त्यांना वेळच्या वेळी कळविले जाते.

**मिलन म्हात्रे :-**

बी.एस.ई.एस.च्या बाबतीत प्रभात ताईंना माझे पूर्णपणे समर्थन आहे. माझ्या वार्डामध्ये अजूनही पोल बरोबर लावलेले नाही आहेत. पोल वाकडे झालेले आहेत, काही पडलेले आहेत काही बरे आहेत आणि बऱ्याचशा वेळेला मी स्वतः लेखी पत्रव्यवहार केलेला आहे. त्याबद्दल माझे समर्थन आहे.

**प्रभात पाटील :-**

स्वतः आम्ही पोलचे नंबर तुम्हाला आणून देतो, तुम्ही बोलवा खांबीत यांना माझ्यासमोर, तसेच मुकणे यांना सुद्धा बोलवा. मी त्यांना एक वेळा नाही तर दहा वेळा पोलचे नंबर दिलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आणि त्याहीपेक्षा गंभीर बाब अशी आहे की, मी स्वतः अनेक वर्षापासून प्रस्ताव पाठविलेले आहेत. स्मशानभूमी, हॉस्पीटल, शाळा, कॉलेज वगैरे या ठिकाणी महत्वाचे रस्ते आणि बाजार या ठिकाणाचे प्रपोजल अजूनपर्यंत झालेले नाहीत. केवळ मात्र एक उदाहरण दिले की, आमच्याकडे पोल नाहीत.

**मा. आयुक्त :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, मला वाटते इतिवृत्तांत हा विषय आणि त्याच्या कारवाईचा जो विषय आहे हा एकमेकांमध्ये मिक्स होतो आहे. केलेल्या कारवाईबद्दल आम्ही आपणांस वेगळी माहिती देऊ. पण इतिवृत्तांतात जर काही बदल सुचवायचा असेल नाहीतर काय होईल की, पुर्ण दिवस आपल्याला इतिवृत्तांतच फायनल करावे लागेल.

**प्रभात पाटील :-**

इतिवृत्तांत १ नंबर पासून विषय घेतला म्हणून मी बोलते कारण हा विषय नेहमी येतो. परंतु त्याच्यामध्ये काही प्रगती होत नाही, हे मला सांगायचे आहे. आपण फक्त बीलंच भरायची का? नागरीकांना पहिल्या वीज आणि पाणी ह्या दोन आवश्यक गोष्टी पुरवायच्या असतात, तिथेच आपण कमी पडतोय.

**मा. आयुक्त :-**

ज्या काही तक्रारी असतील त्याच्याबद्दल केलेली कारवाई असेल ह्याच्याबद्दल वेगळी माहिती आपण विचारु शकता, ती आम्ही देऊ. फक्त इतिवृत्तांतामध्ये आपल्याला काही वाटत असेल की अशा ऐवजी असे असायला पाहिजे एवढ्यापुरती ही चर्चा मर्यादित असावी.

**प्रभात पाटील :-**

इतिवृत्तांत तसा मी बदल केलेला होता परंतु तरी सुध्दा तुम्ही इतिवृत्तांत बघा मी तेच म्हटलेले आहे आणि दुसरी मिटींग चालू झालेली आहे तरी त्यातला एकही पोल चालू झालेला नाही.

**मा. आयुक्त :-**

इतिवृत्तांतामध्ये काही विसंगती असेल तेवढी फक्त आपण निदर्शनास आणावी अशी आपल्याला विनंती आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेबांनी आता खुलासा केलेला आहे की, इतिवृत्तांत आपण दुरुस्ती करु शकतो. नियमाप्रमाणे ते बरोबर आहे. परंतु बी.एस.ई.एस. च्या विषयासंदर्भत सभागृहातील सर्वच सभासदांच्या भावना तीव्र आहेत. दोन ते अडीच वर्षापासून बी.एस.ई.एस. ला आपण जे पत्र पाठवतो, कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, आम्ही फक्त पत्र पाठवायचे काम करतो. चार माणसे तेथे नेमली आहेत. ती चार माणसे तिथे करता काय? काही माहिती नाही. इंटरेस्ट कोणत्या गोष्टीसाठी घ्यायला पाहिजे ते आपण प्रशासनानी ठरवायला पाहिजे. चार माणसे नेमून नुसते पत्र पाठविले. अडीच ते तीन वर्षापासून कामे होत नसतील. पोल शिफ्टींग होत नाहीत, नवीन बसवायची गोष्ट दुरच. आम्ही आता प्रभागात फेऱ्या मारल्या. संपूर्ण सर्वे केला. पाच महिने झाले तरी एक सुध्दा पोल शिफ्ट झाला नाही. कामे होत नसतील तर कशाला नगरसेवक म्हणून निवडून यायचे याबद्दल आम्ही लोकांना काय जबाब द्यायचा. आपले काम काय कागदावर फक्त कोंबडा काढणे एवढेच चालले आहे. दुसरे काय काम आहे. कारवाई व्हायला पाहिजे आणि मागच्या सभेत ठरलेले बी.एस.ई.एस. व्यवस्थित काम करीत नसेल तर टाटाला देऊन टाका. ते तरी व्यवस्थित काम करणार. बी.एस.ई.एस. ला कांदिवलीला पत्र पाठवतो ते लोकही लक्ष देत नाहीत. त्यांच्या डिपार्टमेंटचा तो विषय आहे तरी त्यांना सांगितले तुमचे ऑफीस भाईंदरला आणून ठेवा. जेणेकरुन बी.एस.ई.एस. चे प्रस्ताव आहेत ते इकडून सांभाळले जातील. प्रत्येक वेळी कांदीवलीला सदस्य जातात, प्रत्येक वेळी त्यांना भेटतात तरी कारवाई होत नाही. म्हणजे सदस्यांनी किती वेळा पाठपुरावा करायला पाहिजे. कामाची काही पध्दत आहे कि नाही.

**प्रभात पाटील :-**

साहेब या पलिकडची गंभीर बाब सांगते तुम्हाला की, आपले इंजिनिअर सांगतात तुम्ही जरा बी.एस.ई.एस. शी कॉन्टॅक्ट करा. मग त्यांनी आता खाली उतरायचे आम्ही त्यांच्या खुर्च्यांवर बसतो. मग आम्ही दोन्ही कामे करायची का?

**आसिफ शेख :-**

सत्ताधारी पक्ष असूनसुध्दा आम्हाला असे बोलावे लागते हे दुर्दैव आहे. खरे म्हणजे सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील, सभापती बोलते प्रशासनाच्या बाबतीत. खरे म्हणजे आम्ही तसे बोलायला नको पाहिजे. तरी नाईलाजास्तव बोलावे लागते. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील बोलले की, त्यांचे आम्ही अभिनंदन करतो म्हणजे ते जे काही बोलायचे ते विरोधी पक्षाने बोलायला पाहिजे तरी आम्ही या ठिकाणी बोलतो, ही शरमेची बाब आहे. आम्हाला असे या ठिकाणी बोलायला लागते. मा. आयुक्त साहेब या संदर्भात आपण स्वतः

जातीने लक्ष घाला. आपले अधिकारी, कर्मचारी या ठिकाणी चार नेमलेले आहेत असे सांगितले. कार्यकारी अभियंता यांनी नक्की त्यांची ड्युटी फिक्स करा. काम करत नसतील तर घरी बसवा. एकेकाला काहीतरी चालू करा, नवीन काहीतरी चालू करा. ही महानगरपालिको झालेली आहे. जे ग्रामपंचायतीमध्ये चालू होते तेच नगरपालिकेत चालू होते. आत नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. महानगरपालिकेचे काहीतरी काम लोकांना दिसले पाहिजे. नुसती दिशाभूल करण्याचे काम चालू आहे या ठिकाणी. तरी मा. आयुक्त साहेब मी आपणांस सभागृहाच्या वतीने विनंती करतो की, प्रत्येकाला जबाबदारी ही फिक्स करा. त्याला जी जबाबदारी दिलेली असेल त्याचा रिपोर्ट घ्यावा आणि जर तो काम करत नसेल तर सरळ त्याला घरी बसवण्यात यावे.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भात एक करता येण्यासारखे आहे, आपल्या सर्व सदस्यांना एक विनंती आहे की, आपल्या वार्डातील जे जे काही प्रश्न असतील बी.एस.ई.एस. संदर्भातील ते आपण या आठवड्यामध्ये एकत्रितरित्या माझ्याकडे द्या आणि बी.एस.ई.एस.च्या वरीष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक बोलावून त्या बैठकीमध्ये या प्रश्नाचा निर्णय आपण त्यांच्याकडून घेऊ.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, हा आता बी.एस.ई.एस.चा प्रश्न हा स्ट्रीट लाईटचा आहे तर कित्येक ठिकाणी आता प्रभात मॅडम यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला असून ती सत्य परिस्थिती आहे. पण ज्या ठिकाणी त्यांचा बी.एस.ई.एस.च्या केबलचा फॉल्ट होतो त्या ठिकाणी गाडी किंवा माणूस जाण्याचा हे नसतो म्हणजेच रस्ता नसतो. त्या कारणाने ती वायरिंग त्यांची सुटी असते. तिथे शॉक लागण्याची भिती असते. तर त्या कारणाने जर एखाद्या माणासाला शॉक जर लागला तर त्या माणसाची त्या घरामध्ये काय परिस्थिती होईल. मग आपण, त्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर लक्ष दिले पाहिजे, की बी.एस.ई.एस.ने कुठे कुठे रस्ते खोदलेले आहेत, कुठे कुठे फॉल्ट झालेला आहे याच्यावर योग्य ते लक्ष देऊन ते ताबडतोब रिपेअरींग करुन घेतले पाहिजे. त्यांचे आठ ते पंधरा दिवस खड्डे तसेच असतात तरी आपण त्यांच्यावर दुर्लक्ष न करता त्यांच्या वर लक्ष दिले पाहिजे. कारण धोकादायक आहे. म्हणून मा. आयुक्त साहेबांनी सुद्धा संपूर्ण अधिकाऱ्यांना आपण ही ताकीद देण्यात यावी अशी आपल्याला नम्र विनंती आहे.

**मा. उपायुक्त :-**

मा. महापौर साहेब, बी.एस.ई.एस.च्या अधिकाऱ्यांबरोबर एक चार दिवसांपूर्वी मी मिटींग घेतली. त्या मिटींगमध्ये त्यांची मागणी अशी होती की, रस्ता रुंदीकरण झालेले आहे. पोल वाकलेले आहेत किंवा गंजलेले आहेत. हे पोल नवीन बसवायचे असतील किंवा शिफ्ट करायचे असतील तर संपूर्ण शिफ्टींगचे चार्जेस महानगरपालिकेने भरावे आणि मगच आम्ही शिफ्ट करु, या मुद्यावर ते अडलेले होते. त्यानंतर आम्ही असे सांगितले की, पोलचे भाडे प्रत्येक लाईटच्या बिलामध्यून तुम्ही घेताय त्यामुळे पोलची किंमत निघून गेलेली आहे. नविन पोल बसवायचे असतील तर आम्ही शिफ्टींग चार्जेस देणार नाही किंवा गंजलेले पोलसूद्धा तुम्हाला फ्रिकॉस्टमध्ये बदलावे लागतील. त्यांनी मुंबईला एक टोटल पोल जेवढे आहेत त्या प्रत्येक पोलवर १५७ सरचार्ज लावतो आणि नवीन पोल फ्रि लावतो. शिफ्टींग जे करायचे आहेत, गंजलेले आहेत, वाकलेले आहेत या पोलला आम्ही फ्री करु. मात्र सर्व गावातले जेवढे सहा हजार पोल आहेत त्यावर १५७ सरचार्ज लावू आणि जेथे जेथे पोल वाकलेले आहेत किंवा शिफ्ट करायचे आहेत किंवा रोड वायडिंगचे बॉक्स काढायचे आहेत ते सर्व आम्ही चार्जेस न लावता काढू असे त्यांनी कबूल केले आणि त्याप्रमाणे आम्हाला पत्रही देऊन गेलेले आहेत. तो प्रस्ताव पुढील सभेपुढे ठेवण्यांत येणार आहे आणि आतापर्यंत ज्या ज्या नगरसेवकांनी जे पोल नविन मागितले होते ते पोल मार्चपर्यंत दिडशे पोल बसवून देतो असे कबुल केलेले आहे आणि आतापर्यंत जेवढी मागणी होती तेवढे सगळे पोल बसवून दिलेले आहेत. फक्त दिडशे पोल जिथे जिथे मागणी आलेली आहे ते मार्च पर्यंत त्यांचे दिडशे पोलचे बजेट शिल्लक आहे. ते दिडशे पोल आम्ही मार्चच्या पुर्वी बसवून देवू असे कबूल केलेले आहे आणि पुढच्या वर्षी जादा पोल जेवढे लागणार आहेत ते सभागृहाने सांगावे ते ही पोल आम्ही पुढच्या बजेटमध्ये धरु असे कबूल केलेले आहे. मात्र ज्या लाईट बंद असतात त्याबाबतीत मी चर्चा करु शकलो नाही. कारण त्याबाबतीत आम्ही संपूर्ण पुर्तता केलेली आहे असे बी.एस.ई.एस. च्या अधिकाऱ्यांनी आम्हांला सांगितले आहे कि, बंद पडलेले आम्हाला कळले कि तीन दिवसांत आम्ही लाईट लावतो. तीन दिवसाच्या वर जाऊ देत नाही असे त्यांनी म्हटले होते. परंतु आता सभागृहाच्या भावना बघता फारच दिवस बंद असतात असे मला समजले. पुन्हा एकदा त्यांना समक्ष बोलावून याबाबत कल्पना दिली जाईल आणि

त्यांच्या अधिकाऱ्यांची नांवे व वार्डवाईज अधिकाऱ्यांची नांवे विचारुन सर्व सभासदांना आम्ही कळवू. मात्र पोल शिफ्टींग आणि बॉक्स शिफ्टचा प्रश्न सोडवून घेतलेला आहे आणि नवीन पोलचा प्रश्न सोडवून घेतलेला आहे. फक्त प्रश्न राहतो लाईट बंदचा. तो प्रश्न आम्ही सर्व सभासदांकडून आणि आमच्या कर्मचाऱ्यांकडून यादी गोळा करुन आणि संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून आम्ही जाब विचारुन याबाबत आपल्याला सविस्तर माहिती देवू आणि त्यांचे अधिकाऱ्यांची नांवे आणि फोन नंबरसुध्दा आपल्याला देऊ. मा. महापौर, मा. . पिंजरकर, पाणी पुरवठा व जलनिसारण विभागाचे अधिकारी आलेले आहेत. त्यांचा विषय कृपा करुन सभागृहाने अगोदर संपवला तर हा विषय संपवून मग त्यांना काय विचारायचे असेल ते विचारुन घेतले तर बरं होईल. कारण त्यांना तातडीचे काम असल्यामुळे पुन्हा प्रोसिडींग कायम करुन झाल्यानंतर तो विषय येणार आहे. अशी सभागृहाला माझी नम्रतेची विनंती आहे. आपण पाणी पुरवठा विभागाचे जे अधिक्षक अभियंता आहेत त्यांना विषय पुढच्या पुढच्या क्रमांकावर आहे. आपल्याला काही विचारायचे असेल ते विचारुन घ्याल अशी माझी नम्रतेची विनंती आहे. जेणे करुन त्यांच्या कार्यालयात त्यांना तातडीने जाण्याचे सोयीचे होईल. आपण विचार करावा अशी नम्रतेची विनंती.

**प्र. सचिव :-**

इतिवृत्तांत प्रकरण ३७ बाबत चार पानावर काही ग्रॅमेटीकल मिस्टेक्स व सुचना आलेल्या आहेत. त्यांची दुरुस्ती नोंद केली जाईल. रोहित सुवर्णा यांच्या सुचना आहेत.

**प्रकरण क्र. ३७ :-** मागील सभा दि.१९/१२/२००२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. :-**

दि.१६/१/२००३ रोजी झालेल्या महासभेच्या वेळी मागील सभा दि.१९/१२/२००२ च्या इतिवृत्तांतात मा.सदस्यांनी सुचविलेल्या ग्रॅमेटीकल चुका दुरुस्त करुन सदरचे इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- आसिफ शेख** **अनुमोदन :- लिओ कोलासो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

(प्रभारी सचिव यांनी प्रकरण क्र. ३८ चे वाचन केले.)

**श्री. पिंजरकर :-**

मा. महापौर आणि सन्मा सभागृह मी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण. ५० द.ल.लि. अतिरिक्त पाणी पुरवठा योजना मिरा भाईंदर शहराकरीता राबविण्यात आली. त्याकरीता या मंडळाकडे ही जबाबदारी सोपवण्यांत आली होती आणि त्या दृष्टीने या योजनेचे काम आम्ही नोव्हेंबर ते जून ९८ मध्ये चालू केले होते. मध्यंतरीच्या काळात शासनाकडे बैठक झाली आणि मार्च २००१ मध्ये मिरा भाईंदर नगरपालिका क्षेत्रात काही प्रमाणांत पाणी पुरवठा करण्यांत यावा असे शासनाकडून आश्वासन देण्यांत आले होते. या आश्वासनाची पुर्ती करण्याकरीता या योजनेवरती दिवस रात्र काम करुन आणि शासनाला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मे २००१ मध्ये दहा ते पंधरा एम.एल.डी. पाणी आपण या नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध करुन दिले होते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने यात वाढ करुन आजच्या स्थितीला जवळ जवळ ६० द.ल.लिटर इतके पाणी या योजनेतून देत होतो. मध्यंतरीच्या काळात पाटबंधारे विभागाकडे जी एक बैठक झाली आणि त्याच्यामध्ये जो पाणी साठा आहे त्यामध्ये १० पाणी कपात सुचविण्यात आली होती आणि ही कपात सर्व क्षेत्रातील पाणी पुरवठा योजनांना लागू करण्यांत आलेली आहे आणि त्यामुळे आजच्या स्थितीला साधारणतः ५२ ते ५३ एम.एल.डी. इतके पाणी नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध होत आहे नविनयोजनेतून.जुनी अस्तित्वात जी योजना आहे त्याची देखभाल दुरुस्ती स्टेम प्राधिकरणामार्फत चालू आहे. त्यामुळे त्या योजनेतून सध्या पाणीपुरवठा होत नाही. या योजनेमध्ये या क्षेत्रामध्ये नवीन पाण्याच्या आठ टाक्या बांधायच्या होत्या त्यापैकी पाच टाक्या पूर्ण बांधलेल्या आहेत. त्यातुन पाणी पुरवठा आपण सुरु केलेला आहे. त्यानंतर ५४ किलो मीटर लांबीची वितरण व्यवस्था या शहरामध्ये आपण प्रस्तावित केली होती. ती पण वितरण व्यवस्था पूर्ण केली आहे आणि जे पाच झोन आहेत त्या पाच झोनवरील वितरण व्यवस्था आणि पाण्याच्या टाक्या ह्या दोन्ही पुर्ण केलेल्या आहेत. सध्या दोन टाक्या ज्या आपल्या आहेत त्या प्रगती पथावर आहेत. त्यापैकी सर्वात मोठी टाकी नवघर क्षेत्राकरीता आहे. तिथे काम प्रगती पथावर आहे आणि तिचे आता रुफ स्लॅबचे काम सुरु आहे. अंदाजे

एप्रिल २००३ मध्ये ही टाकी पुर्ण करुन त्यातुन पाणी पुरवठा सुरु करण्याचे आमचे उद्दीष्ट आहे आणि त्याचबरोबर कनाकिया पार्क येथे सुध्दा पाण्याची टाकी आहे. तीचे सुध्दा बांधकामा चालू आहे. बॉटम स्लॅबचे काम झालेले आहे आणि ही सुध्दा टाकी जून २००३ पर्यंत पुर्ण करण्याचा आमचा प्रयास आहे. त्यानंतर एम.आय.डी.सी. लो लेव्हल ही सुध्दा टाकी तयार आहे. परंतु थोडा तिथे मातीचा भराव केला तर ती सुध्दा टाकी आम्ही ह्या महिन्यामध्ये चालू करु शकू. आम्ही महानगरपालिकेला विनंती केलेली आहे की, हा भराव लवकरात लवकर करुन द्यावा. जेणेकरुन टाकी भरल्यानंतर पाण्याच्या दाबामुळे तिथे काही धोका येऊ नये म्हणून ती भरावाची पण व्यवस्था मा. आयुक्तांनी मंजूर केलेली आहे. ते पण काम पुर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठा लवकर सुरुवात करण्यांत येईल. याचबरोबर पाण्याच्या टाक्या भरण्याकरीता काही ठिकाणी आपण संम्प व साठवण टाक्या प्रस्तावित केल्या आहेत. त्यापैकी अस्मिता पार्क येथील संम्पचे काम झालेले आहे आणि पंम्पींग मशिनरी बसवण्याचे काम चालू आहे. ती सुध्दा साधारणतः फेब्रुवारी महिन्यात पुर्ण होण्याची शक्यता आहे आणि दुसरी जी पाण्याची साठवण टाकी आहेत ती, एम.आय.डी.सी.च्या दोन टाक्या भरण्यासाठी एक साठवण टाकी मोठी चालू आहे. तीचे सुध्दा साठवण टाकीचे काम चालू झालेले आहे आणि पंम्प हाऊसचे काम सध्या चालू आहे. ते सुध्दा या दोन महिन्यात पुर्ण करण्याचा विचार आहे. या व्यतिरिक्त नवघर भागाकरीता जी आपण पाण्याची उंच टाकी केलेली आहे ती टाकी भरण्याकरीता ४.५ द.ल.ली. क्षमतेचीएवढी मोठी साठवण टाकी प्रस्तावीत केली होती. आपण त्या बाजूला मूळ योजनेप्रमाणे ती शाळेच्या बाजूला जागा दिलेली होती. नगरपरिषदेने त्यावेळेला ती जागा तिथे बांधण्याचे प्रस्तावित होते. ती जागा उपलब्ध होऊ शकली नाही म्हणून आता जो रवाडीचा भाग आहे त्या ठिकाणी जी आता पाण्याची टाकी आहे त्याच्या बाजूलाच साठवण टाकीसाठी जागा दिलेली आहे आणि ही जागा पुर्णपणे पाण्यामध्ये आहे. जवळ जवळ दिड ते दोन मीटर स्टँडींग वॉटर आहे आणि या ठिकाणी काम करतांना आम्ही इ.एस.आर.चे जे काय केले त्या ठिकाणी आम्हाला ज्या अडचणी आल्या त्यातील पहिली अडचण म्हणजे, त्या ठिकाणी पुर्ण पाणी स्टँडींग असल्यामुळे पूर्ण मातीचा मरुमचा भराव लेवल करण्याकरीता आवश्यक आहे आणि हा खर्च जवळ जवळ आठ ते साडे आठ लाख रुपये आहे. त्यानंतर भराव केल्यानंतर तेथे जे काम करायचे आहे ते पायलिंग वरती काम करायचे आहे. या भागात काम करताना आमच्या असे लक्षात आलेले आहे कि, पाईल्स जे आहेत हया जनरली अठरा ते वीस मीटरच्या खोलीपर्यंत आपल्याला न्यायच्या आहेत आणि हे पायलिंगचे काम करीत असतांना पाईल करता येत नाही. स्टँड सारखी बाहेर येते. तर त्यामुळे तेथे एम.एस. केसींग पाईप सुध्दा हे करावे लागतात आणि हा सर्व खर्च केल्यानंतर जवळ जवळ या ठिकाणी टाकी बांधायचे आपण प्रस्तावित केले तर १ कोटी ४१ लाख रुपये खर्च येण्याची शक्यता आहे. म्हणजे आपल्या मंजूर निविदेप्रमाणे आणि हा खर्च करीता असतांना बाकीच्या कामाच्या अडचणी आहेत. साठवण टाकी असल्यामुळे आपल्याला जास्तीत जास्त काळजी घेण्याची आवश्यकता आहे. कारण पिण्याचे पाणी आपण ह्यात साठवणार आहोत. ४.५ द.ल.लि. एवढ्या क्षमतेची मोठी टाकी आहे. त्यामुळे त्याच्यामधेच कोणत्याही प्रकारचे प्रदुषण होऊ नये किंवा पाणी दुषित होऊ नये याची काळजी घेण्याकरीता टाकी थाडी उंचावरच बांधायची आहे. तर हा खर्च साधारणतः १ कोटी ४१ लाख रुपये आहे. मध्यंतरीच्या काळात मागे सुध्दा आम्ही असा प्रस्ताव दिला होता. एवढा मोठा भराव करायचा नंतर खाडीच्या भागामध्ये टाकी बांधायची आपल्याकडे कनकिया पार्क येथे जागा आहे. आपण सध्या ज्या ठिकाणी टाकी बांधतोय त्या ठिकाणी आपल्याकडे जागा आहे आणि साधारण ३५ मीटर x ३५ मीटर एवढी जागा आपल्याला टाकी बांधण्याकरीता लागणार आहे. तर या ठिकाणी बांधतांना कनकिया पार्क येथे टाकी बांधताना पाईल्सची डेप्थ सुध्दा कमी आहे. १० ते ११ मीटर डेप्थ आहे. सँड ब्लोईंगचा प्रॉब्लेम नाही आहे. एम.एस. केसींग पाईप वगैरे वापरावे लागणार नाहीत आणि मुख्य बाब म्हणजे जे साचलेले पाणी आहे त्यामुळे इथे टाकी बांधताना साधारणतः ८१ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. म्हणजे साधारणतः ६० लाख रुपये एवढे महापालिकेचे सेविंग होणार आहे. या दोन ठिकाणी टाक्या बांधतांनला टेक्निकल त्यामध्ये कनकिया पार्क इथूनच नवघर पाण्याची टाकी भरण्यासाठी जी पाईप लाईन आहे ती कनकिया पार्क पासूनच जाते आणि कनकिया पार्क पासून जात असताना ही जर टाकी आपण कनकिया पार्कला बांधली तर तेच कनेक्शन आपल्याला कनकिया पार्कला करता येईल आणि कनकिया पार्कची जी वेगळी टाकी आहे, स्वतंत्र टाकी जी आहे १ एम.एल.ची ती वेगळीच राहणार आहे, ती नवघरच्या टाकी ऐवजी कनकिया पार्क येथे शिफ्ट करायचा विचार आहे आणि ही शिफ्ट केल्यानंतर त्या ठिकाणी दोन टाक्या राहतील. एक टाकी ती पुर्ण कनकिया पार्क साठी सेपरेट राहीले आणि दुसरी टाकी नवघरसाठी राहील त्याचे पंप सगळे तेथे वेगळे राहतील. कनकिया पार्कचे पंप वेगळे राहतील. दोघांचे ऑपरेशन वेगळे राहतील.

दोघांच्या लाईनी वेगळ्या राहतील. त्यामुळे अशी काही शक्यता नाही की कनकिया पार्कची टाकीत पाणी भरले म्हणजे नवघरच्या टाकीला पाणी जाणार नाही. दोन्ही स्वतंत्र पाईप लाईन राहतील, दोन्ही स्वतंत्र टाक्या राहणार आहेत. दोन्ही स्वतंत्र पंप हाऊस राहणार आहेत आणि हे करत असतांना आपली वेळेचीही बचत बरीच होणार आहे. त्यामुळे नवघरला टाकी बांधण्याचे प्रपोजल केलेले आहे. अजून त्याला सुरुवात केलेली नाही आहे तरी सुरुवात करण्यापुर्वी महानगरपालिकेला प्रस्ताव दिलेला होता की, ही जागा बदलण्याचा प्रस्ताव झाला तर आता नवीन कामांची टेंडर्स काढलेली आहेत. त्यामध्ये हे काम कनकिया पार्क येथे घेण्यात येईल आणि जेणेकरुन साधारणतः ६० लाख रुपये महापालिकेचा खर्च वाचू शकतो. त्याचप्रमाणे गोडदेव येथे आम्ही संम्पचे काम चालू केले होते. महानगरपालिकेने जी जागा दिली त्यावेळी पाईल्सचे काम चालू केले होते. त्या ठिकाणी जी साठवण टाकी बांधायची आहे त्याची दोन एम.एल. कॅपेसिटी होती आणि जवळ जवळ नव्वद पाईल्सवर टाकी बांधयची होती. त्यापैकी चाळीस पाईल्सचे काम झाल्यानंतर त्याचे जमीन मालक होते. ही खाजगी जमीन निघाली आणि त्या जमिन मालकाने आम्हाला अडविल्यानंतर ते सगळे काम बंद झालेले आहे आणि अजूनपर्यंत ती जागा उपलब्ध होऊ शकलेली नाही आणि जमीन मालकाने जवळ जवळ ४० ते ४५ लाख रुपये एवढे मुल्य आहे त्याची मागणी केलेली आहे. तर महानगरपालिकेने त्याबाबत विचार करण्यांत यावा आणि हे मुल्य धरुन त्या टाकीची किंमत साधारणतः ८७ लाख येते, बांधायची असेल तर त्याऐवजी जून्या स्कीममध्ये रेल्वेगेटच्या तिथे आपली साठवण टाकी आहे. जुनी अस्तित्वातील साठवण टाकी आहे. ही साठवण टाकीची क्षमता पॉईंट ६५ एम.एम. आहे. क्षमता कमी आहे. परंतु ही साठवण टाकी रिपेर्स केल्या. साधारणतः बॉटम, स्लॅब आणि वॉल्स ह्याचे जर रिपेर्स केल्या तर ही टाकी आपल्याला वापरता येईल आणि त्या टाकीतुन आपल्या गेटच्या समोरच पाईप लाईन जाते, गोडदेवला जाणारी. त्यामध्ये गोडदेवला जाणारी थोड सी.सी. लाईन टाकली तर हे जे अस्तित्वातील संम्प आणि पंप हाऊस आहे ह्याचापण वापर करता येईल आणि हे रेक्टीफिकेशन करण्याकरीता १५ ते २० लाख रुपये खर्च आहे. फक्त त्याऐवजी गोडदेवला टाकी बांधली तर ८७ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. म्हणजे या ठिकाणी सुद्धा आपले ६० लाख रुपये वाचू शकतात. तर ह्या दोन्ही कामाच्या निविदा झालेल्या आहेत. परंतु जागेचा आणि हा जो प्रस्ताव आहे हा महानगरपालिकेने मान्य केल्यास नवीन जागेवरती टाकी बांधण्याचे काम प्रस्तावीत करण्यांत येईल. हे थोडक्यात ह्या दोन्ही योजनेचे स्वरुप आहे. म्हणजे ज्या टाक्यांसाठी प्रॉब्लेम थांबलेला आहे. बाकी या शहराकरीता जी अतिरिक्त पाणी पुरवठा योजना होती म्हणजे बचतीतून काम करायचे होते, मा. मंत्री पाणी पुरवठा विभाग यांच्या दालनात झालेल्या बैठकीनुसार डोंगरी, राई-मुर्धे, उत्तन या भागाकरीता आपण नवीन पाईप लाईन प्रपोज केलेली आहे. त्याच्या निविदा झालेल्या आहेत. फक्त एक अडचण होती की, नवीन योजना महानगरपालिकेने हस्तांतरण करुन गेल्यानंतर या योजनेचे काम चालू करण्यात यावे. त्याप्रमाणे १२ डिसेंबर ला महानगरपालिकेने योजना हस्तांतरीत करुन घेतलेली आहे आणि त्यामुळे टेंडर्स ह्या दोन्ही योजनेचे झालेले आहेत आणि आता याप्रमाणे जागाही मिळालेल्या आहेत. डोंगरी, राई-मुर्धे, उत्तनच्या आणि लवकरच आपण कामाची सुरुवात करतोय. त्यापैकी पाईप लाईनचे जे काम आहे, ब्रम्हमंदीरच्या समोर पाईप लाईन आलेली आहे. ६१० मीटरची त्याचे पण दोन तीन दिवसात काम चालू करण्यांत येईल. तर ह्या दोन्ही योजनेबाबत आपल्या शंका असतील, मा. सभासदांच्या, तर त्याबाबत खुलासा करता येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिक्षक अभिंयता मा. पिंजरकर यांनी जागा बदलायच्या किंवा जागा रद्द करण्याच्या संम्पच्या संबंधी येथे वक्तव्य केलेले आहे. या योजनेचा शुभारंभ होऊन आज जवळ जवळ चार वर्षे होत आली. ज्या वेळी या योजनेचे संकल्प चित्र तयार केले. या सभागृहाने नगरपरिषदेच्या कालावधीमध्ये दिलेल्या मंजुरीनुसार मिरा भाईंदर मध्ये ५० द.ल.लिटर्स पाण्याच्या वाटपासाठी समान वाटपासाठी वेगवेगळ्या ठिकाणी ई.एस.आर. म्हणजेच उंच पाण्याच्या टाक्या जी.एस.आर. संम्प म्हणजेच भूमिगत पाण्याच्या टाक्या अशा प्रस्तावित केल्या. याला संपूर्ण टेक्निकल संक्शन एम.जी.पी. ने दिलेले आहे. याच्यासाठी चौदा टक्के आमच्याकडून चार्जेसवसूल केलेले आहे. कुठेही कमी न करता या योजनेसाठी ६४ कोटी रुपयांमधून जवळ जवळ ५० कोटीपेक्षा जास्त कर्ज या ठिकाणी आम्हाला एम.एम.आर.डी.ए.ने दिलेले आहे. ही योजना करत असतांना एम.एम.आर.डी.ए., तत्कालीन नगरपालिका आणि एम.जी.पी. या तिन्हीमध्ये ट्रॉय पार्टी ॲग्रीमेंट झालेले आहे आणि या योजनेवरती त्याचा संपूर्ण अहवाल घेणेसाठी वेळोवेळी त्रिसदस्य समितीने सभा घेतलेल्या आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अशा प्रकारे सम्पच्या जागा बदलण्यासाठी आणि ई.एस.आर.च्या जागा बदलण्यासाठी अशी अनेक प्रपोजल आणलेली

आहेत. आतापर्यंत जेव्हा जेव्हा सभा झाल्या एम.एम.आर.डी.ए. च्या कार्यालयात असो किंवा मंत्र्यांच्या मा. नामदार आर. आर. पाटील साहेब यांच्या कार्यालयात जेव्हा सभा झाल्यात तेव्हा अशा प्रकारच्या सगळी त्याची निवेदने होती. जागा संदर्भात ती सगळी फेटाळून लावली आहेत. आज ही योजना सुरु झालेली आहे आणि आता त्यांनी सांगितल्याप्रमाणे ५२ एम.एल.डी. पाणी येते आहे. ५२ एम.एल.डी. पाणी हे ५० एम.एल.डी. मधून येत नाही आहे. तर ५० एम.एल.डी. मधून फक्त २४ एम.एल.डी. पाणी आपण घेऊ शकलो आहोत. म्हणजेच ही योजना त्यांनी पुर्ण केली असे म्हणता येणार नाही. त्याचा अर्थ दुसरा होतो की, सम्पच्या जागेसंबंधी आज या ठिकाणी प्रस्ताव आणलेला आहे. या ठिकाणी एक महत्वाची बाब अशी आहे की, जेव्हा ही योजना तयार करण्यात आली तेव्हा प्रस्तावित ई.एस.आर. आणि प्रस्तावित सम्पच्या संकल्पचित्र ह्या एम.पी.जी.कडे कधीही अव्हेलेबल नव्हते. नगरपालिकेने जागा उपलब्ध करायची ती जागा खाजगी असो, सरकारी असो. त्यासंबंधी कुठलीही नुकसान भरपाई देण्याचे या योजनेमध्ये तरतूद केलेली नाही आहे. नगरपालिकेने वेळोवेळी तत्कालीन पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने तत्कालीन नगरसेवकांच्या सहकार्याने वेळोवेळी अशा जागा त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. यापुर्वी नवघरच्या ठिकाणी जिथे इ.एस.आर. बांधण्यात यायची होती त्या ठिकाणी पोलिस स्टेशन होते, बाजूला शाळा होती. तिथल्या स्थानिक नगरसेवकांनी त्यासंबंधी काही सुचना केल्या म्हणून अगदीच बाजूला ही जागा देण्यांत आली. आज ह्या ठिकाणी जो काही विषय आणलेला आहे जागा बदलासाठी यामध्ये पैशाची किंमत जी वाढणार आहे असे त्यांचे जे म्हणणे आहे त्या अनुषंगानेच मी बोलु इच्छितो कि, ज्यावेळी त्यांना पूर्ण अधिकार दिले असतांना नवघरच्या ठिकाणी इ.एस.आर. बांधतांना जेव्हा संकल्प चित्र तयार केले गेले तेव्हा कुठल्याही प्रकारचे साईड फिक्स न होता? ह्या ठिकाणी टाकीचे काम सुरु केले आणि नंतर बोरींग पाईल मारायला घेतल्या तेव्हा सँड ब्लो आहेत. असे समजल्यानंतर स्केसिंग पाईप पायलिक करण्याच्या बाबतचा प्रस्ताव पुढे आला आणि पुन्हा संकल्प चित्र तिसऱ्यांदा मंजूर केले. तीनवेळा संकल्प चित्र बदलली आणि आताशी कुठे नवघरच्या इ.एस.आर. त्यांची कॅपॅसिटी या संपूर्ण योजनेमध्ये जेवढे इ.एस.आर. आहेत. ईव्हन महाराष्ट्रामध्ये एवढी मोठी स्कीम पहिल्यांदाच जरी उशीरा झाली तरी ती चालू होत आहे आणि त्याच्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी महाराष्ट्रामध्ये योजना झाल्या आणि भाईंदरमध्ये योजना झाल्या तर सगळ्यात मोठी इ.एस.आर. नवघरला आहे. २.५ एम.एल.डी. या इ.एस.आर.ला त्याला पाणीपुरवठा करण्यासाठी त्या ठिकाणी संम्प असावी असा त्यांनीच मांडलेल्या संकल्प चित्रामध्ये म्हटलेले आहे आणि त्या ठिकाणी साडेचार एम.एल.डी.ची टाकी प्रस्तावीत केली गेली. आतापर्यंत टाकीची जागा मिळत नाही म्हणून वाद होता. आता टाकीची जागा दिल्यानंतर त्या ठिकाणी सॅन्ड ब्लोईंग होते म्हणून ती टाकी व्यवस्थित होणार नाही. या ठिकाणी गंमतीची बाब आहे. सर्वांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, जेव्हा सम्पच्या जागा निश्चित नाहीत. सम्पचे संकल्पचित्र निश्चित केलेले नाही. सम्पचे बांधकाम करतांना जास्त खर्च येईल. ८० लाख येईल, ६.० लाख येईल. हे सगळे जर माहिती होते तर संम्प वरती जे पंम्प हाऊस बांधायचे आहेत ते पंम्प हाऊस न बांधता अगोदरच तीन कोटीच्या मशिनरी एम.जी.पी.ने खरेदी केलेल्या आहेत. हे तीन कोटी रुपये कुठून आले ते कर्ज आम्ही घेतले, या तत्कालीन नगरपालिकेने. त्या कर्जावरती व्याज आम्ही भरतोय आणि ही पंम्पींग मशिनरी गेल्या तीन वर्षापासून भिवंडी येथील वेअर हाऊस मध्ये पडलेली आहे. मध्यंतरी यांचाच प्रस्ताव आला की, आम्ही ही मशिनरी दुसरीकडे देतोय त्यावेळी मी तिथे विरोध दर्शविला की, ही मशिनरी आम्ही दुसरीकडे देणार नाही. जेव्हा तुम्हाला गरज लागेल तेव्हा आम्ही तुम्हाला मशिनरी देणार का? कारण ही मशिनरी १७८ बिलोने हे टेंडर झालेले आहे. ती मशिनरी घेतलेली आहे ती तशीच पडलेली आहे. दुसऱ्या योजनेवरती वापरल्यावर त्याच भावात तुम्ही आम्हाला मशिनरी देणार का? तेव्हा यांनी सांगितले, देता येणार नाही. मग त्या मशिनरीचा वापर करायचा राहीला बाजूला. त्याच्यावरती खर्च करुन मोकळे झाले. त्याच्यावरती आम्ही व्याज भरत आहोत. आज संम्प बांधायची पाळी आली त्यावेळी त्या ठिकाणी निव्वळ साडेचार एम.एल.डी.चा संम्प आहे. सर्वात मोठा संम्प कॉन्टॅमिनेशन ऑफ वॉटर त्या ठिकाणी खाडीचे पाणी. त्या ठिकाणी खाडी नाही आहे त्या ठिकाणी इ.एस.आर. झालेला आहे. पाच माळ्याच्या इ.एस.आर. ज्या ठिकाणी होतो त्या ठिकाणी काय भूमिगत पाण्याची टाकी होऊ शकत नाही. जर कॉन्टॅमिनेशन होत असेल पाणी जर खाडीचे येत असेल तर एलिमिटर संम्प बांधयची पद्धत आहे. आपण पातळीपाडयाला एलिमिटर संम्प बांधला. आपण तो का बांधला भूमिगत पाण्याची टाकी पण उंच जमीनीच्या पृष्ठभागापेक्षा जरा उंच टाकी कि, पावसाचे पाणी आत येऊ नये. या ठिकाणी खाडीचे पाणी आत येईल म्हणून भूमिगत पाण्याची टाकी बांधण्यामध्ये अडचण होईल. ही अडचण होईल ही सबब पुढे आणलेली आहे. तुम्ही सांगता आहात तसे करायचे झाले तर ज्या ठिकाणी कनकिया

मध्ये जागा उपलब्ध झालेली आहे. त्या ठिकाणी ७११ एम.एम. व्यासाची फिडरमेन लाईन घोडबंदरवरुन पास होऊन आमच्या नवघर भागात येते. नवघरवरुन त्याचे फिडींग पुढे जेसलपार्कच्या टाकीला आहे. संम्पचा वापर फक्त नवघरच्या टाकीच्या भरण्यासाठी होणार नाही आहे, तर जेसलपार्कचा ऑलरेडी इ.एस.आर. आहे. त्यालासुध्दा त्याचे फिडींग आहे. जर भुमिगत पाण्याची टाकी इथून नेऊन कनकियामध्ये जर नेली तर १ एम.एल.डी. पाण्याची कनकियाची कॅपॅसिटी संम्प आहे. त्या ठिकाणी अजूनही ४.५ एम.एल.डी. चा संम्प बांधणार. पण या संम्पकडे जाणारी ७११ एम.एम. व्यासाची पाईप लाईन ऑलरेडी टाकलेली आहे. फिडरमॅन तिथे काय होणार. मग ती तुम्ही रायझिंग मॅन म्हणून वापरणार का. कारण असे आहे, जिथे जिथे उंच पाण्याची टाकी बांधली जाते त्याच ठिकाण भूमिगत पाण्याची टाकी बांधायची असते. ही टेक्नॉलॉजी त्यांनी ॲडॉप्ट केलेली आहे आणि हे सगळे टेक्नीक बाजूला ठेवून मग असेच जर होते तर आपले सर्व संम्प जे आहेत ते ठाण्यालाच बांधायचे होते आणि तिथूनच आम्हाला इ.एस.आर.ला तुम्ही सप्लाय द्यायला पाहिजे होते. मग वेगवेगळ्या ठिकाणी जागा करुन इ.एस.आर. बांधायचा. टाक्या बांधायच्या, याचे प्रोविजन काय. तरी सुध्दा टाकी नेली तर संम्पसाठी मशिनरी खरेदी केलेली आहे. ती ठरावीक हॉर्स पॉवरची असणारी मशिनरी जे अंतर वाढले त्यावेळी कनकिया पार्कमध्ये जर ती मशिनरी लावली तर ती मशिनरी त्या ठिकाणी सुटेबल होणार नाही. ४.५ एम.एल.डी. संम्पची पंम्पीग करणारी मशिनरी ह्या ठिकाणी घेण्याचा कुठलाही प्रस्ताव अंतर वाढल्यामुळे बदलण्याचा प्रस्ताव आलेला नाही म्हणजे ती मशिनरी वाया गेली. मशिनरीची गरज नसतांना ती वेळेअगोदर खरेदी केली गेली आणि त्याच्यापुढे हा संम्प बांधण्याचा ह्यांचा जो निर्धार आहे कि, असे आम्ही काही कामे एम.जी.पी. ने केलेली नाहीत का? भूमिगत पाण्याच्या टाक्या कुठे बांधलेल्या नाहीत का? त्याच्याकडे असे ॲडव्हान्स टेक्निक नाही आहे का? आणि ह्याच्यावरीती जर बायकेसींग करावे लागत असेल तर त्यांच्याकडे तसे तंत्रज्ञान उपलब्ध नाही आहे का? आणि असे तंत्रज्ञान त्यांनी इ.एस.आर. बांधतांना कामाला आणलेले नाही का? आणि म्हणून कुठल्याही परिस्थितीमध्ये जर अशा प्रकारचे बदल केले जातील तर ह्या ठिकाणी एकंदरीत आठ इ.एस.आर. आणि नऊ संम्प बांधण्याचा हा जो संकल्पचित्र सादर केला हे एवढ्यासाठी की, सगळ्या ठिकाणी सारखेच पाण्याचे डिस्ट्रीब्युशन व्हावे. कनकिया पार्कला तुम्ही टाकी नेऊन टाकलेल्या फिडरमेनचे काय करणार. ती फिडरमेन वायाच जाणार मग तो फिडरमेनचा लॉस किती. फिडरमेन पाईप लाईन ऑलरेडी ७११ एम.एम. ची टाकलेली आहे. संम्प तिथे होईल. इ.एस.आर.ला तिथे भरण्याची फ्रिक्वेन्सी तिथे कायम राहील त्या दृष्टीने पुढेच इंटरनल डिस्ट्रीब्युशन केलेले आहे. मॅडम साहेब, आणि असे असतांना हे सगळे झुगारुन केवळ आतमध्ये चिखल आहे. पाणी भरलेले आहे. पूर्वी पण इ.एस.आर. तिथे बांधला तो एकदम बाजूला आहे. जिथे आपण संम्प प्रस्तावित केला आहे तिथे सुध्दा चिखल होता. दोन मीटर तिथे पाणी होते. तिथे भराव केला. पाच माळ्याचा इ.एस.आर. होऊ शकतो तर पाण्याची टाकी होऊ शकत नाही. अशाप्रकारे वेळ काढून धोरण जर अवलंबायचे असेल तर यापुढे योजनेचे कुठलेही काम होणार नाही. याच्यापेक्षा अनेक महत्वाचे जे भाग या योजनेमध्ये राहिले आहेत ते मी एका शब्दात सांगणार आहे. तत्पूर्वी त्यांनी गोडदेव संम्पच्या बाबतीत असे स्पष्टीकरण दिले. गोडदेवच्या संम्पची जागा अभिनव संस्थेने विनामुल्य आपल्या पालिकेला हस्तांतरीत करण्याचे पत्र दिले. त्यांना विचारले तुम्हाला किती जागा जागणार आहे. आमच्याकडे ६८० चौ. मीटर जागा आहे. ती त्यांनी एक्सेप्ट केली. त्यांच्या कॉन्ट्रॅक्टरने जेव्हा जागा ताब्यात घेतली, पायलिंग करायचे काम सुरु केले तेव्हा त्यांच्या नंतर लक्षात आले की, आपण चुकीच्या जागी पाईल्स मारतोय. आपण दुसऱ्याच्या जागेत पायलिंग केले. कोणाची चुकी ही ह्यावेळी निवडून आलेल्या नगरसेवकांची की, त्यावेळी निवडून आलेल्या नगरसेवकांची. ज्या संस्थेन जागा दिली त्या संस्थेची जागा घेऊन पायलिंग केले. त्या पायलिंगवर साठ लाख रुपये खर्च केले आणि त्याचे बील कॉन्ट्रॅक्टर मागणार आहे आणि हे बील देणार आहेत आमच्या कर्जातून आणि त्याची जमीन खराब केली तो म्हणणार तुम्हाला ज्या प्रयोजनासाठी जमीन दिली होती ती तुम्ही वापरत नाही. त्याचे कॉम्बीनेशन तुमच्याकडून का घेण्यात येवु नये आणि पुन्हा इथे हेच तंत्रज्ञान गोडदेवचा इ.एस.आर. हा मागच्या योजनेतला आहे. जर संम्पची गरज नाही तर गोडदेवचा इ.एस.आर.कडे नव्याने योजनेमध्ये तुम्ही संम्प का प्रस्तावीत केलात आणि गोडदेवच्या या योजनेसाठी इ.एस.आर.साठी संम्प बांधायचा आहे त्याची जागा तुम्ही ताब्यात घेतली. तुमचे पायलींग चुकीच्या ठिकाणी झाले. त्या खाजगी मालकाशी सुध्दा वाटाघाटी करुन नगरपालिकेने त्यांचे पत्र घेतले ते सुध्दा जागा द्यायला तयार झाले. ह्यांनी त्याप्रकारे ठराव घेतला आणि आता ती टाकी गोडदेवला पाठवायची. गोडदेवची टाकी फाटकावरती पाठवायची. या जुन्या योजनेमध्ये केलेला घोळ गोडदेवच्या इ.एस.आर. ज्यावेळेला बांधला त्यावेळी त्या इ.एस.आर.ला तिनशे एम.एम.ची फिडरमेन दिलेली आहे.

ज्यावेळी विषम प्रमाणत पाण्याचे वाटप होते त्यावेळी ३०० एम.एम.च्या पाईप लाईनमधून जे गोडदेवच्या इ.एस.आर.ला फिलींग होते चार तास टाकी भरायला दोन तास टाकी खाली व्हायला परत चार तास थांबायचे. इ.एस.आर. भरायचा परत दोन तासात खाली करायचा आणि म्हणून सगळे एरिया जे आहेत त्यांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नाही आणि त्या इ.एस.आर.चा फाटकाच्या संम्पवरुन सप्लाय देण्यासाठी ॲडीशनल लवकर इ.एस.आर. भरावा म्हणून ऑलरेडी ३०० एम.एम.ची पाईप लाईन आहे आतमध्ये ती कधीही एम.जी.पी.ने कार्यान्वीत केलेली नाही. आज सांगतात की, गोडदेवचा संम्प फाटकावरती चालू करायचा आणि तिथून पाईप लाईन टाकून गोडदेवचा इ.एस.आर. भरायचा. असे जर करायचे आहे तर या सगळ्या टाक्यांना जे जे संम्प दिलेले आहेत ते सगळे संम्प रद्द करायचे आणि पातळी पाड्याला अजून एक मोठा संम्प बांधून आपण सप्लाय करु शकता होतो मग एवढी ३ कोटी रुपायांची पंम्पींग मशिनरी वेळेपूर्वी गरज नसतांना खरेदी केली ती भिवंडीच्या वेअर हाऊसमध्ये ठेवून दिली. एकही पंम्पींग मशिनरी वापरली नाही आणि डिझाईन आहे. साडेचार एम.एल.डी.ला जी पंम्पींग मशिनरी लागणार आहे त्यापेक्षा कमी क्षमतेची पंम्पींग मशिनरी १ एम.एल.डी.च्या टाकीला लागणार आहे. असेच जर झाले तर या योजनेचे पुढे किती बारा वाजतील ह्याचा अनुभव त्यांनी आम्हाला १० एम.एल.डी. पाणी पुरवठ्यामध्ये जी आमची फसवणूक केलेली आहे त्याच्यावरुन स्पष्ट आहे. १० एम.एल.डी. पाण्यासाठी साडेसात कोटी घेतले. पातळी पाड्यापासून ओवळ्यापर्यंत ५०० एम.एम. व्यासाची पाईपलाईन एम.जी.पी.ने टाकलीच नाही. पैसेही घेऊन मोकळे झाले आणि रेकॉर्डवर दाखवले की, १० एम.एल.डी. पाणी तुम्हांला दिलेले आहे. जेव्हा मीटर लावले तेव्हा ३१ एम.एल.डी. पाणी या शहरात येत नाही १८ एम.एल.डी. पाणी येते. अल्ट्रासॉनीक मिटरने यांचा पडदा फाश केला आणि म्हणून आतापर्यंत सभागृहाने वेळोवेळी माझ्यापुर्वी जे पदाधिकारी होते मा. मेंन्डोसासाहेब, माझ्या कारकिर्दीमध्ये जेव्हा जेव्हा यांच्या बैठका झाल्या त्यावेळी एम.एम.आर.डी.ए.ने सुध्दा या सगळ्या गोष्टींना विरोध दाखविला आहे. आजचा बदल किंवा रद्द करण्याचा निर्णय फक्त माझा एकट्याचा नाही आहे. त्याच्यामध्ये एम.एम.आर.डी.ए. आहे. एम.एम.आर.डी.ए.ने तुम्हाला गॅरेंटी दिलेली आहे लोन देणार आहेत, पैसा देणार आहेत आणि जर तुम्ही पैसा चुकीच्या पध्दतीने वापरत असाल किंवा कुठलेही संकल्पचित्र अशा वेगळ्या पध्दतीने तुम्ही बदलत असाल. मला एकच प्रश्न विचारायचा आहे त्यांनी सांगितले की, ६० लाख रुपये खर्च इकडे जास्त होणार आहे ती टाकीतच होणार आहे किंवा गोडदेवच्या संम्पला ४५ लाख रुपये मागितले या सगळ्या गोष्टी लक्षात घेता जेव्हा तुम्ही डिझाईन चेंज करता तेव्हा फिडरमेनचे काय होईल. कनकिया पार्क पासून गोडदेवच्या संम्प पर्यंत ७११ एम.एम.ची ती तुम्ही काय वापरणार. सप्लाय लाईन वापरणार ती तुम्हाला रायडिंगमेन म्हणूनच वापरावी लागेल. ७११ एम.एम.ची रायडिंगमेन जर वापरली तर अडीच एम.एल.डी. चे जे फिलींग आहे साडेचार एम.एल.डी. वरुन ते सरळ एक एम.एल.डी.वर येईल आणि नवघरच्या टाकीमध्ये नुसती हवा राहील. नवघरच्या इ.एस.आर.वरती मा. महापौर मॅडम नवघरच्या इ.एस.आर.मध्ये भाईंदर पूर्वच्या ३/४ भागाला पाणी पुरवठा देण्याची प्रोव्हीजन आहे. त्यांनी तांत्रिक दृष्ट्या हे सांगितले पाहिजे की, इ.एस.आर. १ किलोमीटर असले तर त्याचा संम्प १० किलोमीटर वर असतो असे तांत्रिक दृष्ट्या बरोबर असेल तर नक्कीच आपण बदल करा. त्यापेक्षा आज महत्वाची बाब तेच सांगतात की, उत्तनला आम्ही मंजूरी दिली. गंमत बघा, उत्तनला तुम्ही ॲडीशनल पाणी पुरवठ्याला मंजुरी देता. आज तुम्हाला एकच प्रश्न विचारतो की, गेल्या चार वर्षामध्ये रेल्वे लाईन खालून येणारी पाईपलाईन आजही झालेली नाही. त्याच्या कामाला सुरुवात पण झालेली नाही आणि त्या लाईनचा व्यास आहे ६०० एम.एमडी ६०० एम.एमडी व्यासाची पाईपलाईन जोपर्यंत फाटकाखालून टाकत नाहीत तोपर्यंत सुदामानगरची टाकी, सुभाषचंद्र बोस मैदानाची टाकी आणि उत्तन किंवा डोंगरीमध्ये पुढे बांधण्यात येणाऱ्या टाकीला फिडींग कुठून मिळणार. इकडे कुठेच लक्ष नाही आहे.कारण रेल्वेखालचे काम कोणी कॉन्ट्रॅक्टर करायला तयार नाही. स्पेशलाईज जॉब, स्टेमने करायला घेतले. आठ वेळा टेंडर बदलले. शेवटी स्पेशलाईज जॉब स्पेशलाईज रेट दिला तेव्हा मा. तत्कालीन आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेबांना माहित आहे तेथे किती अडचणी झाल्या. आज हाच प्रश्न आहे. आम्ही मात्र मिरवायचे की आम्ही सुदामानगरची टाकी चालू केली. आम्ही सुभाषचंद्र बोस मैदानाची टाकी चालू केली. आम्ही डोंगरी, राई, उत्तनला आम्हाला पाणी पुरवठा हा ॲडीशनल द्यायचा आहे म्हणून आम्ही तिथे टाक्या बांधणार आहोत. भूमिगत टाक्या व उंच टाक्या. अहो, ह्याला जाणारी पाईप लाईनच आज कुठेही अस्तित्वात नाही व ती टाकण्याचा प्रयत्नही सुरु झालेला नाही. त्यासंबंधी कुठलेही विवरण नाही, काही खुलासा नाही आणि या सगळ्या गोष्टीला आम्ही मात्र आमची पाठ थोपटायची की, आम्ही हे केले आणि हे मिळविले तरी ५० एम.एल.डी. मध्ये फक्त २४ एम.एल.डी. पाणी या योजनेतून

मिळालेले आहे आणि आपल्याकडे नेहमीची पद्धत आहे या जिल्ह्यामध्ये भाईंदर सगळ्यात शेवटी पडते. ट्रेनमधला शेवटचा डबा, पुढचे डबे भरले की मग शेवटच्या डब्यात जा. तसेच या योजनेत सुद्धा ज्या ठिकाणी पाणी नदीतून घेतलेले आहे त्या ठिकाणावरुन जल शुद्धीकरण केंद्रात पाणी आणल्यानंतर ठाण्याचे आणि भाईंदर पाणी एक जल शुद्धीकरण केंद्र कल्याण टेमघर येथे टेमघरपासून पातळीपाड्यापर्यंत आमची कॉमन लाईन. वा! काय तांत्रिक आमचे सल्ले आहे की, दोन हजार मि.मी. मध्ये आम्ही दोघे एकत्र. पातळीपाड्यापासून आम्ही पुढे पातळीपाड्याला. आम्हाला किती पाणी देतात ते मोजण्याची आमच्याकडे कुठली यंत्रणा नाही. दुर्दैवाची बाब आहे. अनेक वेळा अल्ट्रासॉनीक मीटर जागोजागी लावा. पातळीपाड्याला आमचे ५० एम.एल.डी. आणि ठाण्याचे १०० एम.एल.डी. असे १५० एम.एल.डी. टेमघर ते पातळीपाड्या दरम्यान एकाच पाईप लाईनमधून आम्हाला धावणार आहे आणि ह्यापूर्वी जसे आमचे १० एम.एल.डी. पाणी टी.एम.सी. ने घेतले तशा प्रकारची परिस्थिती आज पण चालू आहे. ब्रम्हांडवासी पाईपलाईनला कनेक्शन दिले ते काणाच्या संमतीने दिले. आयुक्त साहेब याचा आपण शोध घ्यावा का दिले? आणि अशा प्रकारे जर योजनेमध्ये कुठलेही फेरबदल तुम्ही करत असाल तर १३२ कोटींची योजना महापौर मॅडम १७७ बिलो टेंडर झाले. १०९ कोटी रुपये याच्यावरचा खर्च आहे आणि १०९ कोटीमध्ये ५० लाख कुठे वाढत असतील आणि आमच्या सर्वांच्या सोयीची बाब होत असेल. राई-मुर्धा, उत्तन-डोंगरी या लोकांना पाणी मिळावे म्हणून सभागृहाने मंजूऱ्या दिल्या आणि त्याच्यावरचा खर्च त्यांनी ती बाब सागितली. आता ते फक्त भूमिपूजनाची वार्ता सांगतात. पण त्याच्यावरचा खर्च या योजनेत टाकलात का तुम्ही, त्याची मंजूरी दिली का. त्याच्यावरती ६४ कोटीपेक्षा जास्त कर्ज एम.एम.आर.डी.ए. कडून घेणार आहात कि, तुम्ही सांगा आम्हाला की, ६४ कोटीमध्ये आम्ही राई, मुर्धे, मोर्वा, डोंगरी करुन देतो. तो पैसा कुठून आणणार म्हणजे पुन्हा एम.एम.आर.डी.कडे आम्हाला सँक्शनसाठी जावे लागेल. आम्ही भूमिपुजन करुन कपाळाला टिळा लावून मोकळे होऊन जाऊ. पण काम काही होणार नाही तेव्हा ते काय सांगतील आर्थिक मंजूरी नाही आहे आणि म्हणून १३२ कोटीच्या योजनेला आर्थिक तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतर १०९ कोटी रुपयाचे टेंडर झाले. राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन अजून शांतीनगरचा प्रश्न आहेच. त्याच्यावरती सदस्य बोलतील आज ना उद्या तर पाणी द्यावे लागणारच आहे आणि या पालिकेतल्या हद्दीतील लोक आहेत. त्यांच्या योजनेवरचा खर्च हा सगळा बघितला तर या पालिकेकडे वेगळी योजना करणेसाठी वेगळा पैसा आहे का? आणि म्हणून कुठल्याही परिस्थितीमध्ये अशा प्रकारचे तांत्रिक बदल? कृपया सभागृहाला माझी विनंती आहे, माझ्याकडे कुठल्याही अशाप्रकारचा माझा हेतु नाही की, ह्या ठिकाणी हेच झाले पाहिजे, त्या ठिकाणी तेच झाले पाहिजे, परंतु ह्याच्या मधून आमचे सगळे तांत्रिक गणित बिघडत जर असेल तर संपूर्ण माहितीसह योजनेमध्ये आतापर्यंत काय काय, कसे कसे बदल घडलेले आहेत. इ.एस.आर.चा खर्च, नवघरच्या पायलिंग पण करायचे नाही असा होता. हे कुठले संकल्प चित्र कोणी सादर केले होते मला माहिती नाही. पायलिंग करायला गेले तेव्हा आतमध्ये सॅन्ड ब्लो म्हणजे अठरा मिटरवरती रॉक लागला. उद्या जर नवघरला पाच मिटरवरती रॉक लागला असता तर तुम्ही कनकिया पार्कची टाकी रद्द करुन नवघरला आणली असती का? असे काय प्रेशर आहे तुम्हाला कनकिया पार्कच्या ठिकाणी ज्या ठिकाणी इ.एस.आर. बांधण्यात येत आहे त्या ठिकाणी ती शेवटच्या टाकीच्या प्रेपरन्स दिला होता. ती टाकी जोरात व्हायला लागली त्या ठिकाणी लोकवस्ती फारशी नाही. आता नवीन लोक राहायला आलेले आहेत. भाईंदरकरांनी तीस चाळीस वर्षे पाण्याचे प्रॉब्लेम सोसलेले आहेत. पाणी काय असते त्याचे खरे महत्व ह्या सभागृहातील सगळ्याच नगरसेवकांना असतांना अशा प्रकारचे बदल कुठल्याही परिस्थितीमध्ये सुचवू नये. ज्या संस्थांनी तुम्हाला जागा दिलेली आहे, नवघरच्या संम्पबद्दल कुठल्याही टाकीच्या जागेचा वाद नाही आहे. गोडदेवच्या संम्पबद्दल ६८० मीटर जागा त्यांना दिली. त्यांनी पाईल बाहेर मारले त्याला चुकी कोणाची, त्यांची आणि तशाही परिस्थितीत बाजूचा मालक जर तुम्हाला जागा देत असेल तर घ्यायला काय हरकत आहे आणि आताच ते बोलले की, गोडदेवचा संम्प जर फाटकावरती नेला तर तो संम्प तेवढा बसणार नाही, १ एम.एल.डी.चा. गम्मत बघा, संम्प गोडदेवला, इ.एस.आर. गोडदेवला. संम्प नेला फाटकावर इ.एस.आर.ची कॅपेसिटी गोडदेवची १.५ आणि संम्प २.५ आणि गोडदेवच्या संम्पची कॅपेसिटी २ एम.एल.डी., तुम्ही अंतर वाढवल्यानंतर पुन्हा पाईप लाईनचा प्रश्न आला. पुन्हा त्याच पंपिंग मशिनचा प्रश्न आला. जी पंपींग मशिन पहिल्यांदाच घेवून ठेवलेली आहे, त्याचावरती हार्स पावर वाढवावी लागतात. सगळे झाल्यानंतर सुद्धा फाटकावरती २ एम.एल.डी. संम्प बांधण्यासाठी जागाच नाही आहे असे तेच म्हणतात आणि ते म्हणतात त्याच्यासाठी आपण संम्प छोटा करु, मग ६८० मीटर जागा दिली होती त्या ठिकाणी तुम्ही संम्प का छोटा नाही केला. जर तीच जागा तुम्हाला पुरेशी आहे तर फाटकावर उलट स्टॅण्ड

बाय व्यवस्था असावी. एवढ्यासाठीच की, फाटकावर आज जी व्यवस्था आहे ती मधल्या काळामध्ये आम्ही टँकर भरण्यासाठी वापरत होतो. उद्या महानगरपालिकेचे फायरस्टेशन होईल. जसे वेस्ट आहे तसे ईस्टला होईल तेव्हा तिथेसुद्धा स्वतंत्र व्यवस्था पाणी भरण्यासाठी ठेवावी लागणार आहे. येणाऱ्या सगळ्या ही योजना काही दोन वर्षासाठी राबवायची नाही आहे. ही योजना आणखीन, कुठली नवीन योजना पाच वर्षापर्यंत होईल की नाही सांगता येत नाही, कारण तशा प्रकारचा कुठलाही प्रस्ताव शासनाकडून आज नाही मधल्या काळामध्ये होता. एक हेटवडे धरणावरती ६४ एम.एल.डी. पाणी देण्याचा प्रस्ताव होता. परंतु तो कुठे गहाळ झाला. आता योजना कधी होईल, कारण आम्ही अशा योजना पाहिल्या २१ एम.एल.डी. नंतर १० एम.एल.डी. योजना कुचकामी निघाली कारण ती पाईपलाईन आधी टाकली नाही. ते पैसे आम्हांला परत द्यायचे असे कबूलही केले. त्याच्यासंबंधी त्यांनी सांगावे. त्या तीनचार गोष्टींमध्ये आम्ही शांतीनगरला, राई, मुर्धा, मोर्वा, उत्तनला अजून टाक्या बांधू. अजून इंटरनल डिस्ट्रीब्युशन बाकी आहेत. ए.सी. पाईपलाईन शहरातून काढून टाका. सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जिस यांनी सांगितले, ए.सी. पाईपलाईन बदलण्याची गरज आहे आणि काही नाही. आता टाक्या नवीन बांधल्या. ए.सी. पाईप लाईन थोड्यासाठी वापरायची. जोरात प्रेशरने पाणी घ्यायचे आणि पाईप लाईन फोडायची. लोकांना त्रास द्यायचा. परंतु ए.सी. पाईप लाईन बदलण्याचा कुठलाही प्रस्ताव या ठिकाणी नाही, दुःखाची बाब आहे. शेवटचे वक्तव्य करतो. ५४ किलोमीटरच्या अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये ए.सी. पाईपलाईन आहे. ६० किलोमीटरच्या अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये तत्कालीन आयुक्तांनी खबरदारी घेतली. सगळ्या सी.आय. लाईन टाकल्या आता बघा ५४ मधली अंतर्गत व्यवस्था आम्ही वापरणार आणि ६० किलोमीटर अंतर्गत व्यवस्था वापरणार. मध्ये १० एम.एल.डी. पाणी वाढले असे समजून आम्ही पाईप टाकल्यात त्याही वापरणार आणि कसलेही हायड्रोलीक आमच्याकडे मॅच होत नाही आहे. जेव्हा ही योजना पुर्णपणे कामाला लागणार तेव्हा कुठेतरी पाईप लाईन फुटत राहतील. कुठेतरी ए.सी. लाईनमुळे आम्हाला कमी प्रेशरने पाणी मिळेल. दुर्दैवाची बाब आहे. मागच्या दोन तीन महिन्यामध्ये जी प्रीपन्सी पाणी मिळण्याची एरिया वाईजची होती. खारी, गोडदेव, नवघर, भाईंदर पूर्व, पश्चिम जी २४ तासातून एकदा होती ती पुन्हा ३० तासावरती चालली आहे आणि अशा प्रकारचा आमचा निर्णय होत असेल तर सभागृहाने हे फार गांभिर्याने घ्यायला गेले तर पुन्हा आंदोलने तुमच्या आणि आमच्या प्रेरणेशिवाय उभे राहतील, जी पूर्वी उभी राहीली आणि यांचा सरळ आम्हाला फटका पडेल. मा. महापौर महोदया, आपण अतिशय शांतपणे माझे वक्तव्य ऐकले आणि अतिशय चांगला निर्णय ह्या ठिकाणी द्या कि, साठ पन्नास लाखचा काही फरक पडत नाही. उलट जागा बदलल्यामुळे तो लाखाचा खर्च कारोडोवरती जाईल. कारण पाईप लाईन ऑलरेडी टाकलेली आहे. संम्पकडे जाणारी पाईप लाईन ऑलरेडी टाकलेली आहे. संम्प उचलून नेला की, ती पाईप लाईन तुम्हाला रायझिंग म्हणून वापरता येते का? आणि पंपींग मशीनची हार्स पॉवर जी निश्चित केलेली आहे ती पंपींग मशीन तीन वर्षापूर्वी खरेदी केलेली आहे ती वापरण्यात आलेली नाही त्याचे तुम्ही काय करणार आहात या सगळ्या गोष्टींचा विचार केल्यानंतर तुम्ही आम्हीच फक्त निर्णय घेऊन चालणार नाही. तर यामध्ये एम.एम.आर.डी.ए. ही फायनान्शीअल एजन्सी आहे. ट्राय पाटील मध्ये एम.एम.आर.डी.ए. ही पार्टी आहे. तर त्यांनाही विचारल्याशिवाय काही करु शकत नाही. म्हणून उच्च स्तरीय मा. सभापती, स्थायी समिती, मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आणि तुमच्या या विभागाचे इंजिनियर, एम.एमृआर.डी.ए.चे इंजिनियर, कारण प्रत्येक वेळी एम.एम.आर.डी.ए. चे इंजिनियर यांना भेटणे जरुरीचे आहे. कुठलेही संक्शन देतांना एवढ्यासाठीच की, संकल्पचित्रामध्ये वेळोवेळी ज्या डेफोशिशन मिळाल्या, त्याच्यामध्ये या सर्व टाक्यांची कामे रद्द केली. नगरपालिकेने टाक्याच्या जागा लेट दिल्या म्हणून झालेले नाही. याचा आपण सारासार विचार करा आणि कुठल्याही प्रकारे सन्मा. महापौर मॅडम आणि सर्व सदस्यांना माझी विनंती आहे, आग्रहाची की, यामध्ये कुठलेही राजकारण न करता आपण अशा प्रकारे कुठल्याही बदलाला मंजूरी देऊ नये, ही माझी विनंती आहे. धन्यवाद!

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम आपली जर परवानगी असेल तर मी ह्या ठिकाणी बोलू इच्छितो.

**मोहन पाटील :-**

जर प्रशासनाने यांचे उत्तर दिले असते (उपप्रश्नाला) तर बरे पडले असते. माझ्या मते.

**रोहित सुवर्णा :-**

यांचे उत्तर आम्हाला लेखी लागेल. सर्व डिटेलमध्ये द्यावे लागेल.

**श्री. पिंजरकर (अधिक्षक अभियंता) :-**

मा. प्रफुल्ल पाटील साहेब यांनी जे मुद्दे उपस्थित केले, त्यातल्या थोड्याशा मुद्यांचे मी खुलासे करु इच्छितो. मुळात ही योजना १३२ कोटींची नाही आहे, ११० कोटी ६४ लाखाची आहे. फक्त त्याला जे शासन टेंडर नाही आहे ही सेन्शन कास्ट आहे. याकरीता ४७ कोटी शासनाचे अनुदान प्राप्त होणार आहे आणि एम.एम.आर.डी.ए.चे ६२.८१ कोटी इतके कर्ज उपलब्ध होणार आहे. या ६२ कोटीपैकी आतापर्यत ५३.५१ कोटी आपल्याला उपलब्ध झालेले आहेत आणि त्यातले आपण ५२.५४ कोटी एवढे खर्च केलेले आहेत. एकूण ११० कोटी जी मंजूर योजना आहे, त्याच आगोदर आतापर्यंत आपल्याकडे ९३ कोटी प्राप्त झालेले आहेत आणि ९२.०७ कोटी जवळ जवळ खर्च झालेले आहेत. फक्त ९७-९८ लाख आपल्याकडे या योजनेअंतर्गत शिल्लक आहेत. त्यामुळे ही कोणतीही १३२ कोटीची योजना नाही आहे याची कृपया मा. सदस्यांनी नोंद घ्यावी. जसे यामध्ये मिरा भाईंदरचे तत्कालीन अध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांनी जे सहकार्य दिले त्यामुळे ही योजना आपण पुर्ण करु शकलो कारण या योजनेमध्ये मुंबई किंवा जवळपासच्या भागामध्ये ज्या अडचणी होत्या त्या अडचणी राज्यामध्ये इतर कोणत्याही योजनेमध्ये आलेल्या नाही आहेत. फॉरेस्टची लॅण्ड असो, किंवा नॅशनल हायवेची परमिशन असो. बी.एम.सी. आहे, घोडबंदर रोड आहे, एम.एस.आर.डी.सी.आय. बी.एस.सी. पाईप लाईन आहे. गॅस पाईप लाईन आहेत, अशा असंख्य अडचणी ह्या योजनेवरती आलेल्या आहेत आणि या अडचणींवर मात करुन आणि आपल्या नगरपालिकेच्या सदस्यांकडून जे सहकार्य मिळालेले आहे, योजना पूर्ण करण्याकरीता या अडचणींवर मात करुनच आपण ही योजना पूर्ण करु शकलो. त्याबद्दल मी या सभागृहातील सर्व सदस्यांचे आभार मानतो. दुसरी गोष्ट नवघरच्या इ.एस.आर. करीता आपण जे प्रपोजल केलेले आहे. संकल्पन करतांना चांगली जागा मिळेल असे गृहीत धरुन केलेले आहे. प्रत्यक्ष काम करतांना जमीनीच्या आतमध्ये काय लागते हे मी किंवा आपणसुद्धा सांगू शकणार नाही किंवा तिथे सॅन्ड ब्लो होतो की, चिकणमाती लागते कि, दगड लागतोय हे आपण कुठे काही सांगू शकलो नाही. त्यामुळे संकल्पन करतांना त्यावेळेस ते या जागा सुद्धा दोन तीन वेळी बदललेल्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष काम करतांना ज्या अडचणी आल्या त्या अडचणी लक्षात घेऊन हा आपण नवीन प्रस्ताव टाकलेला आहे. जर योजनेप्रमाणे आपल्याला जर पाहिजे असेल तर त्याच ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण तेथे बांधण्यासाठी तयार आहे. संम्प ज्या ठिकाणी गोडदेवचे दिले आहे त्या ठिकाणी जागा जी आहे ही महानगरपालिकेने आम्हाला दिलेली आहे. आम्ही कोणाकडून प्रत्यक्ष काही घेतलेली नाही आहे आणि काय चालू केल्यानंतर तेथे एक नवीन मुद्दा उपस्थित झाला. किती प्रायव्हेट लॅन्ड आहे, त्यामुळे काम थांबवावे लागले. ही जरी जागा आपण उपलब्ध करुन दिली तर जे काही अर्धवट काम आहे ते काम पूर्ण करु. दोन्ही ठिकाणी जे आहे दोन्ही ठिकाणचे प्रस्ताव आम्ही मान्यतेकरीता बदलण्याकरता दिलेले आहेत. यामध्ये तांत्रिक बाबी लक्षात घेऊन आणि झालेल्या कामाचा अनुभव हा आहे. हा अनुभव लक्षात घेऊन आम्ही तांत्रिक बदल सुचविले आहेत, ज्यामुळे महानगरपालिकेचे ६० ते ६२ लाख रुपये वाचणार आहेत. त्यामध्ये पाईप लाईन आधीची टाकलेली आहे. कनकिया पार्कपासून टाकलेली लाईन आहे. ती फिडरमेन होते त्याऐवजी आता पंम्पींगमेन होईल. म्हणजे रायझिंगमेन होईल. पंम्पींग मशिनरी तीच वापरावी लागणार आहे कारण हेडमध्ये टाकीच्या उंचीमध्ये काही फरक पडलेला नाही आहे. फक्त जे काही डिस्टन्स वाढल्यामुळे थोडेसे फ्रिक्शनल लॉसीस जे काय ॲडजेस्ट करायची आहेत ते आम्ही ॲडजेस्ट करणार आहोत. ही टेक्निकल बाब आहे. त्यामुळे कोणत्याही अशा प्रकारचा नवीन भार महानगरपालिकेला पडणार नाही आहे. जी पंम्पींग मशिनरी आहे तीच पंम्पींग मशिनरी वापरायची आहे. पाईपलाईन ऑलरेडी टाकलेली आहे. ती फक्त टाकलेली लाईन रायझिंगमेन म्हणून वापरायची आहे. त्यामुळे जे काही पुढे आपल्याला जेसल पार्कला वगैरे कनेक्शन गेलेले आहेत त्याच्यातून कनेक्शन जाता येणार आहे. ई.एस.आर. मधूनच पुढे कनेक्शन दिलेले आहे, त्यामुळे तसे टेक्निकली पाईपलाईन वापरण्यामध्ये कोणताही दोष आपल्याला आढळून येणार नाही. त्यामुळे पुर्ण जी काय आपण प्रपोजल दिलेला आहे हा पूर्ण तांत्रिक बदल विचारात घेऊनच आपण बदल सुचवलेले आहेत. त्यामुळे अजून दुसरा कोणताही नवीन ॲडीशनल भार महानगरपालिकेवर पडणार नाही आहे आणि ही योजना राबवतांना ११० च्या अगेंस्ट जी काही सेवींग झालेली आहे किंवा अपेक्षित आहे. हा खर्च गृहित धरुनच जो आपण डोंगरी, राई, मुर्धेसाठी प्रपोज केले आहे ह्याकरीता कोणत्याही नवीन निधीची मागणी आपण करणार नाही आहोत. जे काही एम.एम.आर.डी.ए. कडून ६२ कोटी मिळणार आहेत त्या ६२ कोटी मध्येच हा सगळा खर्च अंतर्भूत केलेला आहे. त्यामुळे नव्याने ह्या योजनेकरीता राई-मुर्धे, डोंगरी विभागाकरीता कोणताही खर्च किंवा कर्ज उभारायची कोणतीही आवश्यकता नाही आहे. त्याचप्रमाणे पंम्पींग मशिनरी जी आणलेली आहे ती आता

अस्मिता पार्क पुर्ण होतेय. मग एम.आय.डी.सी. सुद्धा पुर्ण होते तर आपण ते वापरणार आहोत आणि बाकीच्या ज्या संम्पस् आहेत त्यांचे पण टेंडर झालेले आहे. ही पण पुढच्या जुनपर्यंत कामे पुर्ण होऊन त्यांच्यावरती जी पंम्पींग मशिनरी जी आहे ती सुरक्षित ठेवलेली आहे. त्याकरीता मेजर्स घ्यायचे आहेत. त्यापण आपण आपण घेतलेल्या आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने ल्युब्रीकेशन करुन वगैरे आणि मध्यंतरी आम्ही एक असा प्रस्ताव दिला होता की, दरम्यानच्या काळात जर ही पंम्पींग मशिनरी आयडल पडलेली आहेत तर आम्ही दुसऱ्या ठिकाणी वापरतो आणि नंतर जेव्हा पाहिजे तेव्हा देता येईल. तसा प्रस्ताव दिलेला होता पण त्या प्रस्तावावर अजूनही विचार झालेला नाही आणि ती पंम्पींग मशिनरी वापरण्यायोग्य आहे त्यामुळे त्यात काही कोणते खर्च वाया जाणार नाही. संम्पस् जी आहे, आता या भागात काम करतांना आपल्याला ज्या अडचणी आल्या सिल्वर पार्कला ज्या ठिकाणी आपण संम्पचे काम चालू केले होते तेथे बाजूच्या सोसायटीमधून घाण पाणी येत होते. त्यामुळे जी संम्प अंडरग्राऊंड होती. आपली ती आपण नवीन डिझाईननुसार जमिनीच्या वर घेतलेली आहे आणि या परिसरातील जमीनीचा जो भाग आहे हा पाण्याचा भाग आहे तो लक्षात घेऊन ह्यापुढच्या संम्पस् ज्या आहेत त्या सगळ्या आपण जमीनीच्या वरच्या लेव्हलला ठेवलेल्या आहेत. त्यामुळे ह्यामध्ये कोणत्याही पाण्याचे दुषित होणार नाही किंवा प्रदुषण होणार नाही ही आवश्यक बाब आहे. त्यामुळे नवीन संकल्पन करतांना ह्या सगळ्या बाबी लक्षात घेतलेल्या आहेत. त्यामुळे नवघरची सुद्धा जी संम्प आहे ती सुद्धा आता जर त्या ठिकाणीच बांधायची झाली तरी ती जमिनीच्या वरच राहिल जमिनीच्या खाली राहणार नाही. गोडदेवची पण संम्प आहे त्याप्रमाणे जागा जर मिळाली तर ती सुद्धा आपण त्याच ठिकाणी बांधू शकतो. महानगरपालिकेने जागा उपलब्ध करून दिली तर त्याच ठिकाणी आपण त्याच क्षमतेची टाकी बांधून देण्यास एम.जी.पी. तयार आहे. फिडरमेन झालेले आहे. पंम्पींग डिस्ट्रीब्युशन सिस्टम मध्ये जे आहे या आपल्या सी.आय. पाईप लाईन आपण वापरलेल्या आहेत. कुठेही ए.सी. पाईप लाईन वापरलेली नाही आहे. जुन्या योजनेमध्ये जर कदाचित काही राहिलेल्या असतील तर महानगरपालिकेने डिस्ट्रिब्युशनचे काम हाती घेतलेले आहे. त्या कामाच्या अंतर्गत जर तशा काही शिल्लक ए.सी. पाईप लाईन असतील तर त्या सुद्धा त्यांनी बदलून घ्याव्यात अशी मी महानगरपालिकेला विनंती करतो. ३१ एम.एल.डी.चा सध्याचा जो पाणी पुरवठा चालू आहे जुन्या योजनेमध्ये ही ३१ एम.एल.डी. योजनेमध्ये जी आपण १० एम.एल.डी.ची योजना केलेली होती. तर त्याचा पूर्ण हिशोब आपण महानगरपालिकेला दिलेला आहे आणि त्याच्यामध्ये स्पष्ट केलेले आहे की, पाचशे मिलीमीटर व्यासाची पाईप लाईन ही आपण त्यावेळी टाकलेलीच नाही आहे आणि त्या खर्चाचा पूर्ण हिशोब दिलेला आहे. त्याऐवजी आपण कुठे वापरली आपण लाईन आणि तो खर्च कुठे केला आणि ७ कोटींपैकी किती पैसे शिल्लक आहेत. हा सगळा हिशोब आपण महानगरपालिकेला सबमिट केलेला आहे. त्याच्यावरती पुर्ण चर्चाही झालेली आहे आणि काही कमी जास्त असेल त्याप्रमाणे तो ॲडजेस्ट करता येईल. दुसऱ्या कामामध्ये ३१ एम.एल.डी.च्या स्कीममधून आजच्या स्थितीला म्हणजे जेव्हा लाईन चालू होते, २८ एम.एल.डी. पाणी जाऊ शकते. नवीन योजना सध्या चालू आहे आणि जुनी योजना संपूर्ण बंद आहे. आजच्या स्थितीला म्हणजे जवळ जवळ ५२ एम.एल.डी. पाणी हे संपूर्ण नवीन योजनेतून येत आहे आणि नवीन योजनेची जी पाईपलाईन आहे तीची क्षमता ८० द.ल.लि. पाणी वाहू नेण्याची आहे त्यामुळे आता जे आपल्या ५२ किंवा ६० एम.एल.डी. पाणी मिळते हे त्या कारणामुळे आपल्याला जास्तीचे पाणी मिळते कारण जुनी पाईप लाईन ही सध्या बंद आहे. त्यामुळे सगळा सप्लाय जो आहे तो नवीन पाईप लाईनमधून चालू आहे आणि ह्या पाईपलाईनची क्षमता ८० द.ल.लि. असल्यामुळे आता जशी आपली इ.एस.आर. आणि पाण्याच्या साठवण टाक्यापूर्ण होतील त्याप्रमाणे आपण जास्त पाणी इथे घेऊ शकू. पातळीपाड्यावरुन किती पाणी मिळाले आहे आणि प्रत्येक इ.एस.आर.ला किती पाणी मिळते याकरीता आपण फ्लोमीटर्स घेतलेले आहेत. त्याप्रमाणे चेण्याला मीटर्स बसवलेले आहेत, पातळी पाड्याला मीटर बसवलेले आहेत आणि हे मीटर्स बसवलेले आहेत त्यांचे रेकॉर्डींग आपल्याला तासातासाने होते. त्यामुळे आपण केव्हाही कुठेही जाऊन बघू शकता. या मीटरमधून किती पाणी जाते आणि या लाईनमधून किती पाणी येते. दोन्ही ठिकाणी मीटर्स लावलेले आहेत. त्याचप्रमाणे गावातल्या ज्या टाक्या आहेत इ.एस.आर. त्या सगळ्या टाक्यांना आपण फ्लोमीटर्स बसवणार आहोत, जेणेकरुन प्रत्येक टाकीमध्ये किती पाणी आले हे आपल्याला मोजता येईल आणि त्याचा वापर कसा होतो आणि कुठे त्याचे हे होते त्याचा पुर्ण अंदाज आपल्याला येईल. त्यामुळे फ्लोमीटर्स दिलेले आहेत. रेल्वे लाईनचे जे काम मागे स्टेम प्राधिकरणाकडे दिले होते ते मध्यंतरी काम त्यांनी केलेले आहे आणि वेस्टच्या भागाची पाईपलाईनची जी डिमांड आहे ती सध्याची लक्षात घेऊन सध्या ६१० पुरेसे आहे पाणी त्यानंतर पुढची जी प्रपोजल आहे भविष्यात वेस्टकडे आपल्याला पाईपलाईन टाकायची आहे त्याकरीता ९००

मिलीमीटर व्यासाची मोठी पाईप लाईन आपण प्रस्तावित केलेली आहे. रेल्वे विभागाकडे आमचे यांच्याशी पत्रव्यवहार चालू आहेत. त्यांच्याकडून पाहणीही झालेली आहे आणि कुठून पाईप लाईन क्रॉस करायची याची सुध्दा परवानगी ते थोड्या दिवसांत देणार आहेत. त्यामुळे भविष्यात वेस्टकडे आपला जो भाग आहे त्याकरीता आपण ९०० मी.मी. व्यासाची मोठी पाईप लाईनचे प्रपोजल दिलेले आहे, क्रॉस करायचे आहे. सध्याची ६१० ची आपण टाकलेली आहे ती सध्याच्या वस्तीला पुरेसा पाणी पुरवठा होऊ शकतो. पातळीपाड्याला फ्लोमीटर बसवलेले आहे. ब्रम्हांडला आपल्याइथुन कोणतीही कनेक्शन दिलेली नाही आहेत. टी.एम.सी.ची वेगळी पाईप लाईन तेथे आहे. त्यामुळे त्यांचा तो स्वतंत्र तिथून पाणी दिलेले आहे आणि या योजनेचे सहनियंत्रण किंवा मॉनीटरींग करणेकरीता महानगरपालिका महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि एम.एम.आर.डी.ए. या सदस्यांची एक स्टेअरींग कमिटी केलेली आहे आणि प्रत्येक वेळेस जे काही कोणते बदल केलेले असतात किंवा ज्या काही अडचणी असतात, कामाची प्रगती या सर्वांचा आढावा घेण्याकरीता स्टेअरींग कमिटीच्या मिटींग होतात. जे काही बदल, ज्या काही टेक्निकल डिफीकल्टी आल्या आहेत त्या आपण त्यांना सगळ्या कळविल्या आहेत आणि त्यांच्या मान्यतेप्रमाणे हे सगळे बदल आपण केलेले आहेत आणि भविष्यातले जे बदल आहेत जे आपण सुचवलेले आहेत ते आपण स्टेअरिंग कमिटीच्या माध्यमातून त्यांना कळवून हे पूर्ण करणार आहोत आणि एकंदर हे जे आपण ११० कोटीची मंजूर योजना झालेली आहे त्यातून आतापर्यंत झालेला ९२ कोटीचा खर्च आहे हा गृहीत धरुन उरलेली जी कामे आहेत त्याकरीता सगळा जो खर्च लागणार आहे हा ११० कोटीमध्येच पूर्ण बसणार आहे. त्यतिरिक्त कोणतीही बाहेरीची कामे आपण प्रस्तावित केलली नाही आहेत. त्यामुळेच डोगरी, राई, मुर्धे हा जो भाग आहे या भागाला या सेव्हींग मधूनच खर्च देणार आहोत. कोणतेही नवीन प्रकारचे कर्ज याकरीता उभारायचे नाही आहे. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण ही जी मंजूर झालेली योजना आहे या व्यतिरिक्त महानगरपालिकेने स्वतःच्या खर्चातून ६० किलोमीटरची वितरण व्यवस्था ही स्वतः टाकलेली आहे. महानगरपालिकेने हा खर्च स्वतःचा केलेला आहे. त्या खर्चाचा याच्याशी काही संबध नाही आहे. तर आता जो काही टेक्निकल प्रॉब्लेम आहे आम्हाला काम करतांना जो अनुभव आला या अनुभवातून ज्या काही अडचणी आल्या हा विचार करुन आम्ही जे काही दोन प्रस्ताव दिलेले आहेत हे जर मान्य झाले तर त्याप्रमाणे नवीन ठिकाणी करण्यात येईल आणि जर मान्य केले नाही, महानगरपालिका किंवा स्टेअरिंग कमिटीने तर ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी आम्ही बांधायला तयार आहोत. त्याबद्दल आमचे काही दुसरे दुमत नाही. धन्यवाद!

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण पिंजरकर साहेब, अधिक्षक अभियंता ह्या योजनेवरती ज्या वेळेला आले त्यावेळी या योजनेचे काम ऑलरेडी सुरु झाले होते. त्यांच्या जागी श्री. महाजन हे काम करीत होते. एक्झिक्युटीव्ह इंजिनियर श्री. नडगिरे साहेब आहेत. हे ज्यावेळी आले त्यावेळी ऑलरेडी या योजनेचे काम अर्धे झालेले होते. त्यांच्या जागी सुद्धा पुर्वी दुसरे अधिकारी काम करत होते. नगरपालिकेने जर आपला रेकॉर्ड तपासला त्यांनी जर नगरपालिकेचे प्रस्ताव पाहिले तत्कालीन नगराध्यक्ष श्री. मेंन्डोन्सा साहेब यांच्या कारकिर्दीतले तर ह्या संपूर्ण योजनेला आमच्याकडून १३२ कोटीची मंजूरी घेतली यामध्ये सभागृहाचे कुठलेही दुमत नाही. या मंजुरीशी येथे काही अडचण नाही आहे तरी आता त्यांनी गमतीचा भाग सांगितला की, मागे जेव्हा उत्तन विभागाला पाईप लाईन द्यावयाची होती, टाक्या बांधायच्या होत्या. तत्कालीन नगरपालिकेने तसा प्रस्ताव मंजूर केला तसा ठराव मंजूर केला एम.एम.आर.डी.ए. च्या कार्यालयात जेव्हा हा विषय मांडला तेव्हा त्यांनी सांगितले की, उत्तन विभाग राई, मुर्धा, मोर्वा सोडून योजनेवरचा खर्च प्रस्तावित ११० ते ११२ कोटी जाणार आहे. आज आनंदाची बाब आहे की, ११० कोटीमध्ये ते उत्तनसुद्धा पाईप लाईन देण्यांस तयार आहेत या त्यांच्या वक्तव्याशी त्यांनी इथे ठामपणे रहावे रेकॉर्ड प्रोसेडिंग लाईक दॅट ह्या ठिकाणी प्रोसिडींग रेकॉर्ड व्हावा. ११० कोटीपेक्ष एकही रुपया जास्त खर्च होणार नाही आणि सगळ्यांना ह्या ठिकाणी पाणी मिळणार आहे आणि पुन्हा त्यांनी बदलू नये. काहीतरी उत्तनला संकल्पचित्र बदलली कारण भूगर्भाची पाहणी जमिनीच्या वर राहून करता येत नाही. हे जरी खरे असले तरी सॉईलपेट घेऊन त्या ठिकाणी पायलिंग करावे लागते की केसींग करावे लागते. या सगळ्या गोष्टी कळतात एवढे तंत्रज्ञान नक्कीच आमच्याकडे आहे. तेवढे पुढारलेले आहे आणि म्हणून ११० कोटीमध्ये ह्या सगळ्या लोकांचे काम होत असेल तर अतिशय चांगली बाब आहे. ५४ कोटींचे त्यांना म्हटले की, ए.सी. पाईपलाईन पुर्वीच्या लाईन मधील होती आणि महानगरपालिकेला ७ कोटी रुपये जे आम्ही १० एम.एल.डी.साठी दिले जी पाईप लाईन त्यांनी टाकलेली नाही त्याच्या बदल्यात ते म्हणताता आम्ही दुसरी पाईपलाईन टाकली आणि ह्याचा हिशोब गेल्या अनेक वर्षामध्ये सभागृहात मागितला, मिळाला नाही.

मध्यंतरीच्या काळामध्ये तो कसा आला माहिती नाही पण तो आला हे बरे आहे. निदान सदस्यांना सुध्दा हिशोब द्यावा कि साडेसात कोटी घेतले त्यातील आजपर्यंत किती उरलेत. तेही पैसे जर त्यांनी आम्हाला दिले तर उत्तन विभागामध्ये अंतर्गत वितरण व्यवस्था आहे. आणखीन काही एरियामध्ये अंतर्गत वितरण व्यवस्था किंवा इतर व्यवस्था त्याकरीता आम्हाला तो पैसा खर्च करता येईल. परंतु जर ते या ठिकाणी टाक्या बांधायला सक्षम असतील तर मग हा वेगळा विचार कशाला करतात. फक्त डिले करण्यासाठी आणि नवघरच्या टाकीची जागा दोन तीन वेळा बदलली नाही. फक्त एकदाच जेव्हा सुरुवातीला प्रपोज केली होती तीच जागा काम सुरु व्हायच्या अगोदर त्या ठिकाी नवीन ठिकाणी दिली त्या नव्या आणि जुन्या ठिकाणामध्ये पाव किलोमीटरचे सुध्दा अंतर नाही आणि म्हणून या ठिकाणी त्यांनी मांडलेला हा विषय सभागृहाने आणि मा. महापौर साहेबांनी, मा. आयुक्त साहेबांनी ह्याचा विचार करावा आणि ही योजना ६१० एम.एम.ची पाईप लाईन स्टेमने टाकली ती ३१ एम.एल.डी. मध्ये त्या ठिकाणी ५०० एम.एम.ची लाईन रिप्लेस केली आपण जर असे म्हणत असाल कि, ५०० एम.एम. ऐवजी ६१० एम.एम.ची लाईन रेल्वेखालून टाकली आणि भाईंदर वेस्टच्या सगळ्या इ.एस.आर.ला जर पाणी मिळत असेल तर ९१० एम.एम. पाईप लाईन साठी खर्च कशाला करता. उगाच नाहक खर्च होईल तो. ९०० एम.एम.ची पाईप लाईन रेल्वेखालून टाकायची गरज काय आहे. तुम्ही म्हणता की, आजच्या लोकवस्तीला ६१० एम.एम.ची पाईपलाईन रिप्लेस करुन जर पाणी मिळणार असेल तर नवीन पाईपलाईन टाकण्याची गरज नाही आणि म्हणून ९०० एम.एम.ची पाईपलाईन ही या नव्या ५० एम.एल.डी. योजनेतील आहे ती रेल्वेखालची आहे आणि तिला लवकर मंजूऱ्या मिळत नाही म्हणून ती लवकर टाकण्यासाठी एम.जे.पी.ने प्रयत्न करावेत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आपण मला वाटते भोजन अवकाश जाहिर करण्याच्या विचारात आहात. परंतु तत्पूर्वी ह्या वॉटर सप्लाय स्कीम बद्दल श्री. पिंजरकर साहेब, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांचे योगदान आपण चांगल्या प्रकारे पहिल्या फेजमध्ये व्यक्त केले आणि आता या झालेल्या आपल्या उत्तराने आणि त्यांच्या प्रति उत्तराने यांच्यामध्ये काहीतरी आणि कुठेतरी कन्फ्युजन होत आहे. ते सभागृहाला निश्चितपणे गोंधळामध्ये टाकत आहेत. म्हणून आमची आपल्याला विनंती राहील आम्हाला जास्त वेळ घ्यायचा नाही पण आपण त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा त्यांच्या कौशल्याचा आणि त्यांनी मिळविलेल्या माहितीची आणि आपण आपल्या खात्याच्या योग्य त्या आणखी वरिष्ठांच्या किंवा अधिक हुद्देदार माणसांचा तंज्ञाचा कुठेतरी अगदी चांगल्या प्रकारे सुसंवाद साधुन ह्या मिरा भाईंदर प्रश्नाकडे आज जेवढे लक्ष देतात त्यापेक्षा अधिक गंभीरतेने लक्ष द्यायला पाहिजे. या शहरात आगीचे वणवे पेटले होते, गोळीबार झाले होते आणि ह्या सगळ्या गोष्टींची कुठे पुनरावृत्ती होऊ नये आणि बसलेला सेट अप पुन्हा बिघडू नये म्हणून एम.जी.पी. आणि आपले जे संयुक्तीक मंडळ आहे स्टेम ॲथॉरिटी ह्या सगळ्यांनी ह्या प्रश्नाकडे अधिक गंभीरतेने बघायला पाहिजे. आपण सरकारी फतवे निघाले की, लगेच काहीतरी बावचाळून जाता आहेत आणि गोंधळाने निर्णय घेतात. शासनाने एक धोरण ठरविलेले आहे. ठाणे जिल्ह्यात पाऊस कमी पडला म्हणून १०з पाणी कपात, होय १०з कपात ही संपूर्ण ठाणे जिल्ह्यासाठी असली तरी सुध्दा पिसासली मिरा भाईंदरच्या साठी जे मंजूर पाणी ८१ द.ल.लि.ची जी योजना आहे जे संक्शन पाणी आहे त्या पाण्याचा पैसा आपण भरत आहोत. तर पाणी देतांना फक्त आपण ५०-५५-५२-४९ अशा पध्दतीने देतात तर या मिरा भाईंदरच्या पाणी पुरवठयाच्या १०з जो सिलींग लागलेला आहे तो लावू नका असे शासनाला आपण कळवावे अशी सभागृहाची भावना मी व्यक्त करतो.

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतोय, मी तीन मुद्दे या सभागृहाच्या समोर मांडयाचा प्रयत्न करीन. एक तर पहिल्यांदा सन्मा. सदस्य, माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्लजी पाटील यांनी असे म्हणतात की, पाण्यात बुडलेले कधी राहत नाही ते वर कधीतरी येते. ते उशीरा का होईना पण या सभागृहाच्या, या संपूर्ण अधिकाऱ्यांच्या आणि सदस्यांच्या समोर आले असे मला वाटते. आम्ही अनेक वर्षे या गोष्टींचा पाठपुरावा करीत आलेलो आहेत. एकच साधा प्रश्न आहे की, जेव्हा पातळीपाड्याचा इ.एस.आर. आहे आज ८१ एम.एल.डी. पाणी मंजूर आहे. यापैकी ५२-५३ येते असे म्हणतात पण खालची रिडींग जर महिन्याची घेतली आणि सरासरी काढली तर ती ४७ एम.एल.डी. सुध्दा येत नाही. ही वस्तूस्थिती आहे. त्यांनी काढून घ्यावी आणि असे असतांना आलेले कोणतेही पाणी कुठेही एक मिनिटसुध्दा एक लिटर साठवण्याची आजची परिस्थिती नाही. आलेले पाणी जसे येते इनलेटने येते आऊटलेटने जाते. कुठेही साठवण्याची आजची परिस्थिती नाही. आजची वाढलेली लोकसंख्या, आज होणारी सुधारीत वितरण व्यवस्था ह्या दृष्टीकोनातून कुठे

साठवायचा प्रश्न येईल किंवा साठवण्यासाठी कोणते पाणी येईल याच्यातलाही अंदाज नक्की अथेंटींक उत्तर इथे मिळाले पाहिजे की, येणारे पाणी ज्या दिवशी ८१ एम.एल.डी. पाणी येईल त्या दिवशी त्यातले १० एम.एल.डी. पाणी ह्या संम्पमध्ये आपण साठवू शकू कि ज्या दिवशी पाणी खंडीत होईल त्या दिवशी ते वापरता येईल. ज्यावेळी अशी परिस्थितीच तयार आहे आजची ही परिस्थिती योगायोगाने नाही, ती परिस्थिती आलेली आहे. सगळ्यावरती लादली गेलेली आहे की, संख्येच्या प्रमाणात ती वाढ झाली आणि पाण्याची आवश्यकता वाढली, डिझाईन करतेवेळी जरी ते संम्प साठवणूक म्हणून केलेले असले तरी आजच्या घटकेला अनेक वर्षापर्यंत साठवणूकीचा विषय येईल असे माझ्या माहितीनुसार तरी नक्कीच नाही आहे. साठवण्याला कुठेही संधी मिळणार नाही मग जर साठवण्याला संधी नसेल तर ती ३ कोटीची मशिनरी आधी कशी आली. ३ कोटीच्या ऐवजी आता त्यातील सिल्वर पार्क आणि याच्या ठिकाणचे बनलेले संम्प आपण वापरणार आहोत का, बनणारे संम्प आपण वापरणार आहोत का? नाहीतर आजपर्यंतच्या आधीच्या दोन्ही टर्मच्या सदस्यांना कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही स्वाभावाचे सदस्य असले तरी पाणी प्रश्नामध्ये कोणीही कधीही नकारात्कम भूमिका घेतली नव्हती. जे जे एम.जे.पी.ने मागितले त्या त्या क्षणी खास सभा घेऊन सुद्धा परवानग्या, मंजूऱ्या दिलेल्या आहेत. असे असतांना आम्ही चार वेळी म्हणजे अनेक वेळा पण चार मुद्दे केले होते की, नगरपालिकेचा पैसा लुटला जातोय, लुटला जातोय. आमचे माजी नगराध्यक्ष बरेच उशीरा त्याच्याशी सहमत झाले. नाही काका हे पैसे लुटले जाताहेत आणि त्यांनी ही त्यांच्या नगराध्यक्षाच्या पॉवरमध्ये मग त्यांनी बोलायला सुरुवात केली की, आपले पैसे लुटतात आपले पैसे लुटतात आणि त्यातील सत्य लोकांसमोर आले. आज हे ८४ नगरसेवक, इतके अधिकारी, मागे ऐकणारे पत्रकार किंवा नागरिक यांच्या समोर येते. तुम्ही आम्हाला पाणी दिलेले आहे आम्ही तुम्हाला योग्य वेळी योग्य धन्यवाद दिलेले आहेत. ज्या ज्या वेळी असे जे सत्कार झाले किंवा ज्या ज्या वेळी घटना घडल्या सर्व मिरा भाईंदरच्या नागरिकांनी आपल्याला धन्यवाद दिले पण आता जो प्रश्न येतोय कि, तुमच्यात नि आमच्यात नागरिकांमध्ये कुठेतरी घोळ माजतोय किंवा कुठेतरी पाणी मुरतेय. तो प्रश्न येतो याचे शंकेचे निरःसण करण्याचे जसे लिओजींनी सांगितले त्यांच्याही म्हणण्यामध्ये तथ्य आहे की, यामध्ये कुठेतरी अंतर वाढवून आहेत. प्रफुल्लजीने सांगितले की, ११० कोटीमध्ये माझीही माहिती आहे की, आम्ही सभागृहाने दिलेली मंजूरी ही १३२ कोटीची आहे. त्यामुळे आमचा एवढा जर फायदा होत असेल तर तो नक्कीच फायदा आहे. तर पैसा जातोय तो कोणा एका व्यक्तीसाठी जात नाही. तमाम नागरिकांसाठी जातोय. एका विभागासाठी जात नाही पण यांच्यावर त्यांनी सांगितल्याप्रमाणे मीही सांगतोय, तुम्ही फॉम रहा आणि आवश्यक ज्या बाबी आहेत संम्प नकोच असेल तर आता संम्प कशासाठी बांधता आणि आवश्यकता असेल तर त्याची अधिक कुंठीतता घेण्याची आवश्यकता नाही. माझ्या माहितीनुसार पातळीपाड्याचे पंम्प संम्पमधून इ.एस.आर. मध्ये येणारे पाणी ग्रॅव्हेटीने आज येत आहे, कुठेही नाही. जे जे काम आपण नगरपालिकेने कसे कसे नुकसान केले तुम्ही जेसल पार्कच्या इ.एस.आर. लाईन जोडली. १४ मे २००२ ला लाईन जोडली आणि १४ मे नंतर मी २४ मे ला आपल्याला पत्र दिले की, तुम्ही हे इ.एस.आर. पंम्प सोडून पंम्प बंद करा. इ.एस.आर. ग्रॅव्हेटीने भरा पण अजूनही तो पंप इ.एस.आर. ग्रॅव्हेटीने भरायला सुरुवात केली नाही. उगाच आमचे ५५ हजार रुपये मासिक नुकसान होत आहे आणि अशा अनेक पद्धती या ठिकाणी महापालिकेचे किंवा आधीच्या नगरपालिकेचे आज महापालिकेचे नुकसान होत आहे. मी सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे महापौर मॅडमचेही हावभाव दिसतात की, आता आटोपतं घ्या. पण माझी एक विनंती राहील याच विषयासाठी मा. महापौर साहेब आणि मा. आयुक्त साहेब आजच्या घटकेला त्यांची ती भूमिका मा. उपायुक्त साहेबांना आपण कुठेही चार प्रश्न विचारु शकतो पण त्यांनाही विचारते वेळी आपलीही थोडीशी कसरत होते. याच्यासाठी एक स्पेशल सभा म्हणजेच खास सभा पाण्यावरती मग ती कुठलीही असो. उत्तनची असो, काशीची असू दे, पूर्वेची असू दे, पश्चिमेची असू दे. वितरण व्यवस्था, ए.सी. व्यवस्था कारण आज असे होतेय की, ज्या ठिकाणी आपली व्यवस्था चालू आहे त्या ठिकाणी येथे जॉईन्ट मारा कनेक्शन ट्रान्स्फर करा. कुठलेही कनेक्शन ट्रान्सफर करतेवेळी सहा ते सात हजार कारण नसताना घेतले जातात. ही जी पाईप लाईन वर्कींग आहे, पाणी पुरवठा सुरु आहे आणि त्याला उगाच कुठेतरी जोडले जाते आहे आणि लोकांना पाणी हवे आहे हा जो एक विषय आहे की, नाहक नागरीकांना नाडवले जाते आहे. उप आयुक्त नेहमी सांगतात पहिल्यापेक्षा आता बरे पाणी मिळत आहे. हक्काचे मिळत नाही त्याचे दुःख होत आहे. पाणी मिळायला पाहिजे ना. जेवढे मिळते तेवढे पुरेसे मिळते असे नाही आहे. त्यामुळे हे सर्वांना सम प्रमाणात मिळेल अशा पद्धतीचा पाणी पुरवठा व्हावा यासाठी खास सभा बोलवावी अशी माझी विनंती आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम मला जेवणानंतर बोलण्याची परवानगी द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम एकच शब्द बोलण्याची परवानगी द्या. एम.जे.पी.च्या अधिकाऱ्यांनी मघाशी सांगितले ब्रम्हांडला पाणी मिरा भाईंदरचे दिले नाही. त्यांची सेपरेट लाईन आहे. पण माझा ठाम त्यांच्यावर आरोप आहे कि, निश्चितपणे आमच्याच लाईनमधून पाणी त्यांना दिलेले आहे. कारण वारंवार नाईक साहेब जेव्हा उप आयुक्त होते तेव्हा घडी घडी त्यांना बोलावले होते तिकडे, सॉरी आयुक्त असतांना आणि निश्चित त्यांना मिरा भाईंदरचे पाणी दिलेले आहे ब्रम्हांडमध्ये याची मला निश्चित खात्री आहे.

**उप-आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये मी काही संपूर्ण माहिती देणार नाही. संपूर्ण माहिती पिंजरकर साहेब देणार आहेत. पण काही गैरसमज निर्माण झालेले आहेत. यामध्ये संम्पची आवश्यकता जी आहे ती मुळात लगेचच पाहिजे असे काही नाही आहे. पातळीपाड्यावरुन डायरेक्ट टाकी भरली जाते. ज्यावेळेला लाईटचा खोळंबा होईल किंवा पाण्याची पाईप लाईन फुटली असेल त्याच वेळी वापर करण्यासाठी संम्प बांधायचा आहे आणि संम्प एवढ्या तातडीची गरज नाही परंतु प्रिकॉशन म्हणून हे होण्यासाठी ज्या ठिकाणी टाक्या बांधायच्या आहेत त्या ठिकाणी संम्प बांधण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. म्हणून मंजूरीचा प्रस्ताव आणलेला आहे आणि सध्या ग्रॅव्हेटीने सर्व ठिकाणी टाक्या भरल्या जातात आणि आमची मागणी अशी होती की, पहिल्या टाक्या बांधा नंतर संम्पचा विचार करु. त्यानंतर ज्या मशिनरी खरेदी केल्या गेल्या त्यावेळी आम्हाला विचारले गेले होते की, ह्या मशिनरी आम्ही दुसरीकडे वापरतो आणि त्याला तुम्ही परवानगी द्या. त्यावेळी आम्ही सांगितले होते की, आम्ही परवानगी देऊ मात्र त्याच किंमतीमध्ये पुढे लागणारी मशिनरी आम्हाला त्याच किंमतीमध्ये पडली पाहिजे ज्यादा किंमत लागू नये हे आम्ही त्यांना कळविले होते आणि ते सुरक्षित ठेवलेले आहेत कारण आम्ही पत्र असे दिलेले होते कि जी किंमत आता पडलेली आहे. तीच किंमत पुढे खरेदी करण्याकरीता सुध्दा तीच किंमत धरावी.

**रोहिदास शंकर पाटील :-**

तीच किंमत तीच मेड. त्याच कंपनीचे मटेरीयल.

**मा.उपआयुक्त :-**

कंपनी तिच असणार आहे आता सद्या जे आहे आम्ही टाक्या पुर्ण करा आणि नागरीकांना पाणी पुरवठा होऊ दया आणि पिंजरकर साहेबांना आमच्या सभागृहातर्फे विनंती आहे की, आमची ८१ एम्.एल्.डी. पाणी पुरवठा कोटा मंजूर आहे आणि त्याचे पैसे सुध्दा आम्ही इरिगेशनला भरतो त्याच्या दहा टक्के कपात करावी चालू असलेल्या पाण्याच्या १० टक्के कपात करु नये या सभागृहाची जी मागणी आहे ८१ एम्.एल्. डी. च्या १० टक्के केले तर ८ एमएलडी कमी होईल म्हणजे आता जे आम्हाला मिळतेय ते जे आम्हांला ५८ ते ६० एम्.एल्. डी. मिळते ते मिळतच राहील कारण आम्ही जे उचलतच नाही. उचलतो सध्या जे पाणी मिळते त्या पाण्याच्या १० टक्के कपात केले तर पाणी टंचाई भासेल कृपया आपण तसे कळवावे अशी नम्रतेची विनंती आहे.

**मा. महापौर सो. :-**

पुढचा विषय घ्या.

**पिंजरकर :-**

मा. महापौर, उपस्थित सभागृहातील सन्मा. सदस्य सध्याच्या ज्वलंत पाणी प्रश्नाबाबत याबद्दल बरीच चर्चा झालेली आहे. सभासदांच्या ज्या शंका होत्या त्याबाबत बरेचसे निरसन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जास्तीत जास्त किती चांगल्यापध्दतीने पाणी देता येईल या करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रयत्नशील आहे. यामध्ये येणाऱ्या अडचणी हया वारंवार आम्ही संबधित नगरसेवक किंवा महापौर हयांच्या कानावरती घालत असतो. जुन्या योजनेच्या हिशोब जो आहे. जो बऱ्याच दिवसाचा प्रश्न होता हा मागच्या वर्षी आपण दिलेल्या आहे पुर्ण हिशोब दिलेला आहे. त्यातील काही ४६, ४३ लाख शिल्लक आहेत आणि ती शिल्लक आम्ही कबुल केलेली आहे आणि महानगरपालिकेला कळविले आहे. कि ४३ लाख आमच्याकडे शिल्लक आहेत. पुढची जी काही कामे होतील त्यामध्ये ती कामे ॲडजेस्ट करण्यात येतील त्यानंतर थकित पाणी बिले आहेत हा सुध्दा गेल्या पाच सहा वर्षापासूनचा प्रश्न चालू आहे हया बद्दल सुध्दा आम्ही त्यांची सविस्तर विवरणपत्रे महानगरपालिकेला सादर केलेली आहेत त्यांनी त्याच्या स्तरावर सुध्दा

तपासणी केलेली आहे. आणि तो सुध्दा इश्यु काही दिवसांत सेटल होण्याची शक्यता आहे. तर मिरा भाईंदर पाणीपुरवठा योजनेच्या संबधित नवीन योजना असो किंवा जूनी योजना असो किंवा पाणी देयकाचा प्रश्न असो हयाबाबत महानगरपालिका आणि एम्.जे.पी. आम्ही एकमेकांशी समन्वय चांगले ठेवून जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो आणि जेणे करुन या नागरीक्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याचा तुडवडा पडू नये किंवा अडचण भासु नये यादृष्टीने प्रयत्न करतो या करीता आपणा सर्वांकडून जे सहकार्य मिळते त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आणि या प्रकारे पुढेपणा एम्.जे.पी. मार्फेत जास्तीत जास्त सेवा देण्याचा आम्ही प्रयत्न करु. धन्यवाद.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम मा. शिवमूर्ती नाईक सो. सांगितले की सध्या संम्पची आवश्यकता नसल्याने आपण हा विषय प्रलंबित ठेवावा आणि तसेच एम्.जे.पी. अधिकाऱ्यांनी सुध्दा आमच्या ज्या टाक्या प्रलंबित आहे त्या लवकरात लवकर बांधाव्यात आणि मा. कलेक्टर सो.यांना आपण सांगावे कि मिरा भाईंदर परिसरात पाण्याच्या टंचाईमुळे जी अनेक आंदोलने झाली आणि ही आंदोलने पुन्हा होवू नयेत आणि तसेच आपण घेतलेल्या १० टक्के पाणी कपात ही प्रलंबित ठेवावी तसेच मा. आयुक्त सो. व मा. महापौरांना विनंती करतो कि ज्या प्रमाणे आपण खत प्रकल्प आमच्या सर्व नगरसेवकांना दाखविला त्याच प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेची ५० एम्.एल.डी. पाणी योजना आपण सध्या कुठपर्यंत आहे आणि ती कितीपर्यंत पुर्ण झालेली आहे. तरी सगळया नगरसेवकांना आपण जशी नाशिक येथे अभ्यास गट नेले तसेच याप्रमाणे ही तयार करावे आणि ५० एम्.एल्. डी. ची योजना बाबत आमच्या सगळया नगरसेवकांना सांगावे. धन्यवाद.

**मा. उपआयुक्त :-**

संम्पची आवश्यकता नाही असे म्हटलेले नाही. सध्या जो पाणीपुरवठा होतो तो ग्रॅव्हटीने होता सगळया टाक्या भरतात पण प्रिकॉशन म्हणून काळजी म्हणून घेण्यासाठी संम्प हे आवश्यक आहेत भविष्यात समजा एखादया वेळी लाईट गेली किंवा पाईप लाईन फुटली तर संम्प मधून टाक्या भरुन पाणी दयावे म्हणजे संम्पची आताची जी जागा बदलायला मागणी आली ती ६० लाख रुपये खर्चाची बचत होणार आहे.बदलायला मान्यता दयायची कि टाकीच्या येथे आहे तेथेच बांधायचे हा निर्णय सभागृहात घ्यायचा आहे. कारण टेक्नीकली यांचे म्हणणे आहे कि ६० लाख रुपयांची बचत होते तर जागा बदल सुचवा या बाबत त्यांनी तसे आपल्याला पत्र दिल. हे करणे आवश्यक पण प्रिकॉशन म्हणून करणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. नाईक सो. माझे म्हणणे असे होते की संम्प बांधावे लागणारच आहेत परंतु सध्या तरी संम्पची आवश्यकता नसल्याने आपण जेव्हा एक खास सभा घेणार आहोत ज्यावेळी आपण ५० एम्.एल्. डी. योजनेची माहिती देणार आहेत त्यावेळी ॲक्च्युअल पोजीशन ॲक्च्युअल साईज बघून महानगरपालिकेची जनरल बॉडी हा निर्णय घेईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी अतिशय महत्वाची बाब आहे या ठिकाणी आवश्यक नसलेले अशा प्रकारचे वक्तव्य केले जात आहे. संम्प आवश्यक नाही आहे. योजनेत समाविष्ठ का केले हा प्रश्न निर्माण झाला मग ते संम्प योजनेत समाविष्ठ करायला नको होते बर योजनेत जर समाविष्ठ केले तर नंतर कळले की, संम्पची गरज नाही. ग्रॅव्हीटीने जर सर्व ८,९ टाक्या भरत असतील तर खरच सगळे संम्प रद्द करा तर मग टेंडर तरी कशाला फ्लोड केली गमतीचा भाग आहे कि टेंडर फ्लोड झाली २० टक्के लोअर झाली टेंडर आणि मग अशावेळी तुम्ही टेंडर पण रद्द करणार आणि या योजनेला काही मुदत ठरलेली आहे कि नाही कि ती ३ वर्षात ती योजना पुर्ण करायची आहे कि १० वर्ष तुम्ही प्रलंबितच ठेवणार आणि म्हणून या ठिकाणी ज्या ठिकाणी टाक्या प्रस्तावित केल्या आहेत त्या ठिकाणी टाक्या कराव्यात आणि लवकरात लवकर काम चालू करावे असा मी ठराव मांडत आहे.

**अशोक पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत शहा :-**

मा. महापौरांच्या परवानगीनें बोलतो खरोखरच खेदाची बाब आहे की ज्या जमिनीचा वाद आहे. जमिनीचा वाद कोणाबाबत हे सांगितले नाही ही चांगली गोष्ट नाही वाद नाही त्या ठिकाणी काम सुरु झाले होते हे मला माहित आहे. मा. सदस्य आमचे मिरा भाईंदरचे श्री. सिंग सो. यांच्या जमिनीबाबत हा वाद होता

तर त्यांनी स्व:त  जमिन ही दिलेली आहे. हया प्रकारचाी चर्चा नगरपालिकेत झालेली होती तरी त्या जागेवर पायलिंग टाकली गेलेली आहे तर त्या ठिकाणी का काम बंद केले गेले दुसरी गोष्ट जी आहे की आज १२ ,१२ वर्षे मिरा भाईंदर मध्ये हे काम चालू आहे. परंतु कितीतरी आंदोलने केल्यानंतर सुध्दा या ठिकाणी पाणी २४ तासामध्ये एकदा सुध्दा मिळत नाही आहे. याबाबत कुठलीही कारवाई व्यवस्थित होत नाही हे बरोबर नाही याबाबत आपले अधिकारी आलेले आहेत त्यांना सुध्दा नम्र विनंती आहे टाईमानुसार पाणी लोकांना मिळाले पाहिजे २४ तासात एक वेळ पाणी आज वीस वर्षापासून हेच चालत आलेले आहे किती तरी करोडो रुपये खर्च करुन सुध्दा येथे टाईमावर पाणी मिळत नाही. रात्री २ वाजता पाणी येते ३ वाजता येते कुठे कुठे वाहून जात आहे ही स्थिती बरोबर नाही आहे हा महत्वाचा मुद्या आहे. मिरा भाईंदर शहराकरिता आणि काही काही ठिकाणी पाणी हे २४ तास मिळत आहे. दररोज मिळत आहे याबाबत आमचे काहीही म्हणणे नाही पाणी मिळाले पाहिजे परंतू ज्या विभागात आज पाणी मिळत नाही त्याच्या बाबतीत कुठलाही विचार केला जात नाही आज १५-१५ सालापासून जी विटंबना आहे त्याला दूर करण्यासाठी आजपर्यंत मला नाही वाटत की एक इंजिनियर आला दुसरा आला तिसरा आला पाच आले. ऐकतच असतात पंरतू यांच्यासाठी आपल्याला कमिटी करुन याचा निर्णय लवकरात लवकर झाला पाहिजे हे संम्प बनवायला पाहिजे कारण की पाण्यासाठी संम्प नाही बनवणार तर कधीही पाईप लाईन फुटली तसेच इतर काहीही झाले परत तसेच आंदोलने होतील तरी याचा निर्णय लवकरच झाला पाहिजे संम्प जेथे होते तेथेच बनवायला पाहिजे त्याची जागा बदलू नये त्या ठिकाणी लाखो रुपये खर्च झालेले आहेत व जमिनी मालकाला आपण सर्व मिळून समजावू का देणार नाहीत ते जमिनी मालक जागा तरी याबाबत माझे असे म्हणणे आहे कि संम्प तेथेच बनले पाहिजे आणि त्याप्रकारे जी संम्पची जागा आहे तेथे नियमित करुन त्या ठिकाणी संम्प बनले पाहिजे. असे माझे म्हणणे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर सो कि जो पर्यंत सगळया नगरसेवकांना आपण ५० एम्.एल्. डी. पाणी योजनेबाबत माहिती देत नाही आणि संबंधित ठिकाणी आम्ही घेऊन जात नाही तो पर्यंत हा विषय प्रलंबित ठेवावा असा मी ठराव मांडत आहे.

**लिओ कोलासो :-**

वस्तूनिष्ठ आहे त्याचे आम्ही समर्थन करतो आणि त्यास अनुमोदन देतो आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम मौजे वरसावे येथे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जागा निवासी इमारतीसह ताब्यात घेण्यासाठी सदर कारणेस मी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**रोहिदास शंकर पाटील :-**

मा. महापौर सो. एकतर बी.एम.सी.  ची जागा आहे असे लिहिले गेले आहे. हायवेच्या कामासाठी त्या शेड बांधल्या होत्या राष्ट्रीय महामार्गाचे खाते वेगळे आहे आणि बी.एम.सी. चे खाते वेगळे आहे. या दोघामध्ये किती सांमजस्य किंवा संगनमत झालेले आहे हयाचा अंदाज घ्या पेपर्स सगळे टायटल क्लिअर करा आणि आपल्या महापालिकेला असल्या जागेचीही गरज आहे. आणि आता अधिकाऱ्यांना राहायला घरे हवी आहेत त्याचीही गरज आहे पण आमची विनंती एवढीच आहे आता जे काही तांत्रिक मुद्दे नंतर उशीरा लक्षात येतात तश्या दृष्टीने आपण नंतर अडचणीत येऊ नये अशासाठी सर्व तांत्रिक बाबी तपासून ही जागा इमारती ताब्यात घ्याव्या अखेर शासकिय कामकाज आहे. शासकिय रक्कम दयायची आहे. महापालिकेची रक्कम दयायची आहे. महापालिकेलाच वापरायचे आहे त्यामुळे आणखी कोणाचे दुमत असावे असे मलाही वाटत नाही.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम हया विषयाशी मी सुचना देऊ इच्छितो, एखादया चांगल्या कामासाठी ही जागा ऑलटरनेट होत असेल किंवा पी. डब्लू. डी म्हणा राष्ट्रीय हायवे म्हणा किंवा आपल्या कर्मचाऱ्यांना घर ऑफीसर लोकांना घर या ठिकाणी माझी सुचना आहे कि मा. महापौर व मा. आयुक्त यांना देखिल बंगला देण्यात यावा हा एक ठराव मी मांडत आहे.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा स्विकृत सदस्य हे ठराव मांडू शकतात का?

**रोहित सुवर्णा :-**

सॉरी, सूचना आहे हि माझी आपण माझी चुक निर्दशनास आणून दिल्याबद्दल धन्यवाद.

**जेम्स कोलासो :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो सदर प्रस्ताव महासभेपुढे येण्यापुर्वी दि. ४ जानेवारी २००३ रोजी हा स्थायी समिती समोर आला होता आणि त्यावेळी मी त्या प्रस्तावाच्या विरोधामध्ये हरकत घेतली होती. प्रस्तावित जागेमध्ये पारंपारिक मच्छिमारी करणारे लोक रहात आहेत. त्या जमिनीचा वापर पांरपारिक व्यवसायाकरीता होत आहे. शिवाय तिथे एक २०० ते ३०० लोकवस्तीची झोपडपट्टी वसलेली आहे. अशा परिस्थितीत हा जो प्रस्ताव अचानक सभेपुढे आला. पारंपारीक मासेमारी व्यवसायाच्या हिताच्या दृष्टीने अनेकवेळा शासन हया व्यवसायांना अनेक प्रकारे मदत करीत असते त्यातलाच एक भाग म्हणून एक महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक होत कि सरकारी जमिनी मच्छिमारांच्या धंदयाकरीता मच्छिमारांच्या गावातल्याच खुल्या जमिनी मच्छिमारांना विहित करण्याबाबत. मी सभागृहाच्या माहिती साठी हे परिपत्रक थोडक्यात वाचून दाखवितो हया परिपत्रकाचा नंबर आहे. क्रमांक एल. एन्. डी. /१०८१/सी. १७२ सीआर २४१५ ४ फेब्रुवारी १९८३. शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्र. सो ॲड सो. दि. १० डिसेंबर १९६५ अन्वये मच्छीमाराच्या गावालगतच्या मोकळया जागेचे वाटप करतांना मच्छिमार आणि त्यांचे सहकारी संस्थाना प्राधान्य देण्यात यावे आणि वाटप करणेपुर्वी मा. संचालक यांचा सल्ला घेण्यात यावा असे आदेश देण्यात आले आहेत तथापि सदर आदेशाचे पालन केले जात नसल्याने मच्छीमाराच्या धंदयाच्या दृष्टीने गरज असलेल्या मोकळया जागेचे वाटप अन्य कारणासाठी मोठया प्रमाणात होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे वांरवार करण्यात येत असल्यामुळे सदर जमिनी मच्छिमारांच्या उपयोगासाठी विहित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता महाराष्ट्र शासन महसूल अधिनियम १९६६ कलम ३२ अन्वये खुल्या सरकारी जमिनी, स्मशानभूमी, गायरान धान्य गाळणेकरीता, रवळी बाजार मृत जनावरांची कातडी काढणे व इतर अनेक सार्वजनिक कारणासाठी विहित करण्याचे अधिकार सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. मच्छीमाराच्या धंदयासाठी म्हणजेच जाळी सुकविणे, मासे सुकविणे, बोटी दुरुस्ती करणे. याकरीता सुध्दा मच्छिमाराच्या वसाहती लगतच्या किंवा गावालगतच्या मोकळया जागा असणे अत्यावश्यक आहे. ही बाब सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे मच्छिमाराच्या धंदयासाठी सुध्दा त्यांच्या गावालगतच्या किंवा वसाहती लगतच्या सोयीस्कर खुल्या जागा महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २२ खाली तरतूदी नुसार विहित करण्यास हरकत नसावी असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. वरील परिस्थितीत आता सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत मच्छिमारांच्या गावालगतच्या वसाहती लगतच्या खुल्या जमिनी जागा मच्छिमाराच्या धंदयाकरीता म्हणजेच मासे सुकविणे याकरीता विहित करणेच्या दृष्टीने पाहणी करुन तसे मा. संचालक मच्छीमारांच्या तसेच इतर संबधिताच्या दृष्टीने पाहणी करुन तसे मा. संचालक तसेच इतर संबधितांच्या सल्याने जरुर तर कारवाई लवकरात लवकर करावी अशा प्रकारे विहित करण्यात येणात्या जागेची मालकी शासनाकडे असली परंतू स्थानिक लोकांच्या अशा जागांचा वापर फक्त सार्वजनिक कारणाकरिता करण्यात येतो त्यांनंतर सुध्दा १९९८ साली मा. पर्यावरण मंत्री केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. सुरेश प्रभुच्या प्रयत्नाने ज्या सी. आर. झेडच्या काही नियम होते ते मच्छिमाराच्या वस्तीसाठी ते शिथिल करण्यात आले आहेत आणि त्या संदर्भात सुध्दा जी. आर आलेला आहे. असे असताना याच शासनाच्या सवलतीचा फायदा घेण्यासाठी आम्ही मच्छिमार समाज उत्तन येथील ही जागा जी आपण प्रस्तावित केलेली आहे. सर्वे नं.२५ आणि सर्व्हे नं. ६५ ती मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहोत आणि हा प्रयत्न सुरु असतांना अचानक महापालिकेने हया जागेवर आपल्या प्रेशरने म्हणा आपल्या अधिकाराने म्हणा तडकाफडकी ताब्यात घेतलेली आहे. सर्व ठिकाणी शासन या पारंपारीक व्यवसायांना मदत करीत असतांना महापालिकेत मात्र हया भुमीपुत्रांच्या जमीनीवर जो प्रकल्प राबविणेचा चंग बांधलेला आहे. तो निषेधार्थ आहे. या मच्छिमार गावालगतच्या जमिनी जर इतर कारणासाठी वापरण्यात आल्या तर भविष्यात या मच्छिमार समाजाला हा व्यवसाय करण्यास फार अडचणीचे होणार आहे. मला येथे अभिमानाने म्हणावे लागते कि हा सभेमध्ये जवळ जवळ निम्म्यापेक्षा जास्त आगरी आणि कोळी समाजातून नगरसेवक निवडून आलेले आहेत असे म्हणतात की मुंबई ही कोळयाची तसेच आम्ही सुध्दा भाईंदर ही आगारी आणि कोळयाची समजतो या परिस्थितीमध्ये या शहरात येणाऱ्या लोंढयाला आपण स्वागत करुन स्विकारत आहात त्याला माझा विरोध नाही परंतु या पारंपारिक व्यवसायासाठी आत्ताच मा. अनंत पाटील यांनी सुध्दा त्यांच्या मिठागरच्या जमिनी विषयी व मिठागरच्या प्रश्नाविषयी बोलले आम्ही ज्या समाजातून येतोय त्या समाजाच्या पारंपारिक व्यवसायासाठी जे आवश्यक आहे ते त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आम्हांला प्रयत्न करावेच लागणार आहेत. आणि आपण जो प्रस्ताव आणलेला आहे तो शेकडो वर्षे ज्या जमिनीवर लोक मासळी सुकविण्यासाठी ज्या जागेचा वापर करीत असत त्या जमिनी आपण ताब्यात

घेणार आहात हया भुखंडामध्ये २०० ते ३०० जवळजवळ झोपडया आहेत त्या झोपडयासाठी महापालिकेने सर्व नागरीसुविधा दिलेल्या आहेत काही महिन्यापुर्वी त्या वस्तीसाठी जवळ जवळ ५० लाख रुपये खर्च करुन रस्ता बांधलेला आहे. आणि हे एक प्रकारे गृहीत धरलेले आहे. कि त्या झोपडपट्टीला मान्यता मिळालेली आहे. असे असताना हा अचानक प्रस्ताव आणून हया आमच्या जागेवर ज्या पध्दतीने महापालिका प्रकल्प राबवण्याचा प्रयत्न करीत आहे. हा माझ्या मते काही चुकीच्या मार्गाने येत आहे. प्रस्तावित जागा हि वाहतूकीच्या दृष्टीनेसुध्दा पुष्कळ खर्चिक आहे. आपण जो काल नाशिकला प्रकल्प पाहिला त्याचा टेक्निकल जरा आपण पाहिला त्यामध्ये आम्ही काही गोष्टी निर्देशनात आणू इच्छितो कि नाशिकचा हा खत प्रकल्प जवळ जवळ शहरापासून १० किलोमीटर अंतरावर आहे. मा. महापौरांनी सुध्दा त्यावेळी आम्हांला ही माहिती दिली कि हा प्रकल्प उभारत असतानां पुष्कळ लोकांचा विरोध झाला ज्या प्रकल्पाची रचना करण्यात आली ती हया सर्व लोकांच्या भावना लक्षात घेऊन तांत्रिक दृष्टया तो शहराच्या जवळजवळ १० किलोमीटर दुर अंतरावर आहे. तो प्रकल्प पश्चिमेला नसून तर तो पुर्वेला आहे कारण काही शास्त्रीय कारणे आहेत कि जी वाऱ्याची दिशा आहे ती हय किनारपट्टीमध्ये आहे. याभागामध्ये आहे ती पश्चिमेकडून पूर्वेला आहे. आणि त्यामुळे तो प्रकल्प त्या शहराच्या पूर्व दिशेला उभा आहे. त्यामुळे त्या शहरवासीयांना दुर्गंधी सारखा किंवा प्रदुषणाचा प्रश्न कमी भेडसावणार आहे. जो प्रकल्प आपण तिथे पाहिला तो संपुर्ण सपाट जमीनीवर आहे. परंतु जी उत्तनची जागा सर्वे नं. २५ आणि सर्वे नं. ६५ ही संपुर्ण डोंगर उतारावर आहे. त्या डोंगर उताराच्या खाली संपुर्ण शेती आहे. आणि अशा प्रकारचा हा प्रकल्प राबविताना पावसाळयात पावसामुळे कचऱ्यापासुन निघणारी घाणा, केमिकल्स हयाचा निचरा शेतजमिनीमध्ये होणार आहे. अशा प्रकारे आपण सुचविलेली जागा ही माझ्या मते प्रकल्पाला योग्य नाही. आम्ही या भागातील प्रतिनिधित्व करत असतांना या शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा सुध्दा विचार करीत आहोत त्यामध्ये दुमत नाही. परंतु हे आरोग्य सांभाळतांना हा प्रोजेक्ट राबवायला आमचा कोणाचाही विरोध नाही. परंतु ज्या पध्दतीने ही जागा हया प्रोजेक्ट करीता घेण्याचा प्रयत्न चाललेला आहे. तो चुकीचा आहे. म्हणून हयाला मी हरकत नोंदवून हा प्रस्ताव दुसऱ्याठिकाणी राबवण्याचा प्रयत्न झाल्यास स्थानिक भुमिपुत्रांचे जे पारंपारीक व्यवसायाचे प्रश्न आहेत त्याला सहाय्यभुत होईल आणि शेवटचा मुद्दा संपुर्ण जो नाशिक येथील प्रकल्प आहे तो किमान ८ एक्कर जमिनीमध्ये आहे. असे असतांना हया विभागात हया दोन्ही सर्वे नंबर मध्ये ३१ हेक्टर जमिन आपण अेक्वॉयर करीत आहात हे चुकीचे आहे. तरी या प्रस्तावाचा फेरविचार व्हावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर महोदया आज या ठिकाणी जो प्रस्ताव आलेला आहे. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियमाअंतर्गत प्रोसेसिंग युनिट आणि डंम्पींग ग्रांऊड यासाठी भुखंड आरक्षित करणेबाबत या विषय आहे. सभागृहामध्ये सन्मा. सदस्य जेम्स कोलासो यांनी याबाबतची हरकत नोंदविलेली आहे आणि सभागृहामध्ये सदस्याची जी कायदेशीर जबाबदारी आहे. यादोन्ही गोष्टींचा सारासर विचार होणे फार गरजेचे आहे. त्यापेक्षा कायदयाची बंधने आम्हांला कुठल्या रसातळाला नेतील हयाचा सुध्दा हयाठिकाणी विचार करता आला पाहिजे. आणि त्याहीपेक्षा पदाधिकारी आणि मा. आयुक्त हयांच्यावरती आर.पी.सी. खाली गुन्हा किंवा सहा महिन्यांची कैद जर आम्ही या कायदयाखाली कुठे काही याचा अर्थ मी कोणाला भिती दाखवत नाही सभागृह हे सुप्रीम असते आणि म्हणून हा सभागृहासमोर विषय आलेला आहे. अदरवाईज सरकारने डायरेक्ट हया ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प करावा असे आदेश दिले असते किंबहुना अशा प्रकारचे आरक्षण हे उत्तन मधील एखादया सर्वे नंबर मध्ये करण्यात यावे अशी काही सभागृहातील कुठल्याही सदस्यांची मानसिकता नव्हती. याउलट जो पश्चिमेकडून पुर्वेकडे जाणारा वारा आणि त्या अनुषंगाने त्या प्रकल्पामुळे वास त्या वाऱ्याच्या दिशेने जाईल पुर्वेकडे हा सगळा विचार करुनच भाईंदर पुर्वेला अशा प्रकारचे आरक्षण तत्कालीन नगरपालिकेच्या कारकिर्दीत करण्यात आले होते. तत्कालीन नगरपालिकेने केलेली कारवाई सुध्दा कायदयाच्या तरतुदींना अनुषंगाने धरुनच आणि त्याहीपेक्षा सर्वोच्य न्यायालयामध्ये जी पिटीशन दाखल झाली होती त्याच्यामध्ये जो निर्णय झाला होता त्यानुसार पर्यावरण कायदयाला अनुसरुन घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी, अस्तिवात असलेल्या सर्व नगरपालिकेने आणि महानगरपालिकेने करावी. त्याच्यामध्ये एक शेडयुल एक कार्यक्रम सुप्रीम कोर्टाने सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार व राज्य सरकार यांना एका अध्यादेशान्वये सर्व नगरपालिकेवर तो बंधनकारक कायदेशीर ठरवला आणि हयाठिकाणी जर त्या कायदयाची बंधने न पाळणाऱ्या आयुक्त असो तत्कालीन मुख्याधिकारी असो तत्कालीन नगराध्यक्ष असो आताचे महापौर असो उपमहापौर असोत तसेच सदस्य यांना कायदेशीर रित्या

जबाबदार धरण्याचे हया ठिकाणी अध्यादेशात नमुद केलेले आहे. याठिकाणी घनकचरा व्यवस्थापन हे करणे का गरजेचे आहे. ती जागा कुठे असावी हयाठिकाणी हा वाद नाही आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रोजेक्ट उभा करावा ही कायदयाने दिलेली आमच्यावरती जबाबदारी आहे. हयाचा आम्ही पहिल्यांदा विचार केला पाहिजे तो कुठे असावा माझ्या घराशेजारी असावा का आणखी दुसऱ्याच्या घराशेजारी असावा का हयाच्यापासून मला काय त्रास होणार आहे का मला तो त्रास होऊ नये म्हणून काय उपाययोजना करावी हया सगळया गोष्टी या अध्यादेशात नमुद केलेल्या आहेत आणि त्या अध्यादेशाच्या अनुषंगाने सगळयात पहिल्यांदा ३१/१२/०१ पर्यंत लॅन्डफील्ड साईड ज्या ठिकाणी कचरा आम्हांना टाकायचा आहे त्या इंक्ग्रुमेंट करायच्या होत्या. दुर्देवाने ३१/१२/०१ निघून गेले आम्ही फक्त जागा रिझर्व करु शकलो. भाईंदर पुर्वेला आणि नंतर असे लक्षात आले कि त्या जागेला सेन्ट्रल पोल्युशन बोर्डाची आम्हांला मंजूरी पाहिजे पण सेंन्ट्रल पोल्युशन बोर्ड आम्हांला मंजूरी कधी देणार जर ती जागा सी. आर. झेडने बांधीत होत नसेल तर दुदैवाने भाईंदर पुर्वेच्या दोन्ही जागा ज्या प्रस्तावित केल्या होत्या विकास आराखडयामध्ये आरक्षणासाठी धनकचरा व्यवस्थापन निर्मिती प्रकल्पासाठी त्या दुर्देवाने सी. आर. डी ने बाधीत होत असल्यामुळे त्या ठिकाणी पोल्युशन बोर्डाने आणि राज्य सरकारने त्याला नामंजूरी दिली त्यानंतर उत्तन मधील हा सर्वे नं. ६५,२५ हया जागा याठिकाणी निर्धारीत करण्यात आल्या एकीकडे ३१/१२/०१ रोजी जी प्रस्तावित केलेली कारवाई ती करण्यास आम्ही मागे पडलो त्यानंतर आयडेंटी फीकेशन ऑफ लॅन्डफील्ड साईड भविष्याकरीता येणाऱ्या २५ वर्षाकरिता आम्हाला प्लॅनिंग करायचे आहे या कायदयानुसार येणा-या २५-५०-१०० वर्षाकरीता आमचा कचरा त्या ठिकाणी साठवायचा आहे. ज्याच्यावरती प्रक्रिया झाली, प्रक्रिया झाल्यानंतर कचरा १०० टक्के नष्ट होत नाही तर त्याच्यातुनही काही कचरा उरतो तो कचरा टाकण्यासाठी जागा निश्चित करणे की १०० वर्षाचे ५० वर्षाचे २५ वर्षाचे नियोजन करण्यासाठी ज्या साईड आम्हांला डेव्हलप करायच्या होत्या त्याची तारीख ३१/१२/०२ आणि आम्ही आता २००३ मध्ये आहेत. ३१/१२/०३ च्या अगोदर आम्हांला या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनावरती प्रक्रिया करणारा प्रोजेक्ट उभा केला पाहिजे दुर्देवाने शासकिय अडचणी असोत किंवा आरक्षण ज्या ठिकाणी आम्ही सुचविले त्याठिकाणी सी. आर. झेडले बाधीत झाल्यामुळे आज हे सगळे होऊ शकले नाही आणि पुन्हा ही जबाबदारी तत्कालीन नगरपालिकेवरती होती ती आता आजच्या महापालिकेवरती आली आणि म्हणून महापालिकेमध्ये सर्व प्रशासकीय अधिकारी सर्व पदाधिकारी आणि सर्व नगरसेवकांची ही कायदेशीर बाब आहे. आणि जी तर आपण केली नाही तर येणाऱ्या परिणामाला आम्हालां सामोरे जावे लागेल अर्थातच जागा आगरी कोळी बांधवांची आहे. त्याच्यामुळे त्या सुरक्षित राहिल्या त्यात झोपडया झाल्या नाहीत त्यांनी त्याची खबरदारी घेतली हया झाल्या त्या त्यांच्या झाल्या त्या झोपडयांचा तो भाग आपण हयाच्या मध्ये अंर्तभूत केलेला नाही अशी माझी माहिती आहे आणि उर्वरीत जागेवरती जो काय वाद आहे हा स्थानिक लेवलचा वाद आहे. नगरपालिकेचे कायदेशीर कर्तव्य पार पाडताना एक सदस्य म्हणून मी जर याला मंजूरी देतोय तर स्थानिक लेवलला असणारा वाद मिटविण्यासाठी कायदेशीर जबाबदारी आम्ही मा.आयुक्तांवर सोपवतोय तुम्ही पहा जर आम्ही मंजूरी नाही दिली तर आम्ही त्याला बांधिल आहोत म्हणून आम्ही जर मंजूरी दिली तर वाद जो आहे जो काय वाद असेल खरोखरच १०० एकर जागा पाहिजे आहे का आणि जी तिथेच पाहिजे आहे का भाईंदर मध्ये ज्या ठिकाणी तुम्हाला शासकिय जागा उपलब्ध आहे. जी. सी. आर. झेडने बाधीत होत नाही सुदैवाने सी. आर. झेडने बाधीत झाली नाही म्हणून आपण ती सुचवली अन्य ठिकाणी जर अशी ५०-१०० एकर जागा असेल तर ती सुध्दा आपल्याला करायला हरकत नाही पण त्याच्यासाठी आता सभागृहाने वेळ घेता कामा नये कारण आम्ही मुदतीच्या बाहेर चाललो आहोत. महापौर मॅडम आम्ही मुदतीच्या बाहेर गेलो तर सभागृहाची सभा बोलवण्याची जबाबदारी आपली पिठासिन अधिकारी म्हणून आणि सभमध्ये मंजूरी देण्याची जबाबदारी आमची आयुक्त राहतील बाजूला आणि आम्ही दोघे सापडू म्हणजे आम्ही सगळे कायदयाच्या कचाटयामध्ये ते आम्हांला सापडायचे नाही. म्हणून आता सभागृहाने निर्णय घ्यावा कि तुम्हांला जी योग्य वाटते ज्या ठिकाणी वाद निर्माण झाला कायदेशीर रित्या त्यांचे काहि सेंन्टीमेंटस आहेत त्याच्या ही भावना आहेत आज त्या ठिकाणी आणखीन कोणी वेगळ काही केले नाही म्हणून ती जागा सुरक्षित राहिली कि त्याच्यापासून खरोखरच त्रास होतोय का, पुन्हा एकदा कचरा प्रकल्प पहावा त्याच्यातुन किती वास येतोय खरंच १०० एकर जागा पाहिजे का सुरुवातीला कि २५ एकर पाहिजे की ५० एकर पाहिजे का पुन्हा एकदा ईस्ट वेस्टला आणता येईल तर ती बघा तर तिथे खरोखर सी. आर. झेडने बाधा होत नसेल आणि तेवढी जागा तुम्हांला मिळत असेल तर परंतु सन्मा. सदस्यांनी हया ठिकाणी फार महत्वाची नोंद घेतली पाहिजे कि हया अध्यादेशाच्या तरतुदींना आम्ही बगल देऊन वेगळा जर काय निर्णय घेणार असाल तो तुम्ही घ्या मी तर

नाही घेणार मला याच्यातुन वगळून घ्या हि माझी मंजूरी आहे. म्हणून कारण मला येणाऱ्या पुढच्या कायदयाच्या कचाटयात सापडायचे नाही. परवाच्या दिवशी सर्वोच्च न्यायालयाने टिव्हीवरती एका आज तकच्या स्ट्रीपलाईनवर ज्या बातम्या येतात त्याच्यावर वाचले कि सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांकडे सर्व नगरपालिकेंनी या घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत काय केले याचा अहवाल पुन्हा मागितला आहे. आणि जर दुर्देवाने जर पून्हा ती केस रिव्हुला निघाली तर आम्ही आम्हांला गळफास लावून घेतला म्हणजे स्वत:हून आत्महत्या करण्याशिवाय दुसरा कुठलाही आम्ही प्रकार करणार नाही हे याच्यातुन स्पष्ट होते अर्थात याठिकाणी आमच्यापेक्षा दोन पावले आपण पुढे आहात तुम्ही जागा पाहिलीत जागा ताब्यात घेण्यासंबधी आरक्षणासंबधी बोलेन, तुम्ही जो विषय आणला त्यांच्या संबधी बोलतो आता घनकचरा प्रकल्प पाहिजे आपल्याला भुक लागली पोटात पण काय करायचे कचऱ्याची विल्हेवाटपण लावली पाहिजे ना प्रश्न असा आहे. मॅडम मी चेष्टेने नाही बोलत कि हया ठिकाणी जो आरक्षणाचा विषय जो आहे हा घनकचऱ्याच्या प्रकल्पापेक्षा जर वेगळा विषय आहे. हया ठिकाणी आपण असे म्हटले आहे कि ४८ कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांनी मांगितले आहेत. आपण असे म्हटले आहे. मला माहिती नाही टिपण्णीमध्ये असे म्हटले आहे कि ४८ कोटी रुपये या जमिनीचे मुल्यांकण जिल्हाधिकारी यांनी केलेले आहे आणि ते कशासाठी ४८ कोटी रुपये जमिनीचे किंमत मागत असतील आणि त्याला बगल देण्यासाठी आम्ही आरक्षणाचा विषय आणलेला आहे बरोबर आहे. मला या ठिकाणी असे म्हणायचे आहे कि ही जागा हिल एरिया म्हणजे डोंगराळ भागाच्या वापरासाठी आता डोंगर काही नवीन बांधणार नाही आम्ही ते आहेत म्हणून हिल एरिया असे दिलेले आहे आता इथे घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रकल्पामध्ये मला असे विचारावयाचे वाटते कि इथे कुठे चेंज ऑफ युज आहे. ३७ (१) चे आरक्षण आपण आणता आहात हे आरक्षण एखादया वापरामध्ये बदल करायचा असेल तेव्हा आपण आरक्षण आणतो. एखादी जागा कोंडवाडयासाठी रिझर्ववेशन केली आणि त्या ठिकाणी मला बिल्डींग बांधायची आहे तर मला कोंडवाडयाचे आरक्षण ३७-(१) खाली एम्.आर्.टी. पी. ॲक्टच्या १९६६ एम्.आर्.टी. पी. ॲक्ट ३७-(१) खाली मला अशाप्रकारचा प्रस्ताव कोंडवाडा काढून रेसिंडेशनल झोन करा मग मला बिल्डींग परमिशन निर्णय असे असतांना दुसरी महत्वाची बाब अशी आहे कि परिसर विरुध्द ऑर्गोनाझेशन, परिसर विरुध्द स्टेट महाराष्ट्र केस नंबर १९९० बॉम्बे सी आर ७९ हया केसमध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयान्वये एक जागा नो डेव्हलपमेंट झोनमधील फॉरेस्टसाठी रिझर्व करण्यात आली मेन डेव्हलपमेंट झोन आहे तो नो डेव्हलपमेंट झोन आहे. परंतु फॉरेस्ट म्हणजे ट्री प्लॅनटेशन करायचे आणि त्याच्यासाठी रिझर्व्हेशन करण्यात आली आणि त्याच जागेवरती त्या संस्थेने शैक्षणिक उपक्रम राबण्यासाठी मंजूरी मागितली ती मंजूरी दिली ती मंजूरी चॅलेंज झाली. कोर्टाने असा निर्णया दिला कि इकॉलॉजिकल स्टेटस बदली होत नसल्यामुळे अशा प्रकारच्या कुठल्याही आरक्षणाच्या बदलाला असे चॅलेंज करता येत नाही मला माहित नाही कि आपण आरक्षणाचा बदल आपण ३७(१) खाली का आणला तो कादाचित जिल्हाधिकाऱ्यांना आपल्याला मुल्यांकनांचे किंमत दयायची नसेल म्हणून नगरपालिकेचे ४८ कोटी रु. खर्च करु नयेत असे पण त्याही पेक्षा आपण दोन पावले पुढे गेलात कि जाणाऱ्या रस्त्यांचे टेंडर सुध्दा काढले आपण ४५ लाख रु. टेंडर आपण फ्लोड केले मला वाटते आतापर्यंत टेंडर आली असतील किंवा आजच्या मिटींगची वाट पहात असतील महत्वाची बाब आहे कि जिल्हाधिकाऱ्यांनी आतापर्यंत बऱ्याचश्या जागा हया भाईंदरमध्ये दिलेल्या आहेत सभागृहाच्या विरोधात जाऊन सुध्दा झालेत त्यातील एक जागा गॅमन इंडिया हया कंपनीला रेल्वे पुलाच्या कामासाठी दिली आहे. आणि ती लीज साठी दिली आता हे विषय पुन्हा येणार नाही कारण मुदत आमची संपत चालली आहे. म्हणजे हया प्रकल्पाला या अध्यादेशाप्रमाणे मान्यता देण्याची महापौर मॅडम पुन्हा आम्ही हा विषय आणू शकत नाही आणला तर आम्हीच डिले केला म्हणून आमच्यावर कारवाई होईल आणि म्हणून आपण या विषयाचा निर्णय घ्यावा आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे जोपर्यंत तुमचे हे रिझर्वेशन कारण ३७(१) खालचे जे आपण प्रपोज केलेले आहे. जरी मी म्हटले अशा प्रकारचा बदल हा बदल असू शकत नाही. कारण तो घनकच-याचा प्रकल्प आहे. इकॉलॉजीकल स्टेटस बदलत नाही त्याचा त्यामुळे ३७(१) च्या आरक्षणाचे टाकण्याची काही गरज नाही. कारण तुम्ही त्याचा युज एकदम वॉस्ट वेगळा होत असेल. थिएटर बांधणार असाल आपण त्याठिकाणी, मोठे इंटरटेन्टमेंट सेंन्टर बांधणार असाल त्याठिकाणी पैसे कमवण्याची साधने निर्माण करणार असाल आपण तर तो चेंज ऑफ युज म्हणता येईल आणि मग ज्याठिकाणी चेंज ऑफ युज होत नाही ती जागा आरक्षणाखाली दाखवून आपल्याला त्याचे मुल्यांकन कमी करण्याच्या ऐंवजी ती जागा आपण लिजने घ्यावी किंवा यापुढे येणा-या कुठल्याही जागेवर आपण जर मुल्यांकन भरण्याची पाळी आली तर त्याही ठिकाणी असेच करावे किंबहूना आज जर ३७(१) चे आपण आता बघा जसा आम्ही मुदतीमध्ये आपणाला ठराव दयायला पाहिजे ठरावाची कार्यवाही या

नगरसेवकानी करायची आणि पिठासीन अधिका-यांनी तो विषय आणायचा आहे. तो विषय आला तर ३७(१) खालील कारवाई आज आपण सुरु केलीत तर त्यांचे गॅझेट नोटीफिकेशन काढण्यासाठी आपल्याला दोन महिने लागतील दोन महीन्यानंतर आपण ऑब्जेशन सजेशन मागवणार त्यांच्यानंतर आपण त्यांना हेअरिंग देणार आणि त्यांना आपणमनात असल्याप्रमाणे नाही म्हणणार ते फायनल करणार आणि पुन्हा ३७(२) खाली फायनल फिक्सिग ऑफ रिझ्व्हेशनसाठी पुन्हा ठराव हयाच सभागृहापुढे आणणार आणि मग सभागृहाने हयाला दिरंगाई केली असे म्हणण्याची पाळी मात्र आमच्यावरती येऊ नये आणि म्हणून हा इकॉलॉजिकल स्टेटस बदलत नसल्यामुळे गरज असल्यास आमचा या आरक्षणाला मंजूर आहे आणि गरज नसल्यास आपण ती मंजूरी न घेता इकॉलॉजिकल स्टेटस बदलत नाही या ठिकाणी सन्मा. सदस्य जेम्स कोलासो यांनी जे म्हणणे मांडले आहे. त्या जमिनीच्या वादात मी पडत नाही. सभागृहाच्या भावना सदस्यांच्या एखादया जागेच्या बद्दल कारण ते त्या गावचे आहेत. तेथील जनता त्यांना विचारणार लोकप्रतिनिधि आहेत ते त्यांचे मी फक्त एवढेच म्हटले आहे. कि मुदती मध्ये तुम्हाला ठराव देण्यासाठी आजच्या सभेमध्ये आपल्यालाच आम्ही अधिकार देतो कि योग्य आहे योग्य वाटेल त्या योग्य जागेवर द्या पण योग्य आरक्षण द्या आणि या कामाला आपण गती द्या असा मी ठराव मांडत आहे.

रोहित सुवर्णा :-

आदरणीय महापौर मॅडम, आपण जेवणानंतर सभा घेणार आहात का असे काही लोक विचारतात कंटीन्यु करणार आहात थॅक्यु कालपण ५:३० वाजले. मा महापौर मॅडम मी आधीच परवानगी मागितली आहे. सन्मा सदस्य श्री. प्रफुल्ल पाटीलजी जे बोलले त्या मताशी मी सुध्दा सहमज आहे. त्यांनी जो मुंबई हायकोर्टाचा जो उच्च न्यायालयाचा जो ॲथॉरिटी आपल्यासमोर ठेवलेली आहे. परिसर व्हर्सेस १९९० चा जो सायटेशन आहे. तो अतिशय महत्वाचा आहे. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेशी दुसरे या ठिकाणी मी मुंबई हायकोर्टाचा एक सायटेशन मी आपल्या समोर देऊ इच्छितो कोंकण रेल्वेची केस कोंकण रेल्वेच्या केस बद्दल देखिल एनव्हॉरमेंट प्रोटेक्शन ॲक्ट १९८६ त्याच प्रमाणे एम.सी.मेहता व्हर्सेस दिल्ली मुनिसिपल कॉर्पोरेशन ताजमहल व यमुना रिव्हर या देखिल एनव्हॉरमेंट प्रोटेक्शन करण्याबाबत केस होत्या. हया सगळया केसबद्दल मा.आयुक्तसाहेब आपण जरा या सगळया सायटेशन आपल्यासमोर ठेविन अतिशय सुंदर आहेत. ज्याठिकाणी पोल्युशन का पाहिजे पॉप्युलेशन आणि पोल्यूशन हा विषय जरी वेगळा असला तरी पोल्यूशन विषय फार गंभीर आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या डायरेक्शन गाईडन्स हयाचे आपल्या सगळयांवर बंधन आहे. शिक्षा फक्त आयुक्तांना असे नाही आहे. एक लाख रुपये दंड पाच वर्षे शिक्षा इ.पी. ॲक्टमध्ये आहे. एनव्हॉरमेंट प्रोटेक्शन करत असतांना आंदोलन होणे, गोळीबार होणे किंवा लॉ ॲण्ड ऑर्डर प्रॉब्लेम होणे हे सहज आहे पण शेवटी लॉ ॲण्ड ऑर्डर कंट्रोल करणे लॅंड ॲक्वीझेशन करणे हि सगळी जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रफुल्ल पाटीलांनी ज्याकाही सूचना हया ठिकाणी ठेवल्या आहेत त्या मताशी मी देखील सहमत आहे. दुसरे इकॉलॉजीकल स्टेटस हयाठिकाणी बदलत नाहीत अतिशय कॉम्प्लीकेटेट विषय नाही. इकॉलॉजीकल स्टेटस बदलत नसताना ३७(१) खाली आपण जे काही ४८ करोडचे जे काही दाखविले आहे. परत मंजूरी परत गॅझेट साठ दिवस हियरिंग आणि मग निर्णय घेणे परत या सभागृहापुढे आणणे इट इज नथींग बट वेस्ट ऑफ टाईम तर ही सगळी माहिती मी आपल्यासमोर रायटिंगमध्ये हायकोर्ट आणि सुप्रिम कोर्टच्या जजमेंटसहीत ठेवणार आहे काही दिवसामध्ये तरी आपण माझी सहमती नोंद करुन घ्यावी आणि सगळी जबाबदारी ही प्रशासनाची आहे. धन्यवाद.

लिओ कोलासो :-

मा.महापौर आपल्या परवानगीने हा आमच्या उत्तन परिसराशी संबंधित बाब असल्यामुळे मी सभागृहाला विनंती करतो की, त्या विभागावरती आपण बरेच प्रेम केलेले आहे आणि त्या विभागाच्या अनेक अडचणीमध्ये अनेक प्रश्नामध्ये सहृदयतेने पाहून त्या विभागाशी आपले नाते जुळवून ठेवलेले आहे. टिकवून ठेवलेले आहे या सभागृहामध्ये या विषयावरती बोलतांना सन्मा सदस्य प्रफुल्ल पाटील आणि रोहित सुवर्णा. रोहित सुवर्णांनी लिगल ॲस्पेक्टस सांगितले. प्रफुल्ल पाटलांनी वस्तुनिष्ठ बोलले पण दोघांनी इकॉलॉजीच्या संदर्भामध्ये काही प्रश्न चर्चा केली कि ज्या विभागाची इकॉलॉजी बदलणार नसेल तर अशा ठिकाणी ३७ ची आवश्यकता वगैरे नाही. खरा मुद्दा तोच आहे की, पर्यावरण आणि इकॉलॉजी हया दोन्ही गोष्टी जवळजवळ एकमेकामध्ये गुंतलेल्या असतात. आणि त्या परिसरामध्ये हा जो खत प्रकल्प येणार आहे त्याचा इकॉलॉजीत डिस्टब होण्यामध्ये संबंध आहे. त्यापरिसरामध्ये मा.महापौर साहेब आणि मा.आयुक्त साहेब आपण या महानगरपालिकेला ४८ कोटी रुपयांचे प्रॉपर्टी वाढवून देण्याचे एक मोठे कार्य केलेले आहे. एक उदात्त कार्य

केलेले आहे. त्यामुळे आपल्या महापालिकेची पत उंचावणार आहे. त्यासोबत आपण या शहरातील ७ लाख लोकांच्यासाठी त्यांचे जे काही वेस्टेज आहे, घनकचरा आहे त्याचे चांगल्याप्रकारे प्रक्रिया करुन त्यामधून चांगले काहीतरी साधत आहात. तसेच ते पर्यावरण व इकॉलॉजीच्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्याचे कारण म्हणजे स्वत: मिरा भाईंदरने ड्राफ्ट प्लॅन बनवितांना या प्लॅनमध्ये ठिकठिकाणी तेच विचार व्यक्त केलेले आहेत आणि त्याची परत परत उजळणी सुध्दा त्याच्यात लिहिलेली आहे कि तो भाग सेन्सेटिव्ह आहे. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून व इकॉलॉजीच्या दृष्टिकोनातून त्याची प्रीपरेशन करताना म्हणून प्लॅन तयार होताना त्या भागामध्ये त्याचे नैसर्गिकपणा डिस्टब होऊ नये म्हणून शहरामध्ये एक एफएसआय दिला आणि त्याठिकाणी ०.५ एफएसआय दिला त्याठिकाणी भूमीपुत्राचा कॉरींगचा व्यवसाय होता ते कॉरींग डिस्टब करताय म्हणून कॉरींग वरती बॅनिंग आणली केवळ ५०० मिटरची नव्हे तर अस्तित्वात असलेली क्वारी मधील २ नंबर ३ नंबर डिलीट करुन फक्त एक मायनर कुठेतरी नविन प्रपोझीशन केले हयाचे कारणच असे आहे की, तो भाग इकॉलॉजिकलच्या दृष्टिकोनातून आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून सेंसेटिव्ह आहे. हया प्रस्तावामध्ये जेव्हा आम्ही आमची मत मांडली तेव्हा आयुक्त साहेब आपण सहृदयतेने त्या भागाच्या समस्या काय आहेत खरोखरीच असे प्रश्न असतील त्याच्यावर विचार व्हावा. तत्पूर्वी आपण नाशिक महानगरपालिकेने जो प्रकल्प केलेला आहे तो आपण जरुर पहावा असा आग्रह धरला आपला मान ठेवून आणि आमचेही कर्तव्य आहे की, शहरासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यायला पाहिजे आणि तो जर उत्तनमध्ये यायला पाहिजे तर उत्तनमध्ये यायला पाहिजे असे नाही कि तो उत्तनमध्ये येऊ नये. परंतु ज्या ठिकाणी प्रस्तावित साईड आपण दाखविलेली आहे ती मच्छिमारांच्या व्यवसायाच्या दृष्टिकोनातून जेवढी अडगळीची आहे. अडचणीची आहे त्या दृष्टिकोनातून सर्वे नं.६५ मध्ये आंब्याची , चिकूची, पेरुची आणि विशेषत: काजूची फार मोठयाप्रमाणावर झाडे लागवड झालेली आहे ही झाडे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून त्या विभागाच्या समतोलाच्या दृष्टिकोनातून नैसर्गिक कारणासाठी अत्यंत आवश्यक आहेत म्हणून त्याचसोबत त्याठिकाणी २००-३०० झोपडया आहेत त्याहीपलिकडे आपण एक टायटल प्रोजेक्ट म्हणून नाशिक महानगरपालिकेचा प्रकल्प बघण्याची आम्हाला संधी दिली. नाशिक महानगरपालिकेचा प्रकल्प हा लोकवस्तीपासून दहा किलोमिटरच्या अंतरावरती आहे आणि इंन्हॅबिटंन्स पासून चार किलो लिटरच्या अंतरावर आहे तसे पाहिले झोपडपट्टी ठिक आहे. आपले कायदे आहेत १९९५ पर्यंतच्या झोपडया ठेवायच्या नाहीतर झोपडया तोडायच्या. तुटणार नसतील तर त्यांचे शिफ्टींग करायचे हे मान्य आहे. परंतु केवळ २०० ते २५० मिटरच्या अंतरावर डोंगरीसारखे एक नमुनेदार टुमदार असे गाव वसलेले आहे आणि त्या गावाचे इंन्हॅबिटंन्सचे डिस्टन बघितले तर २०० ते २५० मिटरच्या अंतरावरचे असल्याने हा फॅक्टर आपल्याला कंन्सीडर करणे आवश्यक होईल म्हणून आम्ही या प्रकल्पाला विरोध करावा का असे पण नाही आम्ही त्याच्यासाठी पर्याय मांडत आहोत. कि जर आपला सभागृहाचा आपल्या अधिका-यांचा, सरकारचा असा हेतु असेल की, काही करुन उत्तनवाल्यांच्या डोक्यावरती हे मारायला पाहिजे तर जरुर मारा पण त्याच्यासाठी आम्ही जी भूमी दाखवतो आणि जिथे निर्देश करतो त्याचा सुध्दा आपण चारवेळा विचार करा. म्हणून हा निर्णय आजच्या सभेमध्ये घेऊ नका त्याठिकाणी एम.टी.डी.सी.ला १०० एकर जमिन सरकारने दिलेली आहे. एम.टी.डी.सीचा आजची एकंदर कामकाजाची पध्दती आणि त्या महामंडळाचा कारभार बघितला तर त्या मंडळाकडे काही नाही त्यांनी त्यांच्या जागा त्याचे बंगले भाडयाने दिलेल्या आहेत. प्रायव्हेटायझेशन ते करत आहेत आणि पुढच्या पंधरा वर्षामध्ये सुध्दा एम.टी.डी.सी. जो शंभर एकरचा प्लॉट त्यांना दिलेला आहे तो विकसित करेल कि नाही याची कोणतीही गॅरंटी नाही. दुसरा प्रश्न कि आपण जो प्रस्तावित ४५ लाखाचा रस्ता स्टँडींग कमिटीकडे आणला आहे त्यापेक्षा एम.टी.डी.सी कडे जाणारा रस्ता ऑलरेडी डी.पी.योजनेमध्ये सॅक्शन आहे त्याचा लेआऊट सॅक्शन आहे. पी.डब्लू.डी ने जो स्पॉनसर केलेला रस्ता त्यापूर्वी हाता फंडस नसल्यामुळे तो करता आला नाही आणि ज्याठिकाणी एम.टी.डी.सी.चा प्रोजेक्ट आहे त्याठिकाणी असली तर दहा बारा घरे इथून तिथून कोणाचे घर २०० मिटरवर कोणाचे घर १०० मिटरवर अशा अंतरावरती आहेत तर ही जी जागा आहे आणि पुन्हा असे कि ही जागा अशी आहे कि जिथे सी.आर.झेड चे बंधन लागू होणार नाहीत. पण कॉक्रीट रॉकची ही जागा आहे आणि त्या ठिकाणी खतप्रकल्प झाला तर त्याठिकाणाहून निर्माण होणारे बायोगॅस, दुर्गंधीयुक्त वायु हे पुढे सरकण्यासाठी हवेच्या झोताची गरज आहे त्या हवेमधून जाणारे हे वायुविजन जे आहे तर त्याठिकाणी तिवडीची हजारो नव्हे तर लाखो झाडे तिवडीची त्याठिकाणी आहेत की, ज्याच्यामुळे हे ॲपसॉब होईल आणि वातावरण शहरामध्ये येणारा दुर्गंध मोठया प्रमाणात नव्हे तर लक्षावधीने कमी होईल म्हणून आजच्या सभेने आपल्यापुढे आणलेला प्रस्ताव आजच्या घडीत लगेच काही मंजूरीला घेतला पाहिजे असे नाही. सन्मा प्रफुल्लजी पाटील यांनी सांगितले की,

जेलमध्ये जावे लागेल कोणाला जेलमध्ये जावे लागेल कामिशनरला कि सभासदांना सर्वांनाच जावे लागेल. प्रफुल्लजी एवढे घाबरायला लागले हयाची मला भिती वाटायला लागली आहे. हया प्रफुल्लजींनी पाणी योजना राबवतांना एवढी धडाकेबंद बापरली आणि अशाप्रकारे अधिका-यांना जेरीला आणून कायद्याचा बडगा दाखवून हे सगळे करुन घेतले ते प्रफुल्ल पाटील लगेच एका प्रश्नात चलबिचल होतात हयाचे मला दु:ख वाटते. प्रफुल्लजींचे विचार हे मी नेहमीच आदरयुक्त समजतोय प्रफुल्लजी आपण त्या भागात सतत येऊन जाऊन येणारे आहात म्हणून अतिशय समजूतदारपणे या प्रश्नाकडे बघा दुसरा प्रश्न असा आहे की, जेलमध्ये जातील कमिशनर साहेब म्हणत आहेत की वेळ थोडा आहे. आज फक्त इन मीन तीन दिवस झालेले आहे. आजची १६ तारीख आहे. पुढच्या डिसेंबरच्या ३१ तारखेपर्यंत बारा महिन्यांचा वेळ आपल्याकडे अद्यापही आहे म्हणून एम.टी.डी.सी.कडचे जे १०० एकरचे रिझर्वेशन आहे ते स्क्रॅप करुन ते महानगरपालिकेला मिळवायला पाहिजे आणि त्याठिकाणी फक्त चेज इन युजेस हा भाग लावून आपला प्रकल्प त्याठिकाणी घेतला पाहिजे तो उत्तन मध्येच घ्या. परंतु जी एम.टी.डी.सी.ची जागा मेरी मुव्हमेंट ॲण्ड कंपनी याच्या बाजूला लागून आहे ज्या भागाला कोपरा म्हणतात त्या भागात हा प्रकल्प घ्यावा अदरवाईस सभागृहाची आणि तुमची आमची सहमती घेऊनच याच्यावरती पुढील कारवाई व्हावी अशी मी त्या परिसराच्या वतीने मा.महापौर साहेब आपल्याला विनंती करतो.

मिलन म्हात्रे. :-

मा.महापौर साहेब मला बोलण्याची संधी द्यावी आपली परवानगी हवी सभागृहामध्ये या अगोदर बरेचशे वक्ते बोलले याच सभागृहाचा अभ्यासगट म्हणून काल आम्हाला नाशिक येथे नेले होते याच विभागातील बरेचसे नगरसेवक त्या विभागातील या नाशिकच्या अभ्यासगटामध्ये ते अनुपस्थित होते ही खेदाची बाब आहे. वैयक्तिक कारणे असू शकतात पण आपल्या मतदाराच्या हिताच्या दृष्टिकोनातून जो अभ्यासगट जातो आहे यामध्ये त्या विभागातील जवळ जवळ पाच ते सहा नगरसेवक अनुपस्थित होती ही फार मोठी खेदाची बाब आहे. आज आम्हाला नेले काल नेले, आम्हाला फार चांगले शिकायला मिळाले. काल जो प्रोजेक्ट आम्ही पाहिला त्यामध्ये शिकण्याचा भाग एक असा होता की, प्रत्येक शहर म्हटले की तेथे केरकचरा हा आहेच काल एक गणित पण निघाले काल आम्ही व्हेईकलने फिरत असतांना तो जो प्रोजेक्ट आहे त्यापासून प्रत्यक्ष शहरी वस्ती जी सुरु होते ती चार किलोमीटर एवढे मोटारीचे किलोमीटरचे मीटर दाखवत होते आणि आम्ही त्या प्रोजेक्टवरुन आम्ही ज्या गाडीत बसलो तिकडून माझे त्या किलोमीटरवर लक्ष होते ते बरोबर ॲक्झेट चार किलोमीटर एवढे झाले ही पहिली बाब दुसरी बाब की त्या प्रोजेक्टमध्ये जो लिचेड येतो म्हणजे त्या संपूर्ण डोंगराच्या म्हणजे जे घाणीचे डोंगर आहेत म्हणजे कचरा निघतो संपूर्ण त्याच्या खाली एक काळया कलरचा असा स्त्राव निघतो त्यास लिचेड असे म्हणतात आणि मिथाईल यांचा इतर बाहेर कुठेही उपद्रव झालेला मला दिसला नाही म्हणजे समजा यदाकदाचित त्या प्लॉटच्या बाहेर मिलन म्हात्रेचा प्लॉट आहे किंवा कोणाचा एक्सवायझेड कुणाचा प्लॉट आहे त्याची घाण त्या शेतीत किंवा त्या प्लॉटमध्ये गेलेली काल बघितली नाही कारण की मी काल जवळजवळ दोन तास फिरतच होतो. मा.महापौर मॅडम जरा रस्ता चुकले आणि पुढे गेले परंतु मी पायी संपूर्ण परिसर फिरलो आणि त्याच प्रोजेक्टमध्ये अगदी डेकोरेटीव चांगल्या त-हेचे वृक्षारोपण त्यांनी केलेले आहे ते त्याच खतापासून बनविलेले आहे हे मी तिकडच्या कर्मचा-यांना विचारले ते खत टाकून त्यांनी ते फार सुंदर असा बगीचा बनविलेला आहे आणि बायोमेडिकल वेस्ट प्लॉन्ट सुध्दा आम्ही बघितला या प्लान्टमध्ये सुध्दा एचआयव्ही हेपेटाईटस बी असे अनेक संसर्गजन्य रोग आहेत हया मानवाला शरीराला लागणारे जे मेडिकलचे जे पार्टस आहेत त्यात रक्ताचा संपर्क येतो डायरेक्ट. अशा पार्टस चे संपूर्णपणे विल्हेवाट लावण्याचा जो प्रोजेक्ट आहे तो सुध्दा आम्ही बघितला तिथे सुध्दा एक मी बघितले की त्या प्रोजेक्टच्या बाहेर फक्त जो धूर जातो त्याच्या १०० फुटाच्या वरती नळकांडे आहे, चिमणी आहे आणि त्याचा सुध्दा बाहेरच्या कुठल्या लोकांना त्रास नाही. म्हणजेच आऊटसाईट त्या प्रोजेक्टच्या बाहेर कोणाला काही निराळा कचरा पडला आहे किंवा ती घाण पडली आहे किंवा त्याचा कोणाला त्रास होतो आहे किंवा कुठेतरी लिचेड प्रॉपर्टीमध्ये पडून त्रास होतो आहे असे मी कुठेही बघितले नाही. तिसरी गोष्ट अशी आहे की आम्ही काल गेल्यानंतर थोडा वास येत होता ही सत्य परिस्थिती सर्वानी घेतली थोडा परंतु आपले जे ॲग्झेस्टिंग डंपींग ग्राऊंड जे आहेत तिकडे जेवढी घाण असते तेवढी घाण तिकडे जरुरत नव्हती. अगदी हमखास सांगतो की, तेवढी घाण नव्हती. माझ्या वॉर्डमध्ये गेल्या दोन वर्षापासून ॲग्झेस्टिंग डंपिंग ग्राऊंड आहेत तिकडच्या लोकांना काय त्रास असेल अळया येतात बाहेर अशा शेपटीवाल्या अळया चालत येतात ते आम्ही बघितले आहेत अनुभवले आहे. तो प्रकार त्या कालच्या प्रोजेक्टमध्ये कुठही बघितला नाही. अळी हा सुध्दा

प्रकार नव्हता. गिधाडे येतात, कावळे येतात आणि बगळे येतात हे सुध्दा मी त्या प्रोजेक्टमध्ये घिरटया घालताना बधितले नाही. आणि माशा निरनिराळया त-हेच्या माशा आहेत नुसती काळी माशी नाही. घाण म्हटली कि तिथे निरनिराळया माशा आहेत जे आता आम्हाला मागच्या मिटींगला स्थायी समितीमध्ये आम्हाला ब्रॉऊचर्स दिलीत त्याच्यामध्ये त्या माश्यांचे प्रकार आहेत. त्या प्रकारच्या माशा मला तिथे कुठेही दिलेल्या नाहीत आम्ही फिरत असताना तशा प्रकारच्या माशा आमच्या अंगावर बसल्या नाहीत किंवा कुठच्या अशा विशिष्ठ पदार्थावर बसलेल्या आम्हाला दिसून आल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे काल आम्हाला हा अभ्यास गट ज्या नाशिक महनगरपालिकेचे मा.महापौर दशरथ पाटील हयानी सुध्दा चांगले मार्गदर्शन दिले बरेच काही शिकायला मिळाले. मी तर म्हणतो अन्य कुठल्या जर आमचे सन्मा सदस्य जे कोणी त्या दिवशी आले नाहीत ज्याची इच्छा आहे. छोटेसे व्हेईकल त्यांना परत एकदा दयावे. आणि त्यांना सुध्दा परत एकदा पाठवावे म्हणजे सभागृहामधली जी काही चलबिचल आणि वैचारिक थोडे मतभेद आहेत ते जरा दूर होतील या संपूर्ण प्रोजेक्टला आपण कुठेही बनवा पण लवकरात लवकर बनवा कायद्याच्या चौकटीत बनवा आमचे सर्वांचे समर्थन आहे असे बोलतो मी माझी सूचना मांडतो.

रतन पाटील :-

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, आमचे मित्र मिलनजी म्हात्रे यांनी जे उत्कृष्ट कालच्या अभ्यास गटविषयी मार्गदर्शन केले त्याबाबत दोन तीन थोडयाशा सूचना आणि भूमिका मांडतोय. महापालिकेच्या अभ्यागटाच्या संदर्भात आम्ही नाशिक येथे गेल्यानंतर जो प्रकल्प आम्ही पाहिला तो इतका उत्कृष्ठ होता की आजूबाजूला जात असताना घाणीचा वास सुध्दा येत नव्हता. त्याच्यामधून येणारा जो द्रव एका विहिरीमध्ये साठवून त्याचे परत सुंग केले जाते परत त्या कच-यावर मारला जातो आणि ते कुजविले जाते आणि त्या पध्दतीने त्याच्यावर एक केमिकल मारुन खताची प्रक्रिया त्याच्यावर केली जाते.असा जो प्रकल्प हया आपल्या मिरा भाईंदर मध्ये राबवत आहोत आणि त्याच्यासाठी मी प्रशासनाला एक विनंती करेन आपण तो प्रकल्प लवकरात लवकर राबवून हया मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनातील संदर्भातील निर्माण झालेली जी समस्या आहे ती सोडविण्याचा आपण प्रयत्न करा त्याची जागा कुठे काय हे आपण प्रशासन व तेथील जागेच्या संदर्भात आपण विचार करावा आमची पूर्ण या प्रकल्पाला संमती आहे अशी मी आपणास संमती देतो.

जोजफ गोन्सालविस :-

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, सगळयांनी त्या नाशिक प्रकल्पाची स्तूती पोट भरुन केलेली आहे बर वाटले. आमचाही त्याला विरोध नाही पण जे आजूबाजूला वस्ती आहे. तिथे तुम्ही आर झोन टाकला आहे जो तुम्ही प्रकल्प करणार संपूर्ण भाईंदरची घाण ज्या रस्त्याने येणार ती संपूर्ण पब्लिक मधून जाणार माझे मित्र श्री.लिओ कोलासो यांनी जी जमिन सुचविलेली आहे ती अगदी लोकवस्तीपासून लांब आहे आणि हया प्रकल्पाला अगदी साजेशी आहे आणि हया प्रकल्पासाठी फक्त १७ एकर जमीन केलेली आहे आणि येथे ३१ हेक्टर जमिनीची काय आवश्यकता आहे. हा प्रकल्प जर उत्तनला झाला तर माझे मित्र श्री.जेम्स कोलासो यांनी सांगितले की, मच्छिमाराची मासळी सुकविण्याची पारंपारिक पिढयांपिढया जी जमिन आहे या जमिनीला आम्ही मुकणार आणि मच्छीमारांना मासळी सुकविण्याचा धंदा बंद करावा लागेल तरी सभागृहानी आमच्यावर मेहरबानी करावी आणि आमचे मच्छिमारी लोकवस्ती वाचवावी अशी मी हया सभागृहाला विनंती करतो आणि तिथे जे झोपडपट्टीत रहाणारे लोक आहेत काहीतरी २०० ते २५० झोपडया आहेत त्यांनाही पुर्नवसन किंवा रहायला तिथे जागा द्यावी. या प्रकल्पाला आमचा विरोध नाही. परंतु शक्यतो वस्तीच्या लांब असावा आणि श्री.लिओ कोलासो यांनी सुचविलेली आणि जी सूचना केलेली आहे. आता घाई नका करु पुढच्या मिटींगला आणा त्याच्याशी मी सहमत आहे.

प्रफुल्ल पाटील :-

याठिकाणी दोन जागाच्या बाबत चर्चा झालेली आहे ब-याच वेळा काय होते आम्हाला वाटते की, ही जागा स्वर्गासारखी आहे परंतु हे सगळे आमच्या हातात नाही. एखादी जागा आम्ही सुचविली तर ती १०० टक्के घनकचरा व्यवस्थापनासाठीच आपल्याला सरकार नेमून देईल अशातला भाग नाही. यांच्यामध्ये एक मोठी ॲथॉरिटी काम करते. ती सेंट्रल पोल्युशन बोर्ड सन्मा. सदस्य श्री.लिओ कोलासो यांनी सांगितले की, मला काही घाबरायची गरज नाही ते जर माझ्या पाठीशी असतील तर मलाही कुठे उडी मारायला हरकत नाही आणि म्हणूनच आम्ही जंगलखात्याशी लढलो. पण हया ठिकाणी सेंट्रल पोल्युशन बोर्डाशी लढण्याची हिंमत आम्हांला ठेवली पाहिजे ज्या ठिकाणी सन्मा. सदस्य श्री.लिओ कोलासो हयांनी जागा सुचविलेली आहे त्या

ठिकाणी आपण सेंट्रल पोल्युशन बोर्डाकडून माहिती मागवावी. जी साईड आपल्याला सेंट्रल पोल्युशन बोर्ड फायनल करेल त्या साईडवरती अशाप्रकारचा आरक्षण करुन आपण हा प्रकल्प उभारावा अशी मी सूचना करतो.

मोहन पाटील :-

सन्मा.महापौर यांच्या संमतीने बोलू इच्छितो आज आपल्या शहरामध्ये घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प,खत प्रकल्प राबवण्याचा जो विषय आणलेला आहे आणि शहराचे आरोग्य व्यवस्थित राहावे व कच-याची विल्हेवाट व्यवस्थित लागली पाहिजे. अशा पद्धतीची भूमिका सुप्रीम कोर्टाच्या निर्देशाने आपण घेतलेली आहे. आयुक्त साहेब आपण आल्यानंतर प्रथम काम केले कि या शहराला ४८ कोटीची जागा आपण देऊ केली आणि त्यासाठी आपण अहोरात्र प्रयत्न केले. आपल्या हया भूमिकेचे मी या ठिकाणी स्वागत करीत आहे. सभागृहामध्ये हा प्रकल्प होऊ नये अश्या पध्दतीची भूमिका कोणीही मांडलेली नाही आहे. हा प्रकल्प झाला पाहिजे तो करण्यासाठी आम्ही प्रशासनाच्या बरोबर आहोत आणि जी जी मदत लागेल प्रशासनाला ती ती मदत आजपर्यत या सन्मा.सदस्याचे आग्रही मत आहे आणि त्याहून आग्रही मत आहे कि असा प्रकल्प उत्तनमध्ये व्हावा असे त्यांचे मत आहे कारण स्थायी समितीपुढे ठरल्यानंतर १६ सदस्य आणि तेथील ९ सभासद उत्तन येथील आणि त्यांची काही मंडळे आहेत त्यांच्या मंडळांच्या प्रमुखांना घेऊन हा प्रकल्प बघायला घेऊन जायचे होते परंतु मी आपल्याकडें आग्रही भूमिका अशी घेतली कि आपण सर्व सन्मा.सदस्यांना त्याठिकाणी घेऊन जावे आणि तो प्रकल्प काय आहे त्या प्रकल्पाची माहिती काय आहे. त्या प्रकल्पापासून काय नुकसान आहे किती घाण येते किती त्रास होऊ शकेल व किती त्रास होणार होणार नाही अशा पद्धतीचा अभ्यास गट त्या ठिकाणी गेला होता. तेथील सन्मा. महापौर यांनी आम्हाला चांगले मार्गदर्शन केले. तेथील आरोग्य अधिकाऱ्यांनी चांगले मार्गदर्शनकेले. आमच्या समवेत सन्मा. महापौरही होत्या. त्यांनीही आम्हाला चांगला वेळ दिला आणि तो प्रकल्प आम्ही पाहू शकलो. प्रकल्पांची स्तुती करणे या ठिकाणी योग्य आहे, अयोग्य ठरणार नाही. कारण शेवटी प्रकल्प हा कचऱ्याचा आहे. कचरा आल्यानंतर त्याचा घाण वास येणे स्वाभाविकच आहे. तो विशेष असा भाग नाही की, कचरा आहे त्याची घाण येणार नाही. परंतु आपण आल्यानंतर या शहरामध्ये अनेक जागा बघितल्या, चौपाटीची सुद्धा जागा आपण बघितली, त्याच्या पुढे २०९ ची जागा बघितली. आपण डंम्पींग ग्राऊंडसाठी जागा ठेवली होती मुर्धा येथे त्याही जागेची आपण पाहणी केली. आपल्यासोबत आम्हीही होतो. सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी आपल्या समवेत होते आणि प्रशासकिय अधिकारी आपल्या सोबत होते. आपण ह्या संपूर्ण प्रकल्पासाठी चांगली मेहनत घेतलीत आणि या शहरामध्ये हा प्रकल्प उभारण्याची मुहूर्तमेढ आपण ती जागा मिळवून केलेली आहे. या ठिकाणी दोन प्रस्ताव आपल्याकडे असे आलेले आहेत. सन्मा. सदस्यांच्या वक्तव्यातुन सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलजी, म्हात्रेजी, सन्मा सदस्य रोहिदास पाटीलजी, रोहित सुवर्णाजी आणि लिओ कोलासोजी, जेम्स कोलासोजी यांनी चांगल्या भुमिका, चांगली मते या ठिकाणी मांडलेली आहेत. आमचेही मत या ठिकाणी असे आहे की, या प्रकल्पासाठी एकूण जागा किती असायला पाहिजे आणि ती जागा असताना ती जागा ज्या ठिकाणी दुसऱ्या जागा आपल्याकडे आहेत अशी जागा मिळवायला किती वेळ लागू शकेल. आपण ही जागा मिळवलेली आहे. आपण आमच्याशी असे हितगुज केलेले आहे. आपण असे मार्गदर्शनही केलेले आहे. आपण या विषयी आम्हाला माहितीही दिलेली आहे की, आम्ही हा प्रकल्प राबवणार आहोत. हा सुप्रिम कोर्टाच्या निर्देशाने राबवणार आहोत. तुमचे मत काय आहे हे ग्राह्य धरण्यापेक्षा आम्हाला हा प्रकल्प महत्वाचाआहे. सुप्रिम कोर्टाचे आपल्याला निर्देश आहेत हेही मत आम्ही मान्य करायला तयार आहोत. परंतु त्या ठिकाणी असलेले भूमिपूत्र कोळी बांधव आपले आहेत आणि त्या ठिकाणी त्यांचा व्यवसाय चालतोय. व्यवसाय करतात त्या ठिकाणी तर तशी त्या संदर्भामध्ये अशी जागा बदल जर होऊ शकत असेल. जागा बदली व्हावी असे आमचे मत नाही आहे. त्या प्रकल्पाला ज्यांनी आपल्या हरकती दिलेल्या आहेत, सुचना मांडलेल्या आहेत त्यांचेही मत असे आहे की, तो प्रकल्प त्या ठिकाणी झाला पाहिजे. आमचे ही संपूर्ण सभागृहाचे मत त्या ठिकाणी प्रकल्प झाला पाहिजे असे मत आहे, कारण शेवटी कचऱ्याची विल्हेवाट लावल्यानंतर या शहरामध्ये साफसफाई होणार आहे. शहर सुंदर होणार आहे. त्या माध्यातून सवोच्च न्यायालयाचे निर्देशन असेल तर त्याच्या अनुषंगाने आमचे शहर साफ होणार आहे, स्वच्छ होणार आहे, सुंदर होणार आहे. त्या कचऱ्याची विल्हेवाट लागणार आहे. त्या कचऱ्यापासून चांगले खत निर्माण होणार आहे. विज निर्माण होऊ शकेल अशा पद्धतीची धारणा आपल्या समवेत आमची सुद्धा आहे. परंतु जर जो प्रकल्प आपल्याकडे एम.टी.डी.सी.चा आहे त्याच्यामध्ये लागणारा वेळ याची तफावत काय असेल? किती त्याला जागा लागू शकेल? अशा प्रकारचे मार्गदर्शन, अशा

प्रकारची माहिती आम्हाला द्यावी आणि त्या माहितीनुसार आपण सभागृहाला सांगावे कि, कोणत्या पद्धतीने हा प्रकल्प झाला पाहिजे, होऊ शकेल, नागरीकांना त्रास होणार नाही, प्रशासनाला त्रास होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाचे मत आहे तेही बाधीत होणार नाही. अशा पद्धतीचे मार्गदर्शन आपण जर या ठिकाणी केले तर सर्व सन्मा. सदस्य त्या मताचा विचारही करु शकतील. मी एवढेच या ठिकाणी सांगू इच्छितो की, प्रकल्प झाला पाहिजे कोणत्याही सदस्यांचा ज्यांनी आपली मते मांडली आहेत त्यांचाही या ठिकाणी विरोध नाही आहे. एवढे बोलून मी दोन शब्द संपवतो आणि यासाठी आपले मार्गदर्शन आवश्यक आहे असे मी या ठिकाणी आपल्याला सुचवितो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, थोडेसे माझे सांगायचे राहिजे. मागे नाशिक शहराची लोकसंख्या ही सुमारे १२ लाख एवढी होती. काल आमच्या त्या नाशिकच्या मा. महापौरांनी सांगितले आणि त्यांचा दररोजचा कचरा टनावर जवळ जवळ २०० टनापर्यंत एवढे झाले आहे असे त्यांनी काल आम्हाला हिशोब दिलेला आहे आणि उचलणे, आणणे वगैरे एवढे सर्व व्यवस्थापन आहे. त्याच्यात दिवसाला आपल्या इकडे हेच गणित. साडेपाच लाख लोकसंख्येला २०० टन एवढे दिले गेले आहे आणि ॲक्चुअल आम्ही हिशोब काढला दरडोई प्रत्येक माणसाच्या पाठीमागे दर दिवशी १० ग्रॅम एवढा जर कचरा पकडला तर आपली जी लोकसंख्या आहे ती साडेपाच लाख एवढी लोकसंख्या आपण म्हणतो, प्लस फ्रुटी तसेच कारखाने असतात ते निराळे याचा सगळा विचार जरी केला तरी हे जे आपल्या महानगरपालिकेचा जो आकडा आलेला आहे हा मला चुकीचा वाटतो आहे. मा. आयुक्त साहेब हा प्रोजेक्ट चालू करण्याच्या अगोदर आपले डंपर आणि जे ट्रॅक्टर, ट्रॉली वगैरे आहेत ज्या त्या ठिकाणी काल वजन करत होते, आणल्यानंतर काट्यावर चढवून ते वजन करत होते. कचऱ्याचे वजन निराळे काढले जाते आणि व्हेईकलचे निराळे वजन काढले जाते. हा जरा आपण हिशोब काढावा कारण यापूर्वी काही ट्रॅक दिले जात होते आणि ट्रकच्या फेऱ्यावरती कचऱ्याची क्षमता म्हणजे किती कचरा आहे हे आपले लमसम काढले जायचे. ते गणित फार चुकते आहे म्हणजेच जवळ जवळ १३० चा फरक पडतो आहे हे मुद्दामहून मी सभागृहापुढे आणतो आहे. नव्याने जरा त्या गाड्यांचे वजन करुन एक्झेट आपल्याला दिवसातून किती कचरा आपल्या शहरात तयार होतो आहे हे जरा महत्वाचे आहे. याच्यात जरा साहेब आपण स्वत: जातीने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

**रोहित सुवर्णा :-**

आदरणीय महापौर मॅडम, आपण सर्वानी सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट बद्दल खुप काही चर्चा झालेली आहे या सभागृहामध्ये. मॅनेजमेंट हँन्डलींग ॲक्ट २००० बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट देखील अतिशय महत्वाचा विषय जरी असला तरी गंभीर बाब आहे. नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये सुमारे ६०० हॉस्पीटल आणि ६००० बेड व १५,००० प्रायव्हेट डॉक्टर आहेत. असे डॉक्टर आपल्याकडे देखील आहेत. आपल्याकडे नर्सिंग होम आहेत, हॉस्पीटल आहेत, प्रायव्हेट डॉक्टरांचे डिस्पेंन्सरी व क्लिनीक आहेत. नाशिकला काल मी लिओ साहेबांना देखील बोललो की, बायोमेडीकल हा जो प्लॉन्ट आहे, बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट वॉटर गॅस प्रॉडक्ट हा अगदी नदीच्या किनाऱ्यावर आहे. हा बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट जो आहे नाही मी चुकलो की नाही मला माहित नाही.

**मा. आयुक्त :-**

मॅडम तुम्ही दिलेले पत्र वाचत आहेत. तुम्हाला घशाचा त्रास असल्यामुळे तुम्ही बोलू शकत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

अगदी बरोबर आहे. आताही मला त्रास होतो आहे. गेल्या तीन दिवसापासून खूप त्रास आहे. पण मला आता असे वाटते की विषय हा गंभीर आहे त्याच्यामुळे बोलावेसे वाटत आहे. विषय गंभीर असल्यामुळे मी सतत औषध घेत आहे आणि बोलतो आहे. अजून औषध चालूच आहे आणि हा जो नाशिकचा प्रोजेक्ट तो टोटली प्रायव्हेट प्रोजेक्ट आहे.

**लिओ कोलासो :-**

ही दुटप्पी भूमिका आहे. दुटप्पी म्हणजे पत्र देता की, मला बोलता येत नाही आणि परत बोलतात, ही दुटप्पी भूमिका आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मी पत्र सभागृहापुढे का दिले हे तुम्ही माझ्या आवाजावरुन ओळखू शकता. खोटं बोलत नाही मी. त्या जोडीला मी मेडीकल सर्टिफिकेट सुद्धा दिलेले आहे. तर या ठिकाणी नाशिकचे काही नागरीक मुंबई

हायकोर्टामध्ये गेले होते. नाशिकचे काही नागरीक बायोमेडिकल ह्या प्रोजेक्ट विषयी हायकोर्टात गेले होते पण हायकोर्टात ती केस काही टिकली नाही. शेवटी नाशिक महानगरपालिकेने तो प्रोजेक्ट तिथेच केलेला आहे. त्यापासून कुठल्याही प्रकारच्या मिथीन किंवा ब्ल्यु गॅस होऊन ग़्क्त$_{०३}$, अमोनिया वगैरे होऊन डिस्चार्ज होत नाही हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया, मी या सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. आपण अगोदरच खुप कंटाळलेले आहात. हा विषय किती गंभीर आहे कायद्याच्या दृष्टीने किती आवश्यक आहे या संदर्भामध्ये अतिशय अभ्यासपूर्वक मते सर्व सन्मा. सदस्यांनी मांडलेली आहेत. त्यामुळे पुन्हा त्या घनकचरा हाताळणी अधिनियमाचा आणि या गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी करुन वेळेचा अपव्यय मी करु इच्छित नाही. एकच फक्त या संदर्भात आपल्याला सांगायचे होते की, हा जो विषय आपल्यापुढे ठेवलेला आहे हा नक्की विषय काय आहे? हा पुन्हा एकदा मी सांगू इच्छितो की, जिल्हाधिकारी यांनी जे ४८ कोटी रुपयांचे मुल्यांकन प्राथमिक मुल्यांकन आहे अर्थात आणि त्यानुसार रक्कम आमच्याकडे पैसे भरा आणि नंतर ही जमीन तुमच्या ताब्यात देतो अशा प्रकारची भूमिका घेतलेली होती. त्या भूमिकेला आम्ही विरोध केला आणि मा. जिल्हाधिकारी महोदयांना पटवून दिले की, आपण ॲडव्हान्स पझेशन आम्हाला द्या. मुल्यांकनाची प्रक्रिया ही यथावकाश पूर्ण होईल. पैसे कसे द्यायचे ते आमच्या आर्थिक स्थितीनुसार कधी द्यायचे हा प्रश्न शासन आणि आमच्यामध्ये हा नंतरच्या कालवधीमध्ये आपल्याला पूर्ण करता येईल. ४८ कोटी रुपये जर ह्या कार्पोरेशनने द्यायचे म्हटले तर आपल बजेटच्या जवळ जवळ ६०७ पेक्षा ही जास्त रक्कम एक वर्षाच्या ही निव्वळ ह्या जमिनीच्या किंमती पोटी आपल्याला द्यावी लागणार आहे आणि त्यामुळे एक तांत्रिक बाब अशी होती की, आरक्षणात जर ती जागा असेल तर त्या जागा आपल्याला फ्रि ऑफ कॉस्ट मा. जिल्हाधिकाऱ्यांना हस्तांतरीत करायची आहे. मोफत द्यायची आहे. या तरतुदीचा फायदा घ्यायचा ह्या दृष्टीने आपण प्रफुल्ल पाटील म्हणाले ते बरोबर आहे. कुठल्याही प्रकारच्या त्यांच्या परपजमध्ये बदल होत नाही. दिलेली जागा ही सुध्दा त्याच प्रकल्पासाठी दिलेली आहे. मग असे असतांना हा मुद्दा कशासाठी आणला किंवा त्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचा एक्स आरक्षण आहे आणि त्याचे वाय आरक्षण करायचे असेल तर तसेही काही नाही आहे. मुळामध्येच त्या ठिकाणी ते आरक्षण नाही आहे. ते आरक्षण आपल्या या संमतीमुळे ठेवले जाणार आहे एवढाच त्याचा अर्थ आहे. कुठल्याही प्रकारचे आरक्षण आपण बदलणार नाही त्यामुळे, आणि परपज फक्त एकच आहे की, ४८ कोटी रुपये जे आपल्याला शासनाला द्यायचे आहेत ते पैसे आपले या आरक्षणाच्या प्रक्रियेमुळे वाचणार आहेत. याच्यामध्ये कायदेशीर पुढची जी बाब आहे हरकती मागविणे, गॅझेट करणे, पेपरला देणे, लोकांच्या हरकती मागविणे, त्यांच्यावरती सुनावणी घेणे, सुनावणीनंतर जो निर्णय होईल तो सभागृहापुढे ठेवणे आणि ह्या सभागृहाची पुन्हा अंतिम मंजूरी त्याला घेणे ही प्रक्रिया होणार आहे. त्यावेळेला खरं तर आणखी चर्चा आपल्याला या संदर्भामध्ये करता येईल. मी स्वतः दोन वेळा त्या जागेला भेट दिलेली आहे. आमचे उप आयुक्त श्री. नाईक साहेबांना देखील विनंती केली होती. तेही त्या जागेवर जाऊन आलेले आहेत. त्या ठिकाणी पायी चढणे मुश्किल होते. वाहन कुठलेही तेथे आज रोजी ठिकपणानं जाऊ शकत नाही आणि मला कुठलेही खोटे बोलण्याचे कारण नाही आहे. सभागृहाची दिशाभूल करण्याचे सुध्दा कारण नाही आहे. कुठलाही अशा प्रकारचा व्यवसाय आज त्या ठिकाणी केला जात नाही. आज रोजी वस्तूस्थिती मी सांगतो. आजची वस्तूस्थिती सांगतो मी, श्री. कोलासो साहेब आपण डिफर व्हाल परंतू ज्या फॅक्ट आहेत त्या ह्या सभागृहापुढे मला ठेवल्या पाहिजेत की, मी स्वतःचा मोठ्या मुश्किलीने ज्या वेळेला तेथेपर्यंत पोहचलो त्यावेळी तो संपूर्ण परिसर मी पायी फिरलो आणि माझ्या लक्षात आहे की, ही जागा खडकाळ आहे, डोंगराळ आहे आणि मच्छिमारांचे जे व्यवसाय आहेत ते मच्छिमारांचे व्यवसाय तेथून इतके दूर अंतरावरती आहेत आणि ही जागा खूप उंचावरती आहे. त्यामुळे कोणी मनुष्य तेथून मासे आणून इतक्या दूरवरती वाळवेल, ट्रान्सपोर्ट करुन त्याचा, तो निश्चितपणे त्या माणासाला वेडच लागले पाहीजे. कारण तेवढी कॉस्ट त्याची वाढणार आहे. एकतर अशा प्रकारे एवढे ओझे घेऊन त्या एवढ्या मोठ्या टेकडीवरती चढणे आणि तेथे मासे वाळत घालणे आणि वाळलेले मासे परत खाली आणणे हे त्याला आर्थिक दृष्ट्या शक्य होईल असे मला वाटत नाही. ही भौगोलिक तेथील परिस्थिती आहे. त्यानुसार मी आपणांला सांगतो जर असे काही होत असेल असे गृहीत धरले तर त्या लोकवस्तीच्या आजूबाजूला कदाचित काही एक्टीव्हीटीज होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु हे मी आपणांला सांगू इच्छितो की, जवळ जवळ चारशे मीटर जागा म्हणजेच जवळपास एक एकराच्या जवळपास जागा ही आम्ही त्याच्यासाठी सोडलेली आहे. मा. जिल्हाधिकाऱ्यांना आम्ही खास विनंती केली की,

ह्या ठिकाणी ही लोक रहात आहेत. आम्हाला त्यांना डिस्टब करण्याची इच्छा नाही. कदाचित ती जागा आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली असती तर त्या सुद्धा आम्हाला ताब्यात दिल्या असत्या आणि आम्हाला त्या लोकांना डिस्टब करावे लागले असते. आम्ही त्यांना अगोदरच सांगितले की, तिथे काही लोक रहात आहेत. सद्य परिस्थितीमध्ये कदाचित ९५ पूर्वीचे लोक रहात असण्याची शक्यता आहे तरी आम्हाला त्यांना डिस्टब करायचे नाही आहे. ती जागा वगळून आम्हाला जागा ताब्यात द्या. तर अशी ऑर्डर जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली आहे आणि नाशिकचा प्रकल्प आपल्याला दाखविण्याचा उद्देश हाच होता की, कदाचित माझी अशी अपेक्षा होती की, नाशिकचा प्रकल्प पाहिल्यानंतर सभागृहात चर्चा न करता हा विषय संमत होईल. परंतु जी चर्चा व्हायची आहे ती चर्चा झालेली आहे. एक अत्यंत आदर्श अशा प्रकल्प देशामध्ये आणि राज्यामध्ये आज ज्यांचे नांव घेतले जाते तो नाशिकचा प्रकल्प आहे. प्रत्येक गोष्टीची अतिशय बारकाईने त्या ठिकाणी सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार ज्या प्रिकॉशन घ्यायला पाहिजेत त्या त्यांनी घेतलेल्या आहेत आणि आपल्याकडे देखील कदाचित हा प्रकल्प होईल किंवा आणखी वेगळा प्रकारचा प्रकल्प होईल, हे मला आज सांगता येणार नाही. आपण ज्यावेळी त्याची जाहिरात देवू कारण आता आपले सातबाऱ्यावरती नांव आलेले आहे आणि यानंतर आपण ज्या वेळेला ऑफर्स मागवू तेव्हा कदाचित पॉवर प्रोजेक्ट येऊ शकतो, व्हर्निकल्चर येऊ शकतो किंवा कंम्पोस्टींग सुद्धा येवु शकतो. परंतु आज देशामध्ये सर्वात रिलायबल अशा प्रकारची जी पद्धत आहे ती कंपोस्टींगची आहे आणि नाशिकने हे सिद्ध केलेले आहे. भिवंडीला देखील अशा प्रकारचा प्रकल्प उभा करण्याचा प्लॅन आहे. ठाण्याला देखील हा प्रकल्प तांत्रिक दृष्ट्या अतिशय व्यवस्थित चाललेला होता. परंतु त्या ठिकाणी सुद्धा अशा प्रकारचे प्रॉब्लेम्स आलेत. ते सामाजिक प्रश्न होते, तांत्रिक प्रश्न नव्हते. त्याही ठिकाणी अतिशय चांगल्या प्रतीचे खत तयार होत होते आणि जर तो प्रकल्प चालला असतात तर ठाणे महापालिकेत देखील हा घन कचऱ्याचा जो प्रकल्प आहे ह्या अळ्यांचा प्रश्न मिटला असता तो भाग आणखी वेगळा आहे. माझी आपल्या सर्वांना विनंती एकच आहे की, ह्या प्रकल्पामुळे कुठल्याही प्रकारचा त्रास नागरीकांना होतो हे खरोखरच सिद्ध करणे कठीण आहे. जेवढ्या काळज्या घ्यायला पाहिजेत तेवढ्या जास्तीत जास्त ह्या प्रकल्पामध्ये घेतल्या गेलेल्या आहेत आणि तशा प्रकारच्या त्या घ्याव्यात यासाठी पोल्युशन कंट्रोल बोर्ड स्थापन झालेले आहे. सेंट्रल पोल्युशन कंट्रोल बोर्ड, स्टेट पोल्युशन कंट्रोल बोर्ड, राज्य पातळीवरील नगर विकास खाते, जिल्हा पातळीवरती स्वत: जिल्हाधिकारी आणि स्थानिक पातळीवरती आपण सर्वजण या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहोत आणि आपल्याला हा प्रकल्प नियोजित वेळेमध्ये म्हणजे २००३ पर्यंत प्रकल्पाच्या बांधणीसह त्याच्यातील उत्पादनासह हा पूर्ण करायचा आहे. आपण जे प्रश्न विचारले की, इतक्या जागेची आवश्यकता आहे का? हा प्रकल्प हा दहा वीस वर्षासाठी नाही आहे. येणाऱ्या पन्नास साठ शंभर वर्षासाठी हा प्रकल्प असणार आहे आणि लॅन्ड फिल्ड साईड हा जो त्याच्यातला कंन्सेप्ट आहे हा असा आहे की, कचऱ्यामधून जे रिसायक्लेबल जे मटेरियल निघते आणि त्याच्या व्यतिरिक्त एक माती, गिट्टी अशा प्रकारचे अनुउत्पादक आणि त्याचा काहीच उपयोग होत नाही असा जो भाग आहे हा भाग त्यांचे कुठेतरी साठवण करायला पाहिजे. त्याच्यासाठी इतक्या मोठ्या जमिनीची आपल्याला आवश्यकता आहे. ही साठवण केल्यानंतर त्या ठिकाणी झाडे लावणे ईकॉलॉजी जो या ठिकाणी विषय चर्चेला आला पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने जे प्रकल्प हाती घ्यायचे आहेत ते प्रकल्प हाती घेणे मला वाटते हा प्रकल्प जर आपण यशस्वी रितीने राबविला तर मला वाटते कोलासो साहेब स्वत:च म्हणतील की हा प्रकल्प आमच्याकडे घेतले त्याबद्दल मी आपला आभार मानतो आणि तेथील नागरीक देखील आपल्याला धन्यवाद देतील. आज ती उघडी बोडकी टेकडी आहे. परंतु ते कदाचित वनराईने नटलेली, झाडाझुडपांनी नटलेली अशा प्रकारची चांगली आणि एक आदर्श अशी एक प्रकल्पाची जागा असू शकेल. माझी आपल्या सर्वांना विनंती आहे की माझा हा जो प्रस्ताव हा मर्यादित हेतूसाठी आपल्यामोर ठेवलेला आहे. आपल्याला ह्याला मंजूरी द्यावी लागेल. कारण तसे जर आपण मंजूरी नाही दिली तर मा. जिल्हाधिकाऱ्यांना ४८ कोटी रुपये आपल्याला भरणा करावा लागणार आहे. पर्यायी जागेच्या बाबतीत तपास करण्याचा आपण जो या ठिकाणी मुद्दा मांडला हा तपास आपण जरुर घेऊ परंतु बर्ड इन द हॅण्ड इज वर्क टू इन द बुश आपल्या हातामध्ये जे आहे आणि जे एक वर्षाच्या धडपडीनंतर आपण मिळविलेले आहे पण मा. नाईक साहेबांनी त्यासाठी जे प्रयत्न केलेले आहेत ते आपल्या सर्वांच्या समोर आहेत. एक वर्ष त्यांनी ही जागा मिळविण्यासाठी हे झगडलेले आहेत. नाईक साहेब तरीदेखील ही जागा मिळालेली नव्हती. जागा प्राप्त करुन घेण्याच्या स्टेजला मी त्या सर्व जागा आजुबाजूच्या पोल्युशन कंट्रोल बोर्डला दाखवल्या. सी.आर.झेड.च्या प्रतिनिधींना दाखविल्या या शहरातील कुठलीही जवळपासची जागा या प्रकल्पासाठी योग्य नाही अशा प्रकारचे मत या बॉडीने सेंट्रल पोल्युशन बोर्ड आणि स्टेट

पोल्युशन बोर्ड यांनी आणि सी.आर.झेडच्या प्रतिनिधी यांनी व्यक्त केलेले आहे. त्यामुळे इतर कुठलीही जागा शोधणे आणि त्याला मान्यता मिळविणे हा थोडासा अवघड भाग होणार आहे.

आणि हे शेडयुल जवळ आलेले आहे. आपल्याला पूर्ण प्रकल्प यासाठी उभा करायचा आहे तरी या सर्व गोष्टीचा गंभीरपणाने विचार करुन माझी आपल्याला विनंती आहे की, आजचा हा जो मायनर मोडिफिकेशनचा प्रस्ताव आहे हा आपण एकमताने मंजूर करावा. धन्यवाद.

जोजफ गोन्सालविस :-

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे, की आता मा.आयुक्त साहेब बोलले की, मासळी तिथे आम्हाला कुठे दिसलीच नाही. मासळी दररोज येते अशातला भाग नाही त्याला भांग असते. उधाण असते, सिजननुसारच येते तुम्ही ज्यावेळेला गेला असाल त्यावेळी तो मासळीचा सिझन नसेल पण तिथे मासळी सुकवितात. सभागृहाला माहिती असावी म्हणून मी बोलतोय तिथे मासळी सुकवितात आणि जर ती आम्हाला मा.आयुक्त साहेब त्या मासळी सुकविण्यापासून वंचित केले तर भविष्यात आम्हाला सुक्या मासळीचा धंदा बंद करावा लागेल. कारण आजुबाजूच्या जेवढया जमिनी वगैरे आहेत त्या मोठमोठया बिल्डर लोकांनी घेतलेल्या आहेत. किनारपट्टीवर मासळी सुकवायला जागा नाही.

ध्रुवकिशोर पाटील :-

मा.महापौर मॅडम , कमिशनर साहेबांनी ज्या हिशोबाने आम्हा सर्व सदस्यांना मार्गदर्शन केले अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन त्यांनी घनकचरा व्यवस्थापनावरती केलेले आहे. त्याबद्दल त्यांना मी धन्यवाद देतो. तसेच त्यांनी ४८ कोटी रुपये नगरपालिकेचे वाचविले जी तांत्रिक बाब काढून. त्याचेही त्यांना धन्यवाद देतो. आणि तसेच ज्या जागेची मागणी केली होती ती जागा सी.आर.झेड नियमाने बाधीत होत असल्याने सदर दोन्ही ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणे शक्य नाही. म्हणून सदर जागेऐवजी पर्यायी जागेचा प्रस्ताव मौजे स. क्र.६५, क्षेत्र -१०.७२ हेक्टर ,मौजे -उत्तन ,स.क्र.२५ क्षेत्र -२०.७४ असे एकूण ३१.४६ हेक्टर शासकीय जागा मागण्याचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे केला होता आणि ते जिल्हाधिका-यांनी मान्य केलेले आहे. आणि त्यासाठी आपल्याला आरक्षणामध्ये फेरबदल करावे लागणार आहेत. असा प्रस्ताव महानगरपालिकेने दिलेला आहे. तो प्रस्ताव मी सर्व सदस्यांच्या सूचनेसह मंजूर करीत आहे असा सुचक मांडत आहे.

मिलन म्हात्रे :-

मा.आयुक्त महोदय आणि मा.महापौर मॅडम ही जी चर्चा बराच वेळ साधकबाधक झाली माझी अशी नम्र विंनती आहे की, ही चर्चा फार महत्वाची आहे. त्या करिता कृपया हया विषयावरची जी संपूर्ण चर्चा आहे तिचे इतिवृत्तांत काटेकोरपणे व्यवस्थित लिहून सदस्यांच्या भावना, मते, विरोध जे काही आहे ते सर्व व्यवस्थित आपल्या इतिवृत्तांत येईल अशी प्रशासनाने काळजी घ्यायची आहे. अशी सूचना दयावी.

हरेश गावंड :-

मा.महापौरांच्या अनुमतीने बोलतोय या ठरावास माझे अनुमोदन आहे.

लिओ कोलासो :-

मा.आयुक्त साहेब आपण आम्हाला संधी दिली नाशिक येथे जाण्याची त्यामध्ये आमच्या नोट्स आहेत आम्ही जेव्हा प्रवेश घेतला तेव्हा सर्वांनी तोंडावर रुमाल धरले धीस इज माय फस्ट सेंटेन्स तरी पण थोडयावेळात माईल्ड दुर्गंधी आली म्हणजे थोडेसे प्रमाण कमी झाले त्याच्यानंतर मॅडम सुध्दा आमच्या मताशी सहमत आहे. त्याच्यानंतर उत्तनचे लोक होते २०-२५ आपल्या सौजन्याने दूरदृष्टीपणामुळे तेथे जाऊ शकले. त्या मंडळींनी काय म्हटले आहे **वुई ऑल ॲडमिटेड दॅट द प्रोजेक्ट इज बेस्ट बट** लिहिलेले आहे त्यांनी तर आम्ही विरोध करण्याच्या दृष्टिकोनातून नाहीच बोलत आपण घाई करत आहात. त्यामुळे आपल्याबद्दल शंका वाटायला लागली आहे. साहेब, म्हणून आपण एकतर याच्यासाठी कमीतकमी आठ दिवसाची मुदत दयावी अशी आपणाला नम्र विनंती आहे.

**प्रकरण क्र. ४० :-** **मंजूर विकास योजनेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये घनकचरा व्यवस्थापनाकरिता आरक्षण प्रस्तावित करणे.**

**ठराव क्र.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना भागशः दि. १४ मे, १९९७ रोजी मंजूर झली असून उर्वरीत विकास योजना २५ ऑगस्ट, २००० रोजी मंजूर झाली आहे.

मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. ५१ येथिल ग्राऊंड ४.०० हेक्टर हे आरक्षण शहरातील कचरा डंपींग करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले होते. सदर आरक्षणाखालील जागा मंजूर विकास योजना अहवालाप्रमाणे खाजगी दर्शविण्यांत आलेले आहे. त्यानुसार भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना दि. १५/१२/२००१ च्या पत्रान्वये सादर केला होता. तसेच मौजे भाईंदर स.क्र. ७२२ अ जुना, ३४२ (नविन) ह्या स.क्र. मध्ये नाविकास विभागात डंपींगसाठी १०.०० हेक्टर शासकीय जागेची मागणी केली होती. या दोन्ही जागा सी.आर.झेड. नियमाने बाधीत होत असल्याने सदर दोन्ही ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणे शक्य नाही म्हणून सदर जागेऐवजी पर्यायी जागेचा प्रस्ताव मौजे पाली स.क्र. ६५ क्षेत्र १०.७२ हेक्टर व मोजे उत्तन स.क्र. २५ क्षेत्र २०.७४ हेक्टर असे एकूण ३१.४६ हेक्टर शासकीय जागा मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना दि. २१/१२/२००२ रोजी सादर केला. सदरची जागा मंजूर विकास योजनेप्रमाणे डोंगराळ क्षेत्र या वापरासाठी प्रस्तावित केली आहे.

सदरची जागा मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचा आदेश क्र. महसुल/कक्ष-१/टे-१/एलबीपी/कावि-१५७२/२००२, दि. २६/१२/२००२ अन्वये आगाऊ ताबा देणे बाबत मंजूर झाले असून दिनांक ३१/१२/२००२ रोजी उपरोक्त नमूद क्षेत्रासाठी ७/१२ अभिलेखात इतर हक्कात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नांव नोंदविण्यांत आले आहे.

मौजे उत्तन व पाली येथील उपरोक्त जागेत विकास योजनेप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आरक्षण नसल्यामुळे सदर जागेची सन २००२ च्या बाजार मुल्य तत्वानुसार रक्कम भरावी लागेल असे आदेशात नमूद केले आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण व वनविभागाने घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० तयार केले असून सदर नियमाची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. सदरच्या नियमानुसार प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा दि. २१/१२/२००२ पूर्वी ताब्यात असणे बंधनकारक होते. त्या अनुषंगाने विहित कालमर्यादेत प्रकल्पाची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे. तथापी सदर जागेचा वापर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या सार्वजनिक प्रयोजनार्थ करावयाचा असल्यामुळे मंजूर विकास योजनेत आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदाची कार्यवाही करण्यासाठी आरक्षणाखलील एकूण ३१.४६ हेक्टर क्षेत्र घनकचरा व्यवस्थापन या आरक्षणाखाली प्रस्तावित करणे आहे. ही शासकीय जागा ३१.४६ हेक्टर आहे.

सदरचे फेरबदलाची कार्यवाही झाल्यास विकास योजनेत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आरक्षण प्रस्तावित होईल. तसेच महानगरपालिकेस सदरची जागा सार्वजनिक प्रयोजनार्थ वापरासाठी असल्यामुळे बाजारमुल्य किंमत भरावी लागणार नाही. सबब फेरबदलाची पुढील विहित कार्यवाही करण्यांस ही सभा आर्थिक प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजूर

( प्र.सचिव यांनी प्रकरण क्र.४१ चे वाचन केले )

मिलन म्हात्रे :-

मा.महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, प्रकरण क्र.४१ वरती मी बोलू इच्छितो. हे जे ऑक्ट्रॉय चे जकात आणि उपकराचे लावलेले आहे. परंतु हे जे कोष्टक दिलेले आहे याबाजूला उजव्या आणि डाव्या बाजूस उपकर आणि जकातकर. जकातकर का लावला जातो, का लावावी, का लावण्यात येणार आहे? त्याची कारणे इकडे आहेत उपकराची कारणे हया बाजूला आहेत माझे स्वतःचे असे मत आणि गेल्या काही वर्षाचा अनुभव.

मोहन पाटील :-

मा.महापौर मॅडम याठिकाणी या विषयाची टिपणी आम्हाला उशीरा मिळालेली आहे. त्यामुळे आम्हाला या विषयावर अभ्यास करता आला नाही. तरी कृपया आपण हा विषय स्थगित ठेवून पुढच्या सभेस घ्यावा असे आम्ही सूचवितो. या विषयावर चर्चा करण्यास अर्थच नाही. कारण टिपणीच आम्हाला उशीरा मिळालेली आहे.

मिलन म्हात्रे :-

मोहन पाटील साहेब मी तुमच्या मताशी सहमत आहे. परंतु जो शेवटला दिलेला आहे की, समिती नेमण्यात आलेली होती या समितीचा अहवाल याबरोबर नाही. एस ऑर नो.

प्रकरण क्र.४१:- **जकात कर लावणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.**

ठराव क्र.

जकात कर लावणे बाबतचा ठराव ही पुढील महासभेत घेण्याचे सुचवित आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजूर

प्रभारी सचिव :-

या विषयासंदर्भात सन्मा.सदस्य श्री.परशुराम पाटील यांच्याकडून एक पत्र आलेले आहे आपणास या पत्राद्वारे कळविण्यात येते की, जकात कर वसुली ठेका पध्दतीने देण्यास पत्रकात जाहिर केलेले आहे. आमचे असे म्हणणे आहे की, वसुली ठेका पध्दतीने न देता महानगरपालिकेने स्वतः वसुल करावा. ठेकेदार ठेका पध्दतीवर पाच ते दहा करोड कमवू शकतो. महापालिका आपले कर्मचारी लावून का वसुल करु शकत नाही याचा खुलासा दयावा. तसेच पाच ते दहा करोड येतील ते मिरा भाईंदरच्या विकास कामास उपयोगात येतील हा जो आपला ठेका पध्दतीचा निर्णय आहे त्यात काही शंका आहे यासर्व बाबींचा खुलासा करणेस विनंती आहे. हे पत्र सभागृहात वाचून दाखविणे जरुरीचे आहे. हे पत्र वाचून दाखविण्याची विनंती करीत आहे. परशुराम पाटील हे सूचक आहेत आणि अनुमोदन श्री. प्रेमनाथ पाटील यांनी दिलेले आहे.

आसिफ शेख :-

सन्मा.महापौर साहेब तसेच सन्मा. स्थायी समिती सभापती यांनी सांगितले की, टिपणी आम्हाला उशीराने मिळालेली आहे आणि त्याच्यावर आम्हाला अभ्यास करायचा आहे. तसेच सन्मा.सदस्य श्री मिलनजी म्हात्रे यांनीही सांगितले आहे की, त्या तक्त्याचे वाचन करुन तेव्हा मला असे वाटते की, हा विषय पुढच्या सभेत घ्या. किंवा एक विशेष सभा लावा. आणि यांनी सुध्दा तसे पत्र दिलेले आहे. संपूर्ण ताळमेळ व्यवस्थित करता येईल.व व्यवस्थित अभ्यास करता येईल.

प्र.सचिव :-

विषय क्र.३७ मंजूर झालेला आहे. आणि एक शोकसभेचा प्रस्ताव आलेला आहे. प्रभाग क्र.३ मधील श्री राम मंदिराचे जवळ लोकप्रिय पुजारी श्री.सुर्यकांत उर्फ डाहयाभाई कृष्ण पुजारी वय वर्षे ६७ यांचे ३० डिसेंबर २००२ रोजी दुःखद निधन झालेले आहे. त्यांनी राममंदिराचे पुजारी म्हणून आयुष्यभर धार्मिक व सामाजिक कार्यामुळे ते लोकप्रिय ठरलेले आहेत. तरी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो तसेच त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या संकटातून सावरण्याची शक्ती परमेश्वर त्यांच्या कुटुंबियांना देवो.

प्रकाश दुबोले :-

पण साहेब धार्मिक काम काय केले ते सांगा.

मिलन म्हात्रे :-

नाना पालखीवाला यांचे नांव याच्यात सामाविष्ट करावे. जेष्ठ अर्थतज्ञ वारलेले आहेत त्यांचे नांव घेतलेले नाही. आणि ॲक्टर दिलीप कुलकर्णी नाटय कलाकार

**प्रफुल्ल पाटील :-**

राष्ट्रगीत झाले पाहिजे नियमानुसार. ही काय शोकसभा नाही.

**प्र.सचिव -**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, सभेचे कामकाज संपलेले आहे. सर्वांनी कृपया राष्ट्रगीतासाठी जागेवर उभे रहायचे आहे.

**मा.महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा.उपमहापौर, मा.आयुक्त , मा.प्र.सचिव अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**दुपारी ३.३० वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र.सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर (प)

महापालिका सचिव कार्यालय

दिनांक :-        /२/२००३

**egklHkk lwpuk dz-7 fnukad   -2-2003**

**izfr]**
**lUek-Jh-@Jherh &&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&**
**lnL;@lnL;k]**
**fejk HkkbZanj egkuxjikfydk**

;k lwpus}kjs vki.kkal dGfo.;kar ;srs dh] fejk HkkbZanj egkuxjikfydsPkh ek-egklHkk fn- 11-2-2003 jksth ldkGh 11-00 oktrk fejk HkkbZanj egkuxjikfydk eq[; dk;kZy; frljk etyk lHkkx`gkr egklHkk lwpuk dz-7] fn-  -  -2003 jksthP;k fo"k;if=dsojhy izdj.kkaoj fopkj fofue; dj.;klkBh vk;ksftr dj.;kr ;sr vkgs-

**ek-egkikSjkaP;k ekU;rsus-**

**¼ gjs'k y-ikVhy ½**
**izHkkjh egkikfydk lfpo]**
**fejk HkkbZanj egkuxjikfydk**

# fejk HkkbZanj egkuxjikfydk

## eq[; dk;kZy; HkkbZanj ¼i½

## ek-egklHkk dz-7 fn-   -  -2003 lkscrph fo"k; if=dk

| Izkd j.k dz- | fo"k; |
|---|---|
| | iz'uksRrjs |
| 42 | fn- 16@01@2003 jksthP;k ek-egklHksps bfro`Rrkar dk;e dj.ks |
| 43 | fn-18-1-2003 jksth >kysY;k ek-LFkk;h lferh lHksus f'kQkjl dsysY;k ik.khiV~Vh nj ok<h ckcr fopkj fofue; dj.ks- |
| 44 | fn-18-1-2003 jksthP;k ek-LFkk;h lferh lHksus f'kQkjl dsysY;k ekyeRrk djkP;k ok<ho njkckcr fopkj fofue; dj.ks- |
| 45 | fn-12-12-2002 jksthP;k ek-LFkk;h lferh lHksus f'kQkjl dsysY;k Jh-f'koeqrhZ ukbZd] rRdkfyu vk;qDr ;kauk nksu osru ok<h ns.ksckcrps vfHkuanu Bjkokoj fopkj fofue; dj.ks- |
| 45 | tdkr dj yko.ks ckcr fopkj fofue; dj.ks- |
| 46 | eatwj fodkl ;kstusrhy Hkkth ekdsZV ¼vk-dz-68vs ½ ;k tkxsr egkjk"V~ izknsf'kd o uxjjpuk vf/kfu;e 1966 ps dye 37 vUo;s eqLyhe o cksgjk lektklkBh nQuHkweh Eg.kwu vkj{k.k n'kZfo.;klkBh Qsjcnykph dk;Zokgh dj.ks- |

fnukad %&    -2-2003

¼gjs'k y-ikVhy ½
izHkkjh egkikfydk lfpo]
fejk HkkbZanj egkuxjikfydk